Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १९३ * * नागपूर * | रविवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांना अटक


■ **वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १९:** ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांना पंढरपूर पोलिसांनी धनादेश अनादर प्रकरणी अटक केली आहे. या प्रकरणी त्यांना तातडीने जिल्हा सत्र न्यायालयापुढे हजर केले असता कोर्टाने त्यांची जामिनावर सुटका केली.

लक्ष्मण हाके यांची कंपनी आहे. या कंपनीने सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन कंपनीस २०२१ साली ३ लाख रुपयांचा धनादेश दिलेला होता. तो बाऊन्स झाल्यानंतर सिद्धिविनायक कन्स्ट्रक्शन कंपनीने लक्ष्मण हाके यांच्या विरोधात तक्रार केली होती. या प्रकरणी कोर्टाने अजामीनपात्र वॉरंट काढले होते. पोलिसांनी हाके यांना अटक करून पंढरपूर जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले. त्यानंतर हाके यांची जामिनावर सुटका केली.

## भाजप १५५, शिवसेना ७८, राष्ट्रवादी कॉंग्रेस ५५

# महायुतीचे जागावाटप फायनल!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९:** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबतच्या बैठकीनंतर महायुतीच्या जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला आहे. माहितीनुसार, महायुतीच्या जागावाटपाच्या फॉर्म्युल्यानुसार भाजप सर्वाधिक १५५ जागांवर लढणार आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेला ७८ तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी कॉंग्रेसला अवघ्या ५५ जागा सोडण्यात आल्या आहेत.



२२ ऑक्टोबर रोजी निवडणुकीची अधिसूचना जारी होईल. त्यानंतर २३ तारखेपासून प्रत्यक्ष अर्ज भरण्यास सुरुवात होईल. या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीतील तिन्ही प्रमुख घटकपक्षांचे नेते शुक्रवारी जागावाटप निकाली काढण्यासाठी दिल्लीच्या दौऱ्यावर गेले होते. तिथे त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा केली.

सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीच्या जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला आहे. काही जागांवर पेच आहे. पण तो अमित शहा यांच्या सूचनेनुसार राज्य पातळीवर सोडवण्यात येईल. दिल्लीत अमित शहांशी चर्चा केल्यानंतर देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे दोन्ही उपमुख्यमंत्री महाराष्ट्रात परतलेत. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजूनही दिल्लीत ठाण मांडून आहेत.

फॉर्म्युल्यानुसार, राज्यात भाजप सर्वाधिक १५५ जागा तर शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना ७८ जागा लढवणार असल्याचे सांगण्यात येते.

## बॉम्बच्या धमकीनंतर विमानांचे इमर्जन्सी लँडिंग

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९:** इंडियन एअरलाइन्सच्या २० हून अधिक विमानांना शनिवारी बॉम्बच्या धमक्या मिळाल्या. यामध्ये इंडिगो, एअर इंडिया, आकासा, विस्तारा, स्पाइसजेट, स्टार एअर आणि अलायन्स एअर यांचा समावेश आहे.

गेल्या एका आठवड्यात ४० हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या असून त्या सर्व खोट्या असल्याचे सिद्ध झाले आहे. या धमक्यांमुळे आतापर्यंत ८० कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. सततच्या धमक्यांमुळे केंद्र सरकारने विमानांमध्ये एअर मार्शलची संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेतला होता. गृह मंत्रालयाने विमान वाहतूक मंत्रालयाकडूनही अहवाल मागवला आहे.

वृत्तसंस्था पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, इंडिगोच्या तीन विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. यामध्ये दिल्ली आणि मुंबईहून इस्तंबूलला जाणाऱ्या इंडिगोचाही समावेश आहे.

## उमेदवारांची घोषणा एक दोन दिवसांत

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९:** महायुतीत आता तिढा एवढा जास्त राहिला नाही. काही गरज भासली तर अमित शहांशी चर्चा होईल आणि तो तिढा सोडवला जाईल. आता फार फार ३० ते ३५ जागांवर तिढा राहिला आहे. त्यामुळे जागावाटपाची चर्चा शेवटच्या टप्प्यात आहे. यासंबंधी काळजी करण्याचे कारण नाही. ही चर्चा २ दिवसांत संपेल. त्यानंतर लगेचच उमेदवारांच्या नावांची घोषणा केली जाईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले.



जागावाटपाच्या चर्चेत सहभागी होण्यासाठी नवी दिल्लीत आलेले शिंदे माध्यमांशी बोलत होते.

शिंदे यांनी शनिवारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला ब्रेक लागल्याचे वृत्त जोरकसपणे फेटाळून लावले. निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे लाडकी बहीण योजनेला ब्रेक लागण्याचा प्रश्नच येत नाही. कारण, आम्ही नोव्हेंबरचे पैसे ऑक्टोबरमध्येच दिले आहेत, असे ते म्हणालेत.

शिंदे यांनी शनिवारी नवी दिल्लीत महायुतीच्या जागावाटपाच्या मुद्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी झालेल्या संवादाची माहिती दिली. ते म्हणाले, महायुतीच्या जागावाटपावर अमित शहा यांच्याशी चर्चा झाली. ही चर्चा अतिशय सकारात्मक झाली. आमची चर्चा आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पुढील १-२ दिवसांत यासंबंधीचा निर्णय होऊन तशी घोषणा होण्याची शक्यता आहे.

लाडकी बहीण योजनेविषयी ते म्हणाले, आम्ही नोव्हेंबरचे पैसे ऑक्टोबरमध्येच दिले आहेत. आम्ही आमच्या लाडक्या बहिणींना अॅडव्हान्समध्ये पैसे दिले. हे सरकार अॅडव्हान्स देणारे आहे घेणारे नाही. त्यामुळे आमची नियत साफ आहे. आमची वृत्ती देण्याची आहे.

मुळात आम्ही हा निर्णय निवडणूक डोळ्यापुढे ठेवून घेतलाच नाही. आमच्या लाडक्या बहिणींना हे पैसे पर्मनंट मिळावेत ही भावना मनात ठेवून आम्ही हा निर्णय घेतला. त्यामुळे ऑक्टोबरमध्येच आम्ही नोव्हेंबरचे पैसे दिले. महायुतीतील सर्वच घटकपक्ष आता एक टीम म्हणून काम करत असल्याचेही सीएम शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी विजया रहाटकर यांची नियुक्ती

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९:** केंद्र सरकारने भाजपच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. हे महत्त्वाचे पद भूषवणाऱ्या विजया रहाटकर या पहिल्याच मराठी महिला ठरल्यात हे विशेष.



केंद्राने जारी केलेल्या एका अधिसूचनेनुसार विजया रहाटकर यांची राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. त्या पुढील ३ वर्षे आयोगाच्या अध्यक्षा म्हणून कामकाज सांभाळतील. या कालावधीत त्यांना केंद्रीय राज्यमंत्रीपदाचा दर्जा प्राप्त असेल.

विजया रहाटकर यांनी यापूर्वी छत्रपती संभाजीनगर महापालिकेत नगरसेवक, महापौर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा, भाजपच्या राजस्थान सहप्रभारी, भाजप महिला मोर्चाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, भाजप राष्ट्रीय सचिव म्हणूनही काम केले आहे. विजया रहाटकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी असताना विविधांगी काम केले होते. प्रज्ज्वला योजनेद्वारे त्यांनी केंद्रीय योजनांशी लाखो महिलांना जोडले होते.

## मतभेद नाहीत... मविआचे जागा वाटप एक दोन दिवसात पूर्ण

### रमेश चेन्नीथला यांचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९:** महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नसून विधानसभेच्या निवडणुका मविआ एकत्रच लढवणार आहे. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांच्यातही वाद नाहीत. मात्र तिन्ही पक्ष मिळून जागा वाटपाची चचार्ही सुरु असल्याने ही चर्चाही एक दोन दिवसात पूर्ण होईल, असा दावा राज्याचे कॉंग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शनिवारी येथे पत्रकारांशी बोलताना केला.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची व महाविकास आघाडीची प्रकृत्तीही उत्तम असल्याची मार्मिक टिप्पणीही त्यांनी यावेळी केली. चेन्नीथला यांनी आज ठाकरे गटाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांची त्यांच्या निवासस्थानी मातोश्रीवर भेट घेतली. यावेळी त्यांच्याबरोबर प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान,आ. भाई जगताप, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे ,शिवसेना खा. संजय राऊत उपस्थित होते. त्यानंतर चेन्नीथला यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पक्षाध्यक्ष खा. शरद पवार यांचीही भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.



दुपारी टिळक भवन येथे चेन्नीथला यांच्या प्रमुख उपस्थितीत व कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या अध्यक्षतेखाली कॉंगेसच्या प्रमुख नेत्यांची एक महत्वाची बैठक पार पडली.या बैठकीला विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात,विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार,विधान परिषदेतील कॉंग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील,माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, डॉ. विश्वजित कदम आदी उपस्थित होते.

या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, सरकारच्या तिजोरीत खडखडाट असून योजनादूत च्या नावाखाली जनतेच्या पैशावर हे सरकार भाजपाचा प्रचार करत आहे.मात्र कॉंग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे तक्रार केल्यानंतर योजनादूत सह सरकारने घेतलेले अनेक निर्णयही रद्द केले, याकडेही त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले.

## वाघाच्या हल्ल्यात ईसम ठार

■ **महासागर प्रतिनिधी चंद्रपूर, दि. १९:** जंगलात गेलेल्या व्यक्तीवर दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. यात त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सकाळी घडली. विलास तुळशीराम मड़ावी (५२) रा. डोंगरगाव (सा.) असे मृताचे नाव आहे.



उपक्षेत्र सिंदेवाही अंतर्गत येत असलेल्या नियतक्षेत्र डोंगरगाव (सा.) कक्ष क्रमांक २५२ मध्ये आज शनिवारी सकाळच्या सुमारास वाघाने हल्ला करून एकाला ठार केल्याची माहिती सिंदेवाही वनविभागाला प्राप्त झाली. त्या आधारे सिंदेवाही वनपरिक्षेत्र (प्रादेशिक) चे वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सालकर, क्षेत्र सहायक नितिन गडपायले, पोलीस निरीक्षक विजय राठोड, डोंगरगाव (सा.) आणि कारघाटा येथील पोलीस पाटिल यांनी घटनेच्या ठिकाणी भेट देवून पंचनामा केला. मड़ावी सकाळी गावातील जंगल परिसरात सिंधी आणायला गेले होते. दबा धरून बसलेल्या वाघाने मड़ावी यांच्यावर अचानक हल्ला केला.

## शासनाला तब्बल ५६१ कोटींचा गंडा

### बनावट जीएसटी बिलाच्या आधारावर फसवणूक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १९:** टॅक्स रिर्टन फाइल करून बनावट जीएसटी ई बिल टॅक्स पावत्या बनवून वेगवेगळ्या फर्मला पाठवल्या असल्याचे भासवून एका कंपनीने तब्बल ५६१.६८ कोटींची आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा उघडकीस आला आहे.

याप्रकरणी ८ आरोपींवर बंडगार्डन पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जीएसटी अधिकारी रवी भूषणप्रसाद सिंग कुमार (वय-३४) यांनी आरोपी विरोधात फिर्याद दाखल केली आहे.

आरोपी मोहम्मद रियाझउद्दीन, अब्दुल सलाम ऊर्प सलाम भाई, नैशाब मलीक ऊर्फ नौशादभाई, सलमान मलिक, शादाबभाई, तनवीर, ओविसीस, राजू यादव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपींनी संगनमताने बनावट कंपनीच्या नावाने राजू यादव या आरोपीच्या मार्फत टॅक्स रिर्टन फाईल केल्या. बनावट जीएसटी ई बील टॅक्स पावत्या इलेक्ट्रॉनिक दस्तावेज लॅपटॉपमध्ये बनवून वेगवेगळ्या फर्मला पाठवून सुमारे सन २०२१ पासून स्पटेंबर २०२४ पर्यंत वितरित करून शासनाची एकूण ५६१.५८ कोटी रुपयांची कर चुकवून आर्थिक फसवणूक केली आहे. याबाबत पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एस खेडकर करत आहेत.

## डॉ. राजेंद्र शिंगणे यांचा शरद पवार गटात प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९:** बुलढाणा जिल्ह्यातील नेते आणि सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी शनिवारी अपेक्षेप्रमाणे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. डॉ. शिंगणे यांना पक्षात घेऊन शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आणखी एक धक्का दिला आहे.



याआधी फलटणचे आमदार दीपक चव्हाण यांनी अजित पवार यांची साथ सोडली आहे.

गेल्या वर्षी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात फूट पडली तेव्हा सुरुवातीला शरद पवार यांच्यासोबत असणाऱ्या डॉ. शिंगणे यांनी नंतर अजित पवार यांना साथ देण्याचा निर्णय घेतला. बुलढाणा जिल्हा मध्यवर्ती बँक प्रकरणी मदत करण्याचे आश्वासन मिळाल्याने आपण अजित पवार यांच्यासोबत असल्याचे डॉ. शिंगणे यांनी स्पष्ट केले होते. मात्र, विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर डॉ. शिंगणे यांनी घरवापसी करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार आज शरद पवार गटाच्या संसदीय मंडळाची बैठक होत असताना डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी तुतारी हातात घेतली.

## दारूड्या मुलाचा वडिलांकडून खून

### मद्यप्राशनाने मृत्यूचा बनाव, पुरावे केले नष्ट, अखेर उलगडा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :** दारूच्या नशेत कुटुंबाचा छळ करणाऱ्या मुलाची वडिलांनीच हत्या केली. मोठ्या मुलासोबत मिळून पुरावे नष्ट केले. मद्यप्राशन केल्याने मृत्यू झाल्याचा बनाव करून घाईत अंत्यसंस्कारही उरकले. मात्र, अस्थी विसर्जनाच्या तयारीत असताना पोलिस धडकले. दोघांनाही ताब्यात घेऊन विचारपूस केली असता गुन्ह्याची कबुली दिली. मोहित पंढरी हत्तीमारे (२२) रा. समतानगर, वाठोडा असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी गुन्हा नोंदवून वडील आणि मोठ्या मुलाला अटक केली . पंढरी राजाराम हत्तीमारे (५५) आणि तुषार पंढरी हत्तीमारे (२४) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

पंढरी हे पत्न आणि दोन मुलांसह राहतात. पंढरी आणि मोठा मुलगा तुषार हे सेंट्रिंगचे काम करतात. मृतक मोहित हा पेंटिंगचे काम करीत होता. त्याची आई कॅटरिंगचे काम करते. मोहित पूर्णतः दारूच्या आहारी गेला होता. दारूच्या पैशांसाठी संपूर्ण कुटुंबाला छळत होता. त्याच्यामुळे सर्व कुटुंबीय त्रासलेले होते. ६ महिन्यांपूर्वीही त्याने दारू पिण्यासाठी पैसे दिले नाही म्हणून वडील पंढरी यांना जबर मारहाण केली होती. यात त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला होता.

गुरूवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास मोहित नेहमीप्रमाणे मद्यधुंद अवस्थेत घरी आला. त्याने पंढरी यांना दारू पिण्यासाठी पैसे मागितले. त्यांनी नकार दिला असता शिविगाळ करून मारहाण करू लागला. रागाच्या भरात पंढरी यांनी जवळच पडलेला लाकडी दांडा उचलून त्याच्या डोक्यात हाणला. रक्तबंबाळ होऊन मोहित जागीच कोसळला. काही वेळानंतर तुषार घरी पोहोचला. पंढरी यांनी त्याला घटनेची माहिती दिली. दोघेही त्याला उचलून घरात घेऊन गेले.

एका चादरमध्ये त्याचा मृतदेह गुंडाळला. त्यांनतर दोघांनीही मिळून रक्ताचे डाग मिटवले आणि झोपी गेले. रात्री १ ते १.३० वाजताचा दरम्यान आई कॅटरिंगच्या कामावरून घरी परतली असता तिला धक्काच बसला. पंढरी यांनी दारूच्या नशेत खाली पडल्याने मोहितचा मृत्यू झाल्याची माहिती दिली.

**४ तासातच अस्थी विसर्जनाची तयारी**

शुक्रवारी सकाळी दोघांनीही नातेवाईकांना मोहितचा मृत्यू झाल्याची माहिती दिली. दारूच्या नशेत तो खाली पडला आणि यात त्याचा मृत्यू झाल्याचे सर्वांना सांगितले. जवळच्या नातेवाईकांसोबत मिळून पंढरी आणि तुषारने शुक्रवारी दुपारी १२ वाजतापर्यंत दिघोरी घाटावर त्याचा अंत्यसंस्कारही उरकला. रक्त पुसण्यासाठी वापरलेले कपडेही घाटावरच जाळले. सायंकाळीच त्याचे अस्थीविसर्जन करण्याचीही तयारी केली. तोपर्यंत दोघेही घाटावरच बसून होते.

**मृत्यूबाबत संशय आणि पोलिसांना फोन**

दरम्यान कोणीतरी मोहितच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करीत वाठोडा पोलिसांना सूचना दिली. पोलिस निरीक्षक हरीश बोराडे पथकासह घटनास्थळी पोहोचले. पंढरी आणि तुषार यांना ताब्यात घेऊन आपल्या पद्धतीने विचारपूस केली असता त्यांनी खुनाची कबुली दिली. संपूर्ण घटनाक्रम ऐकल्यानंतर पोलिसांनी दोघांनाही अटक केली. खून आणि पुरावा नष्ट करण्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. न्यायालयाने दोघांनाही पोलिस कोठडी सुनावली आहे.

## कसम इस राखीकी...

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९:** 'लाडकी बहीण योजना बंद होऊ देणार नाही', असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.



निवडणुकीनंतर लाडकी बहीण योजनेच्या निधीत वाढ करण्याचे आश्वासन देखील अजित पवार यांनी दिले आहे. अजित पवार यांनी एका व्हिडिओद्वारे हृदयस्पर्शी संदेश देत लाडक्या बहिणींसाठी ही योजना सुरु राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

अजित पवार यांनी एका व्हिडिओ संदेशाद्वारे महाराष्ट्रातील महिलांचे लाडकी बहीण योजनेला दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानले आहेत. महायुती सरकारच्या माझी लाडकी बहिण योजनेच्या यशाबद्दल बोलताना अजित पवार म्हणाले की, या योजनेने महिलांना स्वावलंबी बनवून सक्षम केले आहे. या योजनेमुळे लाडक्या बहिणींना स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे राहण्यास मदत झाली आहे, त्यांना दिल्या जाणाऱ्या निधीत पुढे वाढ करू असे अजित पवार म्हणाले.

## पोटनिवडणुकीसाठी भाजपचे उमेदवार जाहीर

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १९:** ८ राज्यांतील २५ लोकसभा-विधानसभा जागांच्या पोटनिवडणुकांसाठी भाजपने शनिवारी संध्याकाळी उमेदवारांची यादी जाहीर केली. यामध्ये केरळच्या २४ विधानसभा जागा आणि वायनाड लोकसभा मतदारसंघाचा समावेश आहे.

भाजपने वायनाडमधून नव्या हरिदास यांना तिकीट दिले आहे. त्यांचा सामना कॉंग्रेसच्या प्रियंका गांधी यांच्याशी होणार आहे.

१४ राज्यांतील ४८ विधानसभा आणि २ लोकसभेच्या जागांवर पोटनिवडणूक होणार आहे.

## ऑनलाईन मतदार नोंदणी : पोलिसात तक्रार दाखल

### ६८५३ मतदारांचा यादीमध्ये समावेश नाही, कारवाईचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. १९:** राजुरा विधानसभा मतदार संघात अज्ञात व्यक्तिंकडून ऑनलाईन पध्दतीने मतदारांची नोंदणी केल्याप्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच चुकीच्या पध्दतीने नोंदणी केलेल्या ६८५३ मतदारांच्या नावांचा समावेश मतदार यादीत करण्यात आला नाही. या प्रकरणाची योग्य तपासणी करून तात्काळ कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी पोलिस विभागाला दिले आहे.

राजुरा विधानसभा मतदार संघातील मतदार यादीचा निरंतर कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाद्वारे सुरू आहे. यापुर्वी मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला व राजकीय पक्षाची बैठक घेऊन प्रारुप मतदार यादी व अंतिम मतदार यादी राजुरा विधानसभा मतदार संघातील प्रत्येक मतदान केंद्रावर प्रसिध्द करण्यात आली.

याअंतर्गत राजुरा विधानसभा मतदार संघातील राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी तालुक्यांमधून ३ ऑक्टोबर २०२४ पासून मोठया प्रमाणात ऑनलाईन स्वरुपात नवीन मतदार नोंदणी करीता अर्ज प्राप्त झाले होते. सदर नोंदणी अर्जाची सर्व सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरीच्या तहसीलदारांमार्फत सखोल तपासणी करण्यात आली. त्यापैकी ६८५३ अर्जांमध्ये अर्जदाराचा फोटो नसणे, जन्मतारीख व रहिवासीचा पुरावा नसणे, अर्जामध्ये नमूद नाव व पुरावा हा वेगवेगळ्या व्यक्तीचा असणे, एकच फोटो एकापेक्षा अधिक अर्जावर असणे, वेगवेगळ्या नावाने अर्ज करणे, अशा स्वरुपाचे अर्ज निदर्शनास आले.

पडताळणी करून सदरचे सर्व अर्ज नाकारण्यात आले असून त्यांचा समावेश मतदार यादीमध्ये करण्यात आलेला नाही. वयाचे १८ वर्ष पूर्ण झालेल्या नागरिकांकरीता मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करणे, नाव कमी करणे, त्यामध्ये बदल करणे याकरीता भारत निवडणूक आयोगामार्फत ही ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. परंतु या सुविधेचा गैरफायदा घेवून काही अज्ञात व्यक्तींनी चुकीचे फॉर्म ऑनलाईन भरल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित व्यक्तिंवर कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**BAPURAO DESHMUKH COLLEGE OF ENGINEERING SEVAGRAM**
NAAC ACCREDITED

**B. TECH. / M.TECH. / MBA ADMISSION NOTIFICATION 2024-25**

Applications are invited in prescribed form, from eligible candidates under Against CAP Vacant seats for admissions to B.Tech. First Year / Direct Second Year, M.Tech. & MBA for Academic Year 2024-25

**Schedule of Against CAP Vacant Seats Admission Process 2024-25**

| | |
|---|---|
| 1. Availability and Submission of duly filled Application Form | : 01/10/2024 to 20/10/2024 10.00 AM to 5.00 PM |
| 2. Display of Provisional College Merit List (PCML) | : 21/10/2024 at 2.00 PM |
| 3. Submission of Grievances and Objections if any | : 21/10/2024 2.00 PM to 4.00 PM |
| 4. Display of Final College Merit List (FCML) | : 21/10/2024 at 5.00 PM |
| 5. Counseling and Spot Admission as per Final College Merit List | : 22/10/2024 to 23/10/2024 10.00 AM to 3.00 PM |

Note : 1) Admission CAP Vacant Seats shall be filled in on the basis of inter se merit of the candidates applied for admission as per State CET Cell Maharashtra State Norms. 2) Application form for admission is available at College Office and can be downloaded from the college website.

Venue : Counseling Center, BDCE Campus, Sevagram, Wardha

Address : Sevagram, Wardha - 442102, Maharashtra, India
CALL: 8412053014 / 7499074010 Website-www.bdce.edu.in
INSTITUTE CODE 4118

अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा पालकमंत्री गोंदिया जिल्हा
मा. राजे धर्मरावबाबा आत्राम
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



मा.धर्मराव बाबा आत्राम

शुभेच्छुक
रविंद्र वासेकर राकाँ जिल्हाध्यक्ष,
रियाजभाई शेख राकाँ जिल्हा कार्याध्यक्ष,
पुष्पाताई अलोणे राकाँ महिला जिल्हाध्यक्ष,
लिलाधर भरडकर अध्यक्ष, राकाँ.युवा जिल्हाध्यक्ष




# जागावाटप कळीचा मुद्दा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा होवून पाच दिवस लोटले आहेत. राज्यातील सत्ताधारी महायुतीमध्ये जागांचे वाटप अद्यापही निश्चित झाले नाही. महायुतीमधील प्रमुख पक्ष भाजपा १६० जागांवर अडल्याचे सांगण्यात येते. उरलेल्या १२८ जागांमध्ये शिंदे गट, अजित पवार गट आणि अन्य काही मित्रपक्षांना जागा दिल्या जाणार आहेत. एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री असून, त्यांच्या पक्षातर्फे ८० ते ८५ जागा लढणार असल्याचे सांगितले जाते. अशा स्थितीत अजित पवारांच्या वाट्याला कमी जागा येणार, हे नक्की.

महाविकास आघाडीमध्येही जागा वाटपावरून एकमत होताना दिसत नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रात चांगली मुसंडी मारल्याने विधानसभेच्या अधिकाधीक जागा पदरात पाडून घेण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे आडमुठे धोरण अवलंबत असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून केला जात असून, नाना पटोले असतील तर त्या बैठकीत चर्चाच होणार नाही, अशी भूमिका शिवसेनेने घेतली आहे. शिवसेनेला विदर्भात फारसा रस दिसत नाही. त्यांचा फोकस मुंबई आणि कोकणावर दिसतो आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमधील जागा वाटपाचा तिढा सुटत नाही, उमेदवारांची यादी जाहीर होत नाही, तोवर या रणसंग्रामाला रंग चढणार नाही.

दुसरीकडे, अमरावती जिल्ह्याच्या अचलपूरचे प्रहारचे आमदार बच्चू कडू, छत्रपती संभाजी राजे आणि राजू शेट्टी यांनी तिसरी आघाडी तयार केली असून, सुमारे १५० जागा लढवणार असल्याचे जाहीर केले आहे. तथापि, ही तिसरी आघाडी कुणाच्या तरी सांगण्यावरून किंवा कुणाला तरी लाभ पोहचविण्याच्या उद्देशाने तयार झाल्याचा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे. वंचित आघाडी आणि मनसेने स्वबळाची घोषणा केली असून, हे छोटे पक्ष युती किंवा आघाडी यापैकी कुणाला लाभ पोहचविणार, निकालानंतर स्पष्ट होईल.

विदर्भातील ६२ आमदारांची यादी पान क्र. ८ वर

## तिसऱ्या आघाडीकडेही इच्छुकांची गर्दी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :
आगामी विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी यांना शह देण्यासाठी परिवर्तन महाशक्ती ही तिसरी आघाडी निर्माण करण्यात आली आहे. ही आघाडी राज्यातील सर्व मतदारसंघात उमेदवार उभे करणार असल्यामुळे आता छत्रपती संभाजी राजे यांच्या स्वराज पक्षाकडे इच्छुकांच्या रांगा लागल्या आहे.

यामध्ये ३ जिल्हाप्रमुख, ३ माजी महापौर, ६ जिल्हापरिषद सदस्य, १ जिल्हापरिषद सभापती, १ पंचायत समिती सभापतीसोबत आपचा युवक प्रदेशाध्यक्ष प्रवेशासह उमेदवारीसाठी आग्रही असल्याचे दिसून आले आहे.

संभाजीराजे यांच्या स्वराज्य पक्षाचे पुण्यातील शिवाजीनगर येथे मध्यवर्ती कार्यालय आहे. स्वराज्य भवन नामक या कार्यालयात मुलाखतीसाठी इच्छुक उमेदवारांची गर्दी होत आहे. स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे, सरचिटणीस धनंजय जाधव, आप्पासाहेब कुढेकर, प्रशांत पाटणे, विनोद साबळे यांनी या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे नांदेडचे जिल्हाप्रमुख विश्वंभर पवार यांच्यासह इतर जिल्ह्यातील, शिवसेना शिंदे जिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख,आम आदमी पक्षाचे जिल्हाप्रमुख या पक्षांचे प्रत्येकी एक असे ४ जिल्हाप्रमुख संभाजीराजेंना उमेदवारीसाठी मुलाखती देण्यास आले होते.

तसेच नाशिकचे माजी महापौर दशरथ पाटील यांच्यासह इतर शहरातील तीन माजी महापौर उमेदवारी साठी भेटून गेले आहेत. भाजपचे २ जिल्हा परिषद सदस्य व एक जिल्हापरिषद सभापती, शिवसेनेचे दोन जिल्हा परिषद सदस्य, राष्ट्रवादीचे दोन जिल्हा परिषद सदस्य उमेदवार मागण्यासाठी स्वराज्य भवनात आले होते. भूम परंडा मतदारसंघातील सहकार क्षेत्रातील एक नेते देखील स्वराज्यच्या वाटेवर आहे. आम आदमी पक्ष केजरीवाल यांच्या पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष मयूर दौंडकर यांनी देखील संभाजीराजे यांची भेट घेऊन उमेदवारीची मागणी केली आहे.

पुणे जिल्ह्यातील खेड राजगुरूनगर पंचायत समितीचे माजी सभापती अंकुश राक्षे यांनी देखील उमेदवारी मागण्यासाठी स्वराज्य भवनात राजेंची भेट घेतली. विविध पक्षांचे तालुका प्रमुख व माजी नगरसेवक देखील प्रवेशासाठी स्वराज्य भवनात सध्या येत आहेत.

## आमची मते गृहित धरू नका! मुस्लिम समाजाचा इशारा

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १९ :
महाविकास आघाडी सर्व घटकांना व समाजाला जाती आधारित न्याय देते, पण मुस्लिमांना प्रतिनिधित्व देताना त्यांना आजही भीती वाटते. त्यांनी लोकसभा निवडणुकीतही एकाही मुस्लिम व्यक्तीला उमेदवारी दिली नाही. त्यांनी विधानसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती केली, तर त्यांनी मुस्लिमांची मते गृहित धरू नये, असा इशारा मुस्लिम राजकीय मंचाचे नेते अंजूम इनामदार यांनी दिला आहे.

अनेक मुस्लिम कार्यकर्त्यांनी उमेदवारीची मागणी केली. पण त्यांची दखल घेतली गेली नाही. मविआ आताही दुर्लक्ष करणार असेल तर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# महाराष्ट्रातील विधानसभेचे जिल्हानिहाय आमदार

### नंदुरबार जिल्हा :

1) अक्कलकुवा विधानसभा - ॲड. के. सी पाडवी (काँग्रेस)
2) शहादा विधानसभा- राजेश पाडवी (भाजप)
3) नंदुरबार विधानसभा - विजयकुमार गावित (भाजप)
4) नवापूर विधानसभा - शिरीष नाईक (काँग्रेस)

### धुळे जिल्हा :

5) साक्री विधानसभा- मंजुषा गावित (अपक्ष)
6) धुळे ग्रामीण विधानसभा - कुणाल पाटील (काँग्रेस)
7) धुळे शहर विधानसभा - फारुक शाह (टक्ट)
8) सिंदखेडा विधानसभा - जयकुमार रावल (भाजप)
9 ) शिरपूर विधानसभा - काशिराम पावरा (भाजप)

### जळगाव जिल्हा :

10) चोपडा विधानसभा- लता सोनवणे (शिवसेना - शिंदे गट)
11) रावेर विधानसभा - शिरीष चौधरी (काँग्रेस)
12) भुसावळ विधानसभा- संजय सावकारे (भाजप)
13) जळगाव शहर विधानसभा - सुरेश भोळे (भाजप)
14) जळगाव ग्रामीण विधानसभा- गुलाबराव पाटील (शिवसेना - शिंदे गट)
15) अमळनेर विधानसभा - अनिल पाटील (राष्ट्रवादी - अजित पवार)
16) एरंडोल विधानसभा - चिमणराव पाटील (शिवसेना- शिंदे गट)
17) चाळीसगाव विधानसभा - मंगेश चव्हाण (भाजप)
18) पाचोरा विधानसभा - किशोर पाटील (शिवसेना)
19) जामनेर विधानसभा - गिरीष महाजन (भाजप)
20) मुक्ताईनगर विधानसभा - चंद्रकांत पाटील (अपक्ष)

### नांदेड जिल्हा :

83) किनवट विधानसभा - भीमराव केराम (भाजप)
84) हदगाव विधानसभा - माधवराव पाटील जवळगावकर (काँग्रेस)
85) भोकर विधानसभा - अशोक चव्हाण (भाजप) - सध्या राज्यसभा खासदार
86) नांदेड विधानसभा - उत्तर बालाजी कल्याणकर (शिवसेना - शिंदे)
87) नांदेड विधानसभा - दक्षिण मोहन हंबर्डे (काँग्रेस)
88) लोहा विधानसभा - श्यामसुंदर शिंदे (अपक्ष)
89) नायगाव विधानसभा - राजेश पवार (भाजप)
90) देगलूर विधानसभा - जितेश अंतापूरकर (काँग्रेस)
91) मुखेड विधानसभा - तुषार राठोड (भाजप)

### हिंगोली जिल्हा :

92) वसमत विधानसभा - चंद्रकांत नवघरे (राष्ट्रवादी - अजित पवार)
93) कळमनुरी विधानसभा - संतोष बांगर (शिवसेना - एकनाथ शिंदे)
94) हिंगोली विधानसभा - तानाजी मुटकुळे (भाजप)

### परभणी जिल्हा :

95) जिंतूर विधानसभा - मेघना बोर्डीकर (भाजप)
96) परभणी विधानसभा - राहुल पाटील (शिवसेना - उद्धव ठाकरे)
97) गंगाखेड विधानसभा - रत्नाकर गुट्टे (रासप)
98) पाथरी विधानसभा - सुरेश वरपूडकर (काँग्रेस)

### जालना जिल्हा :

99) परतूर विधानसभा - बबन लोणीकर (भाजप)
100) घनसावंगी विधानसभा - राजेश टोपे (राष्ट्रवादी - शरद पवार)
101) जालना विधानसभा - कैलास गोरंटियाल (काँग्रेस)
102) बदनापूर विधानसभा - नारायण कुचे (भाजप)
103) भोकरदन विधानसभा - संतोष दानवे (भाजप)

### औरंगाबाद जिल्हा :

104) सिल्लोड विधानसभा - अब्दुल सत्तार (शिवसेना - एकनाथ शिंदे)
105) कन्नड विधानसभा - उदयसिंग राजपूत (शिवसेना- उद्धव ठाकरे)
106) फुलंब्री विधानसभा - हरिभाऊ बागडे (भाजप)
107) औरंगाबाद मध्य विधानसभा - प्रदीप जयस्वाल (शिवसेना - शिंदे)
108) औरंगाबाद पश्चिम विधानसभा - संजय शिरसाट (शिवसेना - शिंदे)
109) औरंगाबाद पूर्व विधानसभा - अतुल सावे (भाजप)
110) पैठण विधानसभा - संदीपान भुमरे (शिवसेना - शिंदे) - सध्या खासदार
111) गंगापूर विधानसभा - प्रशांत बंब (भाजप)
112) वैजापूर विधानसभा - रमेश बोरनारे (शिवसेना - एकनाथ शिंदे)

### नाशिक जिल्हा :

113) नांदगाव विधानसभा - सुहास कांदे (शिवसेना - एकनाथ शिंदे)
114) मालेगाव मध्य विधानसभा - मोहम्मद इस्माईल (टक्ट)
115) मालेगाव बाह्य विधानसभा - दादा भुसे (शिवसेना - एकनाथ शिंदे)
116) बागलान विधानसभा - दिलीप बोरसे (भाजप)
117) कळवण विधानसभा - नितीन पवार (राष्ट्रवादी - अजित पवार)
118) चांदवड विधानसभा - राहुल आहेर (भाजप)
119) येवला विधानसभा - छगन भुजबळ (राष्ट्रवादी - अजित पवार)
120) सिन्नर विधानसभा - माणिकराव कोकाटे (राष्ट्रवादी - अजित पवार)
121) निफाड विधानसभा - दिलीप बनकर (राष्ट्रवादी - अजित पवार)
122) दिंडोरी विधानसभा - नरहरी झिरवळ (राष्ट्रवादी- अजित पवार)
123) नाशिक पूर्व विधानसभा - राहुल ढिकळे (भाजप)
124) नाशिक मध्य विधानसभा - देवयानी फरांदे (भाजप)
125) नाशिक पश्चिम विधानसभा - सीमा हिरे (भाजप)
126) देवळाली विधानसभा - सरोज अहिरे (राष्ट्रवादी)
127) इगतपुरी विधानसभा - हिरामण खोसकर (काँग्रेस)
128) डहाणू विधानसभा - विनोद निकोले (माकप)
129) विक्रमगड विधानसभा - सुनिल भुसारा (राष्ट्रवादी - शरद पवार)

### पालघर जिल्हा :

130) पालघर विधानसभा - श्रीनिवास वनगा (शिवसेना)
131) बोईसर विधानसभा - राजेश पाटील (बविआ)
132) नालासोपारा विधानसभा - क्षितिज ठाकूर (बविआ)
133) वसई विधानसभा - हितेंद्र ठाकूर (बविआ)
134) भिवंडी ग्रामीण विधानसभा - शांताराम मोरे (शिवसेना - शिंदे)
135) शहापूर विधानसभा - दौलत दरोडा (राष्ट्रवादी - अजित पवार)

### ठाणे जिल्हा :

136) भिवंडी पश्चिम विधानसभा - महेश प्रभाकर चौगुले (भाजप)
137) भिवंडी पूर्व विधानसभा - रईस शेख (समाजवादी पक्ष)
138) कल्याण पश्चिम विधानसभा - विश्वनाथ भोईर (शिवसेना - शिंदे)
139) मुरबाड विधानसभा - किसन कथोरे (भाजप)
140) अंबरनाथ विधानसभा - बालाजी किणीकर (शिवसेना- शिंदे)
141) उल्हासनगर विधानसभा - कुमार आयलानी (भाजप)
142) कल्याण पूर्व विधानसभा - गणपत गायकवाड (भाजप)
143) डोंबिवली विधानसभा - रवींद्र चव्हाण (भाजप)
144) कल्याण ग्रामीण विधानसभा - प्रमोद पाटील (मनसे)
145) मीरा-भाईंदर विधानसभा - गीता जैन (अपक्ष)
146) ओवळा-माजीवडाविधानसभा - प्रताप सरनाईक (शिवसेना - शिंदे)
147) कोपरी-पाचपाखाडी विधानसभा - एकनाथ शिंदे (शिवसेना)
148) ठाणे विधानसभा - संजय केळकर (भाजप)
149) मुंब्रा-कळवा विधानसभा - जितेंद्र आव्हाड (राष्ट्रवादी- शरद पवार)
150) ऐरोली विधानसभा - गणेश नाईक (भाजप)
151) बेलापूर विधानसभा - मंदा म्हात्रे (भाजप)
152) बोरीवली विधानसभा - सुनिल राणे (भाजप)
153) दहिसर विधानसभा - मनिषा चौधरी (भाजप)

### मुंबईतील आमदार :

154) मागाठणे विधानसभा - प्रकाश सुर्वे (शिवसेना - एकनाथ शिंदे)
155) मुलुंड विधानसभा - मिहीर कोटेचा (भाजप)
156) विक्रोळी विधानसभा - सुनील राऊत (शिवसेना - उद्धव ठाकरे)
157) भांडुप पश्चिम विधानसभा - सुरेश कोपरकर (काँग्रेस)
158) जोगेश्वरी पूर्व विधानसभा - रविंद्र वायकर (शिवसेना - एकनाथ शिंदे)
159) दिंडोशी विधानसभा - सुनील प्रभू (शिवसेना - उद्धव ठाकरे)
160) कांदिवली पूर्व विधानसभा - अतुल भातखळकर (भाजप)
161) चारकोप विधानसभा - योगेश सागर (भाजप)
162) मालाड पश्चिम विधानसभा - अस्लम शेख (काँग्रेस)
163) गोरेगाव विधानसभा - विद्या ठाकूर (भाजप)
164) वसोर्वा विधानसभा - भारती लवेकर (भाजप)
165) अंधेरी पश्चिम विधानसभा - अमित साटम (भाजप)
166) अंधेरी पूर्व विधानसभा - ऋतुजा लटके (शिवसेना - उद्धव ठाकरे)
167) विलेपार्ले विधानसभा - पराग अळवणी (भाजप)
168) चांदिवली विधानसभा - दिलीप लांडे (शिवसेना - एकनाथ शिंदे)
169) घाटकोपर पश्चिम विधानसभा - राम कदम (भाजप)
170) घाटकोपर पूर्व विधानसभा - पराग शाह (भाजप)
171) मानखुर्द शिवाजीनगर विधानसभा - अबू आझमी (समाजवादी पक्ष)
172) अणूशक्तिनगर विधानसभा - नवाब मलिक (राष्ट्रवादी)
173) चेंबुर विधानसभा - प्रकाश फातर्पेकर (शिवसेना - उद्धव ठाकरे)
174) कुर्ला विधानसभा - मंगेश कुडाळकर (शिवसेना- एकनाथ शिंदे)
175) कलिना विधानसभा - संजय पोतनीस (शिवसेना - उद्धव ठाकरे)
176) वांद्रे पूर्व विधानसभा - झिशान सिद्दीकी (काँग्रेस)
177) वांद्रे पश्चिम विधानसभा - आशिष शेलार (भाजप)
178) धारावी विधानसभा - वर्षा गायकवाड (काँग्रेस) - सध्या लोकसभेवर
179) सायन कोळीवाडा विधानसभा - कॅप्टन तमिळ सेलवन (भाजप)
180) वडाळा विधानसभा - कालिदास कोळंबकर (भाजप)
181) माहिम विधानसभा - सदा सरवणकर (शिवसेना - एकनाथ शिंदे)
182) वरळी विधानसभा - आदित्य ठाकरे (शिवसेना - उद्धव ठाकरे)
183) शिवडी विधानसभा - अजय चौधरी (शिवसेना - उद्धव ठाकरे)
184) भायखळा विधानसभा - यामिनी जाधव (शिवसेना - एकनाथ शिंदे)
185) मलबार हिल विधानसभा - मंगल प्रभात लोढा (भाजप)
186) मुंबादेवी विधानसभा - अमीन पटेल (काँग्रेस)
187) कुलाबा विधानसभा - राहुल नार्वेकर (भाजप)
188) पनवेल विधानसभा - प्रशांत ठाकूर (भाजप)
189) कर्जत विधानसभा - महेंद्र थोरवे (शिवसेना - एकनाथ शिंदे)

### रायगड जिल्हा :

190) उरण विधानसभा - महेश बालदी (अपक्ष)
191) पेण विधानसभा - रवीशेठ पाटील (भाजप)
192) अलिबाग विधानसभा - महेंद्र दळवी (शिवसेना - एकनाथ शिंदे)
193) श्रीवर्धन विधानसभा - अदिती तटकरे (राष्ट्रवादी - अजित पवार)
194) महाड विधानसभा - भरत गोगावले (शिवसेना - एकनाथ शिंदे)
195) जुन्नर विधानसभा - अतुल बेणके (राष्ट्रवादी - अजित पवार)
196) आंबेगाव विधानसभा - दिलीप वळसे पाटील (राष्ट्रवादी - अजित पवार)

### पुणे जिल्हा :

197) खेड आळंदी विधानसभा - दिलीप मोहिते (राष्ट्रवादी - अजित पवार)
198) शिरुर विधानसभा - अशोक पवार (राष्ट्रवादी - अजित पवार)
199) दौंड विधानसभा - राहुल कुल (भाजप)
200) इंदापूर विधानसभा - दत्ता भरणे (राष्ट्रवादी - अजित पवार)
201) बारामती विधानसभा - अजित पवार (राष्ट्रवादी)
202) पुरंदर विधानसभा - संजय जगताप (काँग्रेस)
203) भोर विधानसभा - संग्राम थोपटे (काँग्रेस)
204) मावळ विधानसभा - सचिन शेळके (राष्ट्रवादी - अजित पवार)
205) चिंचवड विधानसभा - अश्विनी जगताप (भाजप)
206) पिंपरी विधानसभा - अण्णा बनसोडे (राष्ट्रवादी - अजित पवार)
207) भोसरी विधानसभा - महेश लांडगे (भाजप)
208) वडगावशेरी विधानसभा - सुनिल टिंगरे (राष्ट्रवादी - अजित पवार)
209) शिवाजीनगर विधानसभा - सिद्धार्थ शिरोळे (भाजप)
210) कोथरुड विधानसभा - चंद्रकांत पाटील (भाजप)
211) खडकवासला विधानसभा - भीमराव तपकीर (भाजप)
212) पर्वती विधानसभा - माधुरी मिसाळ (भाजप)
213) हडपसर विधानसभा - चेतन तुपे (राष्ट्रवादी - अजित पवार)
214) पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा - सुनिल कांबळे (भाजप)
215) कसबा पेठ विधानसभा - रवींद्र धंगेकर (काँग्रेस)

### अहमदनगर जिल्हा :

216) अकोले विधानसभा - किरण लहामटे (राष्ट्रवादी - शरद पवार)
217) संगमनेर विधानसभा - बाळासाहेब थोरात (काँग्रेस)
218) शिर्डी विधानसभा - राधाकृष्ण विखे पाटील (भाजप)
219) कोपरगाव विधानसभा - आशुतोष काळे (राष्ट्रवादी - अजित पवार)
220) श्रीरामपूर विधानसभा - लहू कानडे (काँग्रेस)
221) नेवासा विधानसभा - शंकरराव गडाख (क्रांतिकारी पक्ष)
222) शेवगाव पाथर्डी विधानसभा - मोनिका राजळे (भाजप)
223) राहुरी विधानसभा - प्राजक्त तनपुरे (राष्ट्रवादी - शरद पवार)
224) पारनेर विधानसभा - निलेश लंके (राष्ट्रवादी) - सध्या लोकसभेवर
225) अहमदनगर शहर विधानसभा - संग्राम जगताप (राकाँ - अजित पवार)
226) श्रीगोंदा विधानसभा - बबनराव पाचपुते (भाजप)
227) कर्जत जामखेड विधानसभा - रोहित पवार (राष्ट्रवादी - शरद पवार)

### बीड जिल्हा :

228) गेवराई विधानसभा - लक्ष्मण पवार (भाजप)
229) माजलगाव विधानसभा - प्रकाश सोळंके (राष्ट्रवादी - अजित पवार)
230) बीड विधानसभा - संदीप क्षीरसागर (राष्ट्रवादी - शरद पवार)
231) आष्टी विधानसभा - बाळासाहेब आजबे (राष्ट्रवादी - अजित पवार)
232) केज विधानसभा - नमिता मुंदडा (भाजप)
233) परळी विधानसभा - धनंजय मुंडे (राष्ट्रवादी - अजित पवार)

### लातूर जिल्हा :

234) लातूर ग्रामीण विधानसभा - धीरज देशमुख (काँग्रेस)
235) लातूर शहर विधानसभा - अमित देशमुख (काँग्रेस)
236) अहमदपूर विधानसभा - बाबासाहेब पाटील (राष्ट्रवादी - अजित पवार)
237) उदगीर विधानसभा - संजय बनसोडे (राष्ट्रवादी - अजित पवार)
238) निलंगा विधानसभा - संभाजी पाटील निलंगेकर (भाजप)
239) औसा विधानसभा - अभिमन्यू पवार (भाजप)

### उस्मानाबाद जिल्हा :

240) उमरगा विधानसभा - ज्ञानराज चौगुले (शिवसेना - एकनाथ शिंदे)
241) तुळजापूर विधानसभा - राणा जगजितसिंह पाटील (भाजप)
242) उस्मानाबाद विधानसभा - कैलास पाटील (शिवसेना- उद्धव ठाकरे)
243) परांडा विधानसभा - तानाजी सावंत (शिवसेना - एकनाथ शिंदे)

### सोलापूर जिल्हा :

244) करमाळा विधानसभा - संजय शिंदे (अपक्ष) - अजित पवारांना पाठिंबा
245) माढा विधानसभा - बबन शिंदे (राष्ट्रवादी - अजित पवार)
246) बार्शी विधानसभा - राजेंद्र राऊत (अपक्ष) - भाजपला पाठिंबा
247) मोहोळ विधानसभा - यशवंत माने (राष्ट्रवादी - अजित पवार)
248) सोलापूर शहर उत्तर विधानसभा - विजयकुमार देशमुख (भाजप)
249) सोलापूर मध्य विधानसभा - प्रणिती शिंदे (काँग्रेस) - सध्या लोकसभेवर
250) अक्कलकोट विधानसभा - सचिन शेट्टी (भाजप)
251) सोलापूर दक्षिण विधानसभा - सुभाष देशमुख (भाजप)
252) पंढरपूर विधानसभा - समाधान अवताडे (भाजप)
253) सांगोला विधानसभा - शहाजी बापू पाटील (शिवसेना - एकनाथ शिंदे)
254) माळशिरस विधानसभा - राम सातपुते (भाजप)

### सातारा जिल्हा :

255) फलटण विधानसभा - दीपक चव्हाण (राष्ट्रवादी - अजित पवार)
256) वाई विधानसभा - मकरंद पाटील (राष्ट्रवादी - अजित पवार)
257) कोरेगाव विधानसभा - महेश शिंदे (शिवसेना- एकनाथ शिंदे)
258) माण विधानसभा - जयकुमार गोरे (भाजप)
259) कराड उत्तर विधानसभा - बाळासाहेब पाटील (राष्ट्रवादी - शरद पवार)
260) कराड दक्षिण विधानसभा - पृथ्वीराज चव्हाण (काँग्रेस)
261) पाटण विधानसभा - शंभूराज देसाई (शिवसेना - एकनाथ शिंदे)
262) सातारा विधानसभा - शिवेंद्रराजे भोसले (भाजप)

### रत्नागिरी जिल्हा :

263) दापोली विधानसभा - योगेश कदम (शिवसेना - एकनाथ शिंदे)
264) गुहागर विधानसभा - भास्कर जाधव (शिवसेना- उद्धव ठाकरे)
265) चिपळूण विधानसभा - शेखर निकम (राष्ट्रवादी - अजित पवार)
266) रत्नागिरी विधानसभा - उदय सामंत (शिवसेना - एकनाथ शिंदे)
267) राजापूर विधानसभा - राजन साळवी (शिवसेना - उद्धव ठाकरे)

### सिंधुदुर्ग जिल्हा :

268) कणकवली विधानसभा - नितेश राणे (भाजप)
269) कुडाळ विधानसभा - वैभव नाईक (शिवसेना - उद्धव ठाकरे)
270) सावंतवाडी विधानसभा - दीपक केसरकर (शिवसेना - एकनाथ शिंदे)

### कोल्हापूर जिल्हा :

271) चंदगड विधानसभा - राजेश नरसिंग पाटील (राष्ट्रवादी - अजित पवार)
272) राधानगरी विधानसभा - प्रकाश आबिटकर (शिवसेना - एकनाथ शिंदे)
273) कागल विधानसभा - हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी - अजित पवार)
274) कोल्हापूर दक्षिण विधानसभा - ऋतुराज पाटील (काँग्रेस)
275) करवीर विधानसभा - पी एन पाटील सडोलीकर(काँग्रेस) - निधन
276) कोल्हापूर उत्तर विधानसभा - जयश्री जाधव (काँग्रेस)
277) शाहूवाडी विधानसभा - विनय कोरे (जनसुराज्य)
278) हातकणंगले विधानसभा - राजू आवळे (काँग्रेस)
279) इचलकरंजी विधानसभा - प्रकाश आवाडे (अपक्ष)
280) शिरोळ विधानसभा - उल्हास पाटील (शिवसेना - उद्धव ठाकरे)

### सांगली जिल्हा :

281) मिरज विधानसभा - सुरेश खाडे (भाजप)
282) सांगली विधानसभा - सुधीर गाडगीळ (भाजप)
283) इस्लामपूर विधानसभा - जयंत पाटील (राष्ट्रवादी - शरद पवार)
284) शिराळा विधानसभा - मानसिंग नाईक (राष्ट्रवादी - शरद पवार)
285) पलूस कडेगाव विधानसभा - डॉ. विश्वजीत कदम (काँग्रेस)
286) खानापूर विधानसभा - अनिल बाबर (शिवसेना) - निधन
287) तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा - सुमनताई पाटील (राष्ट्रवादी - शरद पवार)
288) जत विधानसभा - विक्रम सावंत (काँग्रेस)

# विमानतळावर उन्हाळ्यात सुरू होणार अखंडित उड्डाणे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत, केंद्रीय नागरी उड्डयन मंत्री किंजरापू राममोहन नायडू व केंद्रीय नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळाच्या धावपट्टीच्या रिकार्पेटिंगचे काम 31 मार्च 2025 पूर्वी करण्याचे व उड्डाण मार्गांचा विस्तार करण्याचे आश्वासन दिले. असोसिएशन फार इंडिस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडी)ने त्यासंदभार्तील मागणी लावून धरली होती व या प्रकरणात लक्ष घालण्याची नितीन गडकरी यांना शिफारस केली होती.

दिल्ली येथे झालेल्या या बैठकीला नागरी उड्डाण मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी तसेच, एआयडीचे अध्यक्ष आशीष काळे, उपाध्यक्ष गिरधारी मंत्री, कार्यकारी सचिव पंकज भोकरे आणि वरिष्ठ कार्यकारी अधिकारी विजय फडणवीस उपस्थित होते. आशिष काळे यांनी हवाई भाडे कमी व्हावे, सोयीस्कर उड्डाण वेळापत्रक असावे आणि अधिक उड्डाणे शक्य व्हावी, यासाठी 31 मार्चपर्यंत धावपट्टीचा रिकार्पेटिंग प्रकल्प पूर्ण करण्याच्या निकडीवर या बैठकीत भर दिला. त्यावर नागरी उड्डयन मंत्र्यांनी 1 एप्रिल ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत अखंडित उन्हाळी उड्डाण वेळापत्रकाची खात्री करून, मूळ नियोजित 30 एप्रिल ऐवजी 31 मार्च 2025 पूर्वी धावपट्टीचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.



## नितीन गडकरींचा पुढाकारामुळे एआयडीच्या प्रयत्नांना यश

एआयडीने सिंगापूर, बँकॉक किंवा क्वाला लंपर सारख्या दक्षिण पूर्व आशियातील हबशी थेट कनेक्टिव्हिटीची तातडीची गरज परत एकदा अधोरेखित केली. त्यामुळे संपूर्ण आशिया, ऑस्ट्रेलिया आणि यूएसएच्या पश्चिम किनारपट्टीमध्ये विदर्भ प्रदेशाची कनेक्टिव्हीटी वाढून व्यवसायाला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. एआयडीने दुबई, अबू धाबी आणि रियाध या मार्गांचा युरोप, आफ्रिका आणि अमेरिका यांच्याशी संपर्क वाढवण्यासाठी आणखी विस्तार करण्याची देखील यावेळी शिफारस केली.

धावपट्टीच्या कामातील विलंबामुळे फ्लाइट ऑपरेशनवर लक्षणीय परिणाम झाला असून विमानांची संख्या कमी झाली आहे. त्याचा विदर्भ प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर विशेषतः पर्यटन आणि कृषी हंगामावर त्यांचा विपरित परिणाम झाला आहे. उड्डाणे कमी केल्यामुळे विमान भाड्यातही वाढ झाली असून जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार पडला आहे. नागपूर विमानतळावरील मर्यादित कामकाजाच्या तासांमुळे दर आठवड्याला सुमारे 70 उड्डाणांचे नुकसान होत असून प्रकल्प वेळेवर पूर्ण झाला नाही तर आणखी नुकसान होण्याची शक्यता असल्यामुळे एआयडीने या प्रकरणात श्री नितीन गडकरी यांनी हस्तक्षेप करावा, अशी विनंती केली होती.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयाचे सचिव वुमलुनमंग वुलनम; एम. सुरेश, अध्यक्ष (अतिरिक्त प्रभार), भारतीय विमानतळ प्राधिकरण (एएआय) अनिल कुमार गुप्ता, सदस्य (नियोजन), एएआय आणि संचालक बोर्ड ऑफ मल्टी मॉडेल इंटरनॅशनल कार्गो हब आणि नागपूर (मिहान) विमानतळ; श्री अबिद रुही, वरिष्ठ विमानतळ संचालक, मिहान; आणि कुमार रंजन ठाकूर, सीएस आणि सीएफओ, मिहान इंडिया लिमिटेड; श्रीमती. स्वाती पांडे, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी), आणि संजय सेठी, अतिरिक्त मुख्य सचिव, परिवहन आणि बंदर/सामान्य प्रशासन विभाग (नागरी विमान वाहतूक), महाराष्ट्र सरकार, हे देखील या बैठकीत ऑनलाइन सहभागी झाले होते. एआयडीच्या चमूने या आश्वासनाकरिता केंद्रीय व राज्य नागरी उड्डयन मंत्री आणि केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानले आहेत.

# नागपूर विभागात दक्षता जनजागृती सत्राचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

नागपूर विभागाने 16 ऑगस्ट 2024 ते 15 नोव्हेंबर 2024 या कालावधीत प्रतिबंधात्मक दक्षतेवर लक्ष केंद्रित करणारी तीन महिन्यांची व्यापक मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून 18 ऑक्टोबर 2024 रोजी मध्य रेल्वे, नागपूर डीआरएम कार्यालयाच्या समाधान बैठक कक्षात माहितीपूर्ण चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षीच्या दक्षता जनजागृती कार्यक्रमाची थीम "राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती" आहे.

मुंबई मुख्यालयातील दक्षता अधिकाऱ्यांच्या उपस्थितीने या चर्चासत्राला आनंद झाला. कार्यक्रमाची सुरुवात मनीष अग्रवाल यांनी श्री प्रतीक गोस्वामी, SDGM दक्षता, मुंबई उरळट यांचे स्वागत करून झाली. स्वागतानंतर, उपस्थितांना प्रख्यात वक्त्यांच्या चमूने दक्षता जनजागृतीवर एक अंतर्दृष्टीपूर्ण पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन दिलेः प्रदीप एस पोळ, अभियांत्रिकी, अमित जोशी, हेमंत जिंदाल, डेप्युटी सीव्हीओ/इलेक्ट्रिकल, चंद्रकांत व्ही. कदम आणि प्रदीप एस. हिरडे, डेप्युटी सीव्हीओ/टी. प्रेझेंटेशनमध्ये आचार नियम आणि अभियांत्रिकी, स्टोअर्स, कार्मिक, सिग्नल, इलेक्ट्रिकल, वैद्यकीय आणि वाणिज्य यासारख्या विविध विभागांमधील केस स्टडीजसह अनेक महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश आहे. संवादात्मक आणि समृद्ध अनुभवाला चालना देण्यासाठी, परिसंवादाच्या शेवटी डायनॅमिक प्रश्न आणि उत्तर सत्र आयोजित केले गेले. उल्लेखनीय भाषणात, डीआरएम मनीष अग्रवाल यांनी पारदर्शक आणि निंदनीय निर्णय घेण्याच्या महत्त्वावर भर दिला आणि निर्णय भारतीय रेल्वेच्या सर्वोत्तम हितासाठी आहेत याची खात्री केली.

कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण झाल्याबद्दल रुपेश टी. चांदेकर, एडीआरएम (टी) नागपूर यांच्या आभार प्रदर्शनाने सत्राची सांगता झाली. कार्यक्रमाचे संचालन वरिष्ठ डीपीओ श्रीमती सांझी जैन यांनी केले.

प्रमुख उपस्थितांमध्ये पी.एस. खैरकर, एडीआरएम (ए), आणि रुपेश टी. चांदेकर, एडीआरएम (टी), यांच्यासह नागपूर विभागातील सर्व शाखा अधिकारी आणि अनेक अधिकारी आणि पर्यवेक्षक. हा उपक्रम नागपूर विभागाच्या कामकाजात दक्षता, सचोटी आणि पारदर्शकतेचे वातावरण निर्माण करण्याची वचनबद्धता अधोरेखित करतो.

# सोन्याच्या दरात वाढ

**नागपूरः** शनिवारी (१९ ऑक्टोबर) दुपारी सोन्याच्या दराने सर्वोच्च दराचा नवीन विक्रम नोंदवला आहे. दरम्यान, दिवाळीतही सोन्याचे दर वाढण्याचे संकेत असल्याने दागिने खरेदीसाठी इच्छुकांमध्ये चिंता वाढली आहे. सणासुदीत नागपूरसह देशभरात दागिने खरेदी करणाऱ्यांची संख्या वाढते. तर लग्न समारंभ, बारसेसह इतरही अनेक कार्यक्रमात नागरिक भेट म्हणून सोने- चांदीच्या वस्तू देतात. त्यामुळे अनेकांचे दिवाळीतील सोन्याच्या दराकडेही लक्ष असते.

नवरात्रीपूर्वी ३० सप्टेंबरला नागपुरातील सराफा बाजारात सोन्याचे दर सकाळी ११ वाजता २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७५ हजार ९०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७० हजार ६०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५९ हजार २०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४९ हजार ३०० रुपये नोंदवले गेले. परंतु त्यानंतर सोन्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. दरम्यान आता दिवाळी तोंडावर आहे. या सणामध्ये मोठ्या संख्येने ग्राहक दागिने खरेदी करतात. परंतु सोन्याच्या दरात मोठी वाढ झाल्यामुळे ग्राहकांमध्ये चिंता वाढली आहे.

नागपुरातील सराफा बाजारात शनिवारी (१९ ऑक्टोबर) दुपारी सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७८ हजार रुपये, २२ कॅरेटसाठी ७२ हजार ५०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६० हजार ८०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५० हजार ७०० रुपये नोंदवले गेले. तर प्लॅटिनमचेही दरही १९ ऑक्टोबरला सकाळी ४४ हजार रुपये प्रति दहा ग्राम नोंदवले गेले. दरम्यान हल्लीच्या सोन्याच्या दरातील मोठ्या बदलामुळे सराफा व्यवसायिकांमध्येही चिंता वाढली आहे.

परंतु सराफा व्यवसायिकांकडून मात्र हे दर आणखी वाढण्याचे संकेत असून आताच्या काळात सोने- चांदीमध्ये गुंतवणूक लाभदायक असल्याचा दावा केला जात आहे. दिवाळीच्या काळात सोने-चांदीच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# 'सोबत'च्या बहिणींसाठी दिपावली स्नेहमिलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :

२०१९-२० या वर्षी उद्भवलेल्या कोरोनाच्या संकटामुळे अनेक भगिनींचे संसार उघड्यावर पडले, अनेक मुलांच्या डोक्यावरील छत्र हरपले. अशा संकटसमयी पुढे येऊन श्री. सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट द्वारे संचालित सोबत पालकत्व प्रकल्पाने २७३ भगिनींची त्यांच्या मुलाबाळांसह जबाबदारी स्वीकारली. या सर्व भगिनींकरिता दिवाळीनिमित्त दिपावली स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन रविवारी २० ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे.

सुरेंद्रनगर आरपीटीएस रोड येथील जेरिल लॉनमध्ये सायंकाळी ५ वाजता दैनिक महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री. श्रीपाद अपराजीत आणि दैनिक नवभारतचे संपादक संजय तिवारी यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपावली स्नेहमिलन कार्यक्रम पार पडेल, अशी माहिती सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट चे अध्यक्ष माजी महापौर संदीप जोशी यांनी दिली आहे.

कोरोना महामारीमध्ये अनेक भगिनींना वैधव्य प्राप्त झाले. अशा २७३ परिवारांचे पालकत्व श्री. सिध्दिविनायक सेवा ट्रस्ट द्वारा संचालित 'सोबत' पालकत्व प्रकल्पाच्या माध्यमातून घेण्यात आले आहे. दरवर्षी अशा बहिणींना दिपावली स्नेहमिलन म्हणून त्या महिन्याचे रेशन, दिवाळीचे गोड-धोड, फराळ, त्यांच्या मुलांकरिता फटाके, बहिणींना साडी देऊन एकत्रित भोजनाचा आनंद घेतला जातो. यावर्षी देखील सोबत परिवारातील २७३ बहिणींसोबत दिपावली मिलन कार्यक्रम साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला सर्व भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन देखील संदीप जोशी यांनी केले आहे.

दिपावली मिलन कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता सोबत प्रकल्पाचे ज्योत्स्ना कुहेकर, आनंद टोळ, प्रकाश रथकंठीवार, प्रणय मोहबंशी, प्रिती आखरे, स्मिता दिक्षीत सहकार्य करीत आहेत. कोरोनामुळे छत्र हरपलेल्या २७३ भगिनींचा संसार सावरण्याची जबाबदारी सोबत पालकत्व प्रकल्पाने घेतली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून या सर्व परिवारातील मुलांच्या शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराची जबाबदारी स्वीकारण्यात आली आहे. रविवारी २० ऑक्टोबर रोजी दिपावली मिलन कार्यक्रमामध्ये बहिणींना साडी, मुलांना फटाके, गोडधोड, फराळ आणि महिनाभराचे रेशन देऊन भाऊबीज दिली जाणार आहे. दिवाळीची एका बहिणीची भेट ही एकूण २१०० रुपयांची आहे.

यासाठी समाजातील दानशूर आणि सेवाभावी नागरिकांनी पुढे आल्यास सोबतच्या कायार्ला मोठी साथ मिळेल, असे आवाहन श्री. सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट चे अध्यक्ष माजी महापौर श्री. संदीप जोशी यांनी केले आहे. दानशूर व्यक्तींना आयडीबीआय बॅंकेच्या लक्ष्मीनगर शाखेतील श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट सोबत, खाते क्रमांक - 0663104000114363 या बॅंक खात्यामध्ये सहकार्य राशी जमा करता येईल.

# रेसर दुचाकी सूसाट
## दामटणाऱ्यांची शहरात वाढली गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :

शहरात भरधाव वाहन चालवणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून धूम स्टाईल वाहने पळवणाऱ्यांची हिंमत वाढत आहे. गेल्या दहा महिन्यांत वाहतूक पोलिसांनी १६ हजार ४५१ वाहनांवर कारवाई केली. १७ लाखांपेक्षा जास्त रुपयांचा दंड वसूल केला आहे.

वाहतूक पोलीस नसलेल्या सिग्नलवर अनेक वाहनचालक लाल दिवा लागलेला असतानाही वाहने सुसाट पळवत असतात. वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांचे धाडस दिवसेंदिवस वाढत आहे. शहरात वाहनांची संख्या वाढल्याने रस्त्यावरही वाहनांची गर्दी होत आहे.

भरधाव वाहन चालवणाऱ्यांमध्ये महाविद्यालयीन तरुण-तरुणींचे प्रमाण जास्त आहे. जानेवारी ते १४ ऑक्टोबर या कालावधीत वाहतूक पोलिसांनी भरधाव वाहन चालवणाऱ्या १६ हजार ४५१ चालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई केली.

गेल्यावर्षी वाहतूक पोलिसांनी १३ हजार ३३ वाहनचालकांविरुद्ध वेगमयार्देचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई केली होती. या कारवाईनंतर वाहनचालकांत वचक निर्माण व्हायला हवा होता. मात्र, सुसाट वाहन चालवणाऱ्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे.

सीताबर्डी, महाल, इतवारी, संत्रा मार्केट आणि धरमपेठ अशा गर्दीच्या ठिकाणी आणि गजबजलेल्या परिसरातही वाहने सुसाट चालवली जात आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढता वाढत आहे.

ऑक्टोबर महिन्यांपर्यंत जवळपास सहाशेवर अपघात झाले असून त्यामध्ये दीडशेवर जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

शहरातील सीताबर्डी, महाल, इतवारी, संत्रा मार्केट आणि धरमपेठ अशा गर्दीच्या ठिकाणी आणि गजबजलेल्या परीसरात रस्त्यावरुनही वाहने सुसाट चालविल्या जात आहेत. त्यामुळे अपघाताचा धोका वाढत आहे.

# नागपूर रेल्वे स्थानकावर फूड प्लाझाचे उद्घाटन

**नागपूर :** नागपूर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक 1 (पश्चिम बाजू) येथे अत्याधुनिक फूड प्लाझाचे आज उद्घाटन करण्यात आले. प्रख्यात ब्रँड हल्दीरामद्वारे समर्थित नवीन मल्टी-फ्लोअर फूड प्लाझा आता प्रवाशांसाठी खुला आहे आणि चोवीस तास उच्च दर्जाची खाद्य सेवा देण्यासाठी सज्ज आहे. डायन-इन आणि टेकवे या दोन्ही सुविधांच्या उपलब्धतेसह प्रवाशांचा अनुभव सुधारणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. फूड प्लाझा चालवण्याचे कंत्राट हल्दीरामला 9 वर्षांच्या कालावधीसाठी देण्यात आले आहे, प्रवाशांच्या सोयीसाठी सुसज्ज रेस्टॉरंट आणि शौचालय आहे. या विकासामुळे नागपूर स्थानकावर उपलब्ध सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. यापूर्वी, कॉमसोम द्वारे संचालित फूड प्लाझा कराराच्या शरणागतीनंतर एप्रिल 2023 पासून कार्यरत नव्हता.

# द अनटोल्ड स्टोरी ऑफ अ रायटर या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १९ :



युवा लेखिका कुमारी पृथा प्रवीण लवाळे यांनी लिहिलेल्या "THE UNTOLD STORY OF A WRITER" या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ मंगळवार दि. २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी सायं. ५.३० वाजता महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुलातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन माजी राज्य माहिती आयुक्त राहूल पांडे यांच्या हस्ते व दै. तरुण भारत डिजीटलचे संपादक शैलेश पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी राहतील.

या पुस्तक प्रकाशन समारंभा प्रसंगी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन विदर्भ गौरव प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.

# सरस्वती शिशु मंदिर जयताळा येथे स्टीम लॅबचे उद्घाटन

**नागपूर :** सरस्वती शिशु मंदिर, प्रसाद नगर, जयताळा येथे स्टीम लॅबचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा उपक्रम स्टीम व्हिजन फाउंडेशन, दिल्लीच्या अंतर्गत राबविण्यात येत असून, देवदत्त पंडित हे स्थानिक प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. स्टीम शिक्षण म्हणजे विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, आणि कला यांचा संगम आहे, ज्याद्वारे मुलांना तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवकल्पना आणि सर्जनशीलतेची संधी मिळते. स्टीम शिक्षण पद्धतीद्वारे मुलांना कंप्युटरच्या बेसिक नॉलेजपासून ते कोडींग, एआय टूल्स, रोबोटिक्स, ब्रेन स्ट्रॉमिंग, नवीन ॲप तयार करणे, आणि ड्रोन मेकिंग यासारख्या तंत्रज्ञानाचे शिक्षण दिले जाणार आहे. ही पद्धत "लर्निंग बाय डूइंग" आणि "डूइंग बाय लर्निंग" या तत्त्वावर आधारित असून, मुलांना थेट प्रयोगांद्वारे शिक्षण घेता येईल. उद्घाटन समारंभात शाळेचे विश्वस्त वाघमारे सर यांच्या हस्ते सत्राची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाची प्रस्तावना मुख्याध्यापक भुते मॅडम यांनी केली आणि स्टीम लॅबच्या महत्त्वाची ओळख करुन दिली. गाडगे देखील कार्यक्रमात विशेष उपस्थित होते. शाळेचे विश्वस्त प्रशांत बोपर्डीकर यांनी या उपक्रमासाठी विशेष सहाय्य केले, ज्यामुळे हा उपक्रम यशस्वीपणे राबवता आला. वर्षभर या स्टीम लॅबमध्ये मुलांसाठी विविध कार्यशाळा आणि उपक्रम आयोजित केले जातील. मुलांना नवतंत्रज्ञानाचा गहन अभ्यास करण्याची आणि भविष्यातील संधींचा लाभ घेण्याची ही एक अनोखी संधी आहे. या स्टीम लॅबच्या माध्यमातून विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात अधिक सुसज्ज होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# इंदिरा गांधी रुग्णालयातील फिजिओथेरपी विभागाचे लोकार्पण



दिव्यांग आणि ज्येष्ठांसाठी केंद्रात निःशुल्क सेवा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :

नागपूर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातर्फे दिव्यांग आणि ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी फिजिओथेरपी केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहेत.

केंद्रामध्ये दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना सेवा निःशुल्क असून, इतरांना अत्यंत माफक दरात सेवा उपलब्ध असणार आहे. तरी नागरिकांनी यासेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी केले.

डॉ.अभिजीत चौधरी यांच्या हस्ते मनपाच्या इंदिरा गांधी रुग्णालयातील फिजिओथेरपी विभागाचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी मनपात अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, धरमपेठ झोनचे सहाय्यक आयुक्त प्रकाश वराडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, इंदिरा गांधी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. मंगला पुरी, झोनल अधिकारी डॉ. बकुल पांडे, डॉ. सुषमा खंडागळे, डॉ. मयुरी सोनटक्के, डॉ. मोहम्मद अतहर, डॉ. गाडावे, डॉ. अदिती कच्छवे यांच्यासह इतर अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करीत मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा मिळावी याकरिता कर्मचाऱ्यानी आपले कर्तव्य योग्यरीत्या करवे, मनपाच्या या फिजिओथेरपीची केंद्रांचा फायदा दिव्यांग, ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व बालक यांना होणार आहे. आशा अंगणवाडी सेविकांमार्फत नागरिकांना या केंद्राची माहिती मिळावी आणि नागरिकांनी या केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

यावेळी इंदिरा गांधी रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. मंगला पुरी यांनी सांगितले की, या पूर्वी रुग्णालयात खाजगी तत्त्वावर फिजिओथेरपी केंद्र सुरू होते. पण काही कारणाने हे केंद्र बंद करण्यात आले. आता ६ वर्षांनी पुन्हा हे केंद्र कार्यान्वित होत असून, नागरिकांना याचा नक्कीच फायदा होणार आहे. डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांनी रुग्णालयाच्या विविध सेवांचा आढावा घेत रूग्णालयाची पाहणी केली.

फिजिओथेरपी ही एक विज्ञान-आधारित आरोग्य सेवा आहे जी लोकांना सामान्यपणे हलण्यास आणि कार्य करण्यास मदत करते. यात अनेक प्रकारच्या उपचारांचा समावेश असू शकतो. दिव्यांग व्यक्तीप्रमाणे वृध्द व्यक्ती, गरोदर स्त्रिया, गंभीर आजार असलेले रुग्ण यांना देखील शारीरिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी फिजिओथेरपी सेवेची आवश्यकता भासते.

याची जाणीव ठेवत मनपाद्वारे इंदिरा गांधी रुग्णालय गांधीनगर, पाचपावली सूतिकागृह ,सदर रोग निदान केंद्र आणि महाल रोग निदान केंद्र येथे फिजिओथेरपी केंद्र सुरु करण्यात आले आहे.

फिजिओथेरपी केंद्रावर मॅन्युअल थेरपीः- वेदना, जडपणा आणि सूज मध्ये मदत करण्यासाठी सांधे मोबिलायझेशन, मसाज आणि स्ट्रेचिंगचा समावेश आहे. व्यायाम :- मूळ समस्यांवर उपचार करण्यास मदत करते. ट्रान्सक्युटेनियस इलेक्ट्रिकल नर्व्ह स्टिम्युलेशन (टीईएनएस) थेरपीः फिजिओथेरपीमध्ये वापरली जाणारी उपचार पद्धती, याव्यतिरिक्त चुंबकीय थेरपी, ड्राय सुईलिंग आणि ॲक्युपंक्चर, टेपिंग, हायड्रोथेरपी, डायथर्मी, अल्ट्रासाऊंड आणि फोनोफोरेसीस सुविधा उपलब्ध असणार आहे, हे विशेष.

# मध्य रेल्वे प्रवाशांना प्रवासादरम्यान आणि स्थानकांवर त्वरित वैद्यकीय मदत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :

मध्य रेल्वेचा नागपूर विभाग रेल्वे प्रवासादरम्यान आणि स्थानकांवर तत्पर आणि कार्यक्षम वैद्यकीय मदत सेवा देऊन प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आहे. आरोग्यविषयक समस्यांचे त्वरीत निराकरण करण्यासाठी वचनबद्ध, विभागाने यशस्वीपणे सक्रिय उपाययोजना राबवल्या आहेत ज्यामुळे गरजू प्रवाशांना वेळेवर वैद्यकीय सहाय्य मिळू शकेल.

जुलै 2024 ते 15 ऑक्टोबर 2024 पर्यंत, नागपूर विभागाच्या वैद्यकीय पथकाने 1,013 प्रवाशांना भेट दिली, ज्यांना किरकोळ अस्वस्थतेच्या प्रकरणांपासून ते गंभीर आणीबाणीपर्यंत वैद्यकीय उपचारांची आवश्यकता होती. गरजू प्रवाशांना अत्यावश्यक आरोग्य सेवा सहाय्य पुरवण्यावर विभागाचे जोरदार लक्ष हे यावरून दिसून येते. विभागाच्या वैद्यकीय सहाय्य सेवांमध्ये केंद्रस्थानी प्रशिक्षित वैद्यकीय व्यावसायिकांची तरतूद आहे जी प्रवाशांच्या वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी सहज उपलब्ध आहेत. प्रवासादरम्यान वैद्यकीय आणीबाणीचा सामना करणाऱ्या प्रवाशांना 139 डायल करून आपत्कालीन हेल्पलाइनचा वापर करण्यास प्रोत्साहित केले जाते. हेल्पलाइन प्रतिसादकर्ते परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी आणि जवळच्या स्थानकावर वैद्यकीय पथकांची व्यवस्था करण्यासह आपत्कालीन मदत समन्वयित करण्यासाठी सज्ज आहेत. शिवाय, प्रवासी ट्रेन तिकीट परीक्षकांची मदत घेऊ शकतात, जे पुढील कारवाईसाठी नियंत्रण कक्षाला तत्काळ माहिती पाठवतात. डॉक्टर ट्रेनच्या आगमनापूर्वी स्थानकांवर तैनात केले जातात, आवश्यकतेनुसार वेळेवर वैद्यकीय हस्तक्षेप सुनिश्चित करतात.

मध्य रेल्वे नागपूर विभाग प्रवासी सुरक्षेच्या सर्वोच्च मानकांचे पालन करण्यासाठी समर्पित आहे आणि वैद्यकीय मदत सेवा वाढवण्यासाठी नाविन्यपूर्ण मार्ग शोधत आहे.

# महर्षी वाल्मीकी जयंती निमित्त म.न.पा. व्दारा अभिवादन

**नागपूरः** वाल्मीकी रामायण या महाकाव्याव्दारे प्रभू रामचंद्राचे जीवनचरित्र सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून समाजामध्ये आदर्श राज्याची संकल्पना साकारणारे रामायण रचयिता महर्षी वाल्मीकी यांच्या जयंती निमित्त म.न.पा.केन्द्रीय कार्यालयातील महर्षी वाल्मीकी यांच्या तैलचित्राला अति. आयुक्त अजय चारठाणकर यांनी पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.

या प्रसंगी उपायुक्त श्रीमती विजया बनकर, उपायुक्त श्री. गजेंद्र महल्ले, अधिक्षक श्री. राजकुमार मेश्राम, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, प्रमोद हिवसे, अमोल तपासे, शैलेश जांभुळकर तसेच वाल्मीकी महासभेचे मोतीलाल जनवारे, प्रकाश चमके, शशी सारवान, राजा मस्ते, दुर्गेश खरे, राजेश हातिबेड, अनिल बागडे, अजित जाधव, आदी उपस्थित होते.

महासागर रविवारचा

# नुसतं माझा धर्म भारी म्हणून चालत नसतं

**बाहेरून आलेल्या पारसींनी पुण्यात हॉस्पिटल्स उभारली आणि अख्खं गाव जगवलं. मुळचे पर्शियाचे म्हणून त्यांना आपण पारसी म्हणतो. पर्शिया म्हणजे आजचे इराण. तिथेच झोराष्ट्रीयन हा समाज जन्माला आला. या धर्माला हजारो वर्षांची परंपरा आहे. पण हे पारसी भारतात कसे आले याची एक कथा सांगितली जाते.**

---------------

अस म्हणतात की शेकडो वर्षापूर्वी मुस्लीम अरब टोळ्यांनी पर्शियावर आक्रमण केले. धर्मांतर करू लागले. जुलमी आक्रमकांना तोंड देण्याएवढी ताकद या झोराष्ट्रीयन समाजाकडे नव्हती. यातूनच मोठ्या प्रमाणात स्थलांतर होऊ लागले.

अशीच एक जहाजात भरून निघालेल्या पारशी कुटुंबांची नौका गुजरातला नवसारी इथल्या किनाऱ्यावर येऊन पोहचली. तिथल्या राजा समोर त्यांना उभं करण्यात आलं. त्यांचा म्हातारा प्रमुख समोर आला. राजाला व त्याला एकमेकांची भाषा येत नव्हती.

राजाने एक दुधाने काठोकाठ भरलेला पेला मागवला आणि त्या पर्शियन लोकांच्या प्रमुखाला सुचवलं की आमचा देश असा काठोकाठ भरलेला आहे आता आम्हाला आणखी माणसे नकोत.

तेव्हा तो पारसी माणूस हसला. त्याने त्या दुधात थोडेसे मध टाकले. त्याचा अर्थ होता की आम्ही इथे दुधात मध मिसळल्या प्रमाणे राहू व या देशाची गोडी वाढवू. राजा खुश झाला. त्याने पारसी लोकांना भारतात राहण्याची परवानगी दिली.

पारसी लोक बुद्धिमान होते, उद्यमी होते. ते गुजरात बाहेर पडले, देशभर पसरले. इथल्या मातीशी एकरूप झाले. ब्रिटीश भारतात आले तेव्हा पारसी लोकांनी त्यांची भाषा शिकून घेतली. याचा त्यांना प्रचंड फायदा झाला. ब्रिटीशांच्या मुंबईसारख्या महानगरात त्यांनी बस्तान बसवलं. आधुनिक शिक्षणपद्धतीचा स्वीकार केला. अनेक पारसी कुटुंबांनी आपल नाव कमवलं. पैसा कमावला.

पण पारसी फक्त पैशांच्या मागे लागलेले नव्हते. हजारो वर्षांपूर्वी आपल्यावर झालेला अन्याय, हालअपेष्टा ते विसरले नाहीत. आपल्या इतिहासाची जाणीव ठेवली त्यामुळे जिथे जातील तिथे आपल्या कमाईतला वाटा समाजाला काही तरी देण्यासाठी वापरला.

पुण्यात ब्रिटीशांनी लष्करी छावणी उभारली तेव्हा त्यांच्या मदतीसाठी इंग्रजी भाषा जाणनारे स्थानिक कर्मचारी लागणार होते. त्यांनी उच्चशिक्षित पारसी लोकांना पुण्यात आणलं. बऱ्यापैकी कॅम्पच्या भागात हे पारसी वसले. इथले आल्हाददायक हवामान त्यांना मानवलं. त्यामुळे अनेक पारसी कुटुंबांनी आपले बिऱ्हाड पुण्यात कायमच हलवलं.

पारसीप्रमाणेच आपला देश सोडून परागंदा झालेले बगदादचे ज्यू डेव्हिड ससून हे देखील भारतात आले होते. व्यापारात त्यांनी व त्यांचे पारसी पार्टनर जमशेदजी जीभॉय यांनी प्रचंड पैसा कमावला होता. यातूनच पुण्यात पहिले हॉस्पिटल उभे राहिले. त्याला त्यांचे नाव देण्यात आले, डेव्हिड ससून रुग्णालय.

पुण्यात १८६७ साली डेव्हिड ससून रुग्णालय उभे राहिले. हे हॉस्पिटल उभे राहत असताना एक पारसी उद्योजक बैरामजी जीजीभोय हे मुंबईहून पुण्याला आले होते. त्यांनी मुंबईत अनेक शिक्षण संस्था उभारल्या होत्या. जीजीभोय यांनी पुण्यात ससून रुग्णालयाच्या शेजारी एक छोट वैद्यकीय प्रशिक्षण केंद्र उभ केलं. त्याला त्यांचच नाव देण्यात आलं. १८७१ साली स्थापन झालेलं हे वैद्यकीय प्रशिक्षण केंद्र पुढे जाऊन पुण्याचे सुप्रसिद्ध बी. जे. मेडिकल कॉलेज बनलं.

एकोणिसाव्या शतकात पुण्याला प्लेग सारख्या रोगराईने चांगलंच सतवलं होत. इंग्रजांच्या राज्यात पुण्यात आरोग्य सेवा म्हणाव्या तशा सुधारलेल्या नव्हत्या. अजूनही लोक वैद्य, हकीम यांच्यावर अवलंबून असायचे. ससून सोडले तर मोठे रुग्णालय नव्हते.

याकाळात छोटी छोटी पारसी रुग्णालये उभी राहत होती. असाच एक दवाखाना चालवणाऱ्या एडलजी कोयाजी यांनी एक हॉस्पिटल बांधायचं ठरवलं. पारसी समाजातील उद्योगपती पुढे आले. वाडियांनी त्यांना पैशांची मदत केली. तर सर कोवासजी जहांगीर व लेडी हिराबाई या दांपत्याने जागा दिली अत्याधुनिक हॉस्पिटल उभारून दिलं. या हॉस्पिटलला त्यांच्या मुलाचं जहांगीरच नाव देण्यात आलं.

१९४६ साली त्या काळच्या सर्वोत्तम सेवा सर्वसामान्य रुग्णांना अत्यल्पदरात उपलब्ध करून देण्याचा जहांगीर हॉस्पिटलमध्ये प्रयत्न करण्यात आला होता. याच जहांगीर हॉस्पिटलमध्ये हृदयरोगावर उपचार करायला केकी बैरामजी हे सुप्रसिद्ध डॉक्टर होते.

त्यांनी अमेरिकेतून हृदयरोगावरील विशेष उपचाराचे प्रशिक्षण घेतलं होतं. पण तिथेच स्थायिक होण्याऐवजी आपल्या मूळ गावी पुण्याला परत आले. जहांगीर हॉस्पिटलमध्ये त्यांचे काही कारणांनी एडलजी कोवासजी यांच्याशी मतभेद झाले. यामुळे केकी बैरामजी यांनी स्वतःच फक्त चार खाटांच एक हॉस्पिटल सुरु केलं.

त्यावेळच्या गव्हर्नरने त्यांना जागा दिली होती. या गव्हर्नरच्या बायकोच्या स्मरणार्थ हॉस्पिटलचं नाव रुबी हॉल क्लिनिक असे करण्यात आले. एकेकाळी ४ बेडचे हॉस्पिटल पुढे जाऊन ७५० बेडचे पुण्यातले सर्वात अत्याधुनिक रुग्णालय बनले.

**अशीच कथा केईएमची**

पुण्याच्या रास्ता पेठेत सरदार मुदलियार यांचं एक छोट प्रसूतीगृह होतं. सर्वसामान्य गरीब रुग्णांचा आधार असलेले हे हॉस्पिटल चालवणे सरदार मुदलियार यांना अवघड चालले होते. त्यांनी जहांगीर हॉस्पिटलच्या एडलजी कोयाजी यांना एखादा तज्ञ डॉक्टर व चांगला प्रशासक मिळवून देण्याची मागणी केली. त्यावेळी एडलजी यांनी प्रसूतीशास्त्रात उच्च पदवी घेतलेल्या आपल्या वहिनीकडे म्हणजेच बानू कोयाजी यांच्याकडे ही जबाबदारी दिली.

काही महिन्यांसाठी लक्ष द्यायचं म्हणून डॉ.बानू कोयाजी यांनी ही जबाबदारी उचलली खरी मात्र केईएम हे पुढच्या आयुष्यभराच हे मिशन बनलं. बानू कोयाजी यांनी केईएमचे कार्यक्षेत्र पुण्याच्या ग्रामीण भागापर्यंत वाढवल. त्यांचं कार्य फक्त वैद्यकीय सेवेपुरत मर्यादित राहिलं नाही तर कुटुंब नियोजनासारखे समाजहिताचे कार्यक्रम जनजागृती अशा अनेक उपक्रमांची जोड दिली.

डॉ. बानू कोयाजी हे पुणेकरांसाठी एक आदराच आणि आपलेपणाचं नाव बनलं. आजही ही जहांगीर पासून ते केईएमपर्यंत अनेक रुग्णालये पुंण्यात तितक्याच कार्यक्षमतेने कार्य करत आहेत. वेळोवेळी येणाऱ्या संकटात मेडिकल इमर्जन्सीमध्ये या हॉस्पिटलनी पुण्याला जगवल आहे. सायरस पूनावाला यांच्यासारखे उद्योगपती औषधनिर्मितीच्या क्षेत्रात जगभरात ओळखले जातात.

प्रत्येक समाज पिढ्यानपिढ्या आपापल्या परंपरा जपत असतो पण पुण्याच्या पारसींनी वैद्यकीय क्षेत्रात छाप पाडून एक वेगळीच ओळख निर्माण केली एक अजरामर पायंडा पाडला.

माझाच धर्म श्रेष्ठ म्हणून माणसं जगत नसतात... प्रत्येक धर्मियांचा आदर हेच भारतीयत्व.... रतन टाटा,आदर पुनावाला, डॉ. बानू कोयाजी, डॉ. होमी भाभा अशा अनेक पारसी धर्मियांनी देशासाठी सर्वस्व अर्पण करुन भारताचा नावलौकिक वाढवला आहे. कोणत्याही जाती धमार्चा द्वेष हे महान लोक करत नाहीत....बघा जमलं तर विचार करा.. इतर धर्मियांनी काय केले, हे सुद्धा ध्यानात घ्या.

■ ■ ■

## मतदारांनी आतातरी सुज्ञ व्हावे....

**वाचक लिहितात**

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या असून, प्रस्थापित पक्षांकडून उद्या, परवा उमदेवारांची यादी जाहीर होईल . पुढील काही दिवसात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी झुंबड उडेल . उमेदवार कार्यकर्त्यांना गाड्याघोड्या आणि काही हजार रूपये देवून शक्तीप्रदर्शन करायला लावतील . बेरोजगारांची फौज तशीही रिकामी आहे . झेंडे धरणे, पोंगे बांधणे यासाठी त्यांचा वापर होईल .

प्रचाराला सुरूवात झाली की हे उमेदवार मतदारांच्या दारांपर्यंत जावून हात जोडतील, पाया पडतील, मीच तुमचा तारणहार म्हणून गयावया करतील . आपण मतदारही हा माझ्या जातीचा, धर्माचा, मार्गातील.. म्हणून त्याने दिलेल्या आमिषाला बळी पडतो . यापूर्वीच्या आमदारांचे प्रगती कार्ड कसे? त्याने मतदारसंघाच्या विकासासाठी खरेच प्रयत्न केलेत का? कारकिर्द जातीधर्माचे राजकारण करण्यात घालवली की काही विकासात्मक कामे केलीत? पाच वर्षात या आमदाराची संपत्ती किती कोटीने वाढली? या सर्व बाबींचा मतदारांनी सूज्ञपणे विचार करूनच आपला लोकप्रतिनिधी निवडायला हवा . अन्यथा पाच वर्षे त्याच्या नावाने बोटं मोडणे, शिव्याशाप देणे एवढेच आपल्या नशिबी येईल . म्हणून, शहाणपणाने निर्णय घ्या.

■ विकास राऊत, नागपूर.

# पवारांच्या 'पॉवर'बाज खेळी

**उत्तरार्ध**

सुप्रिया सुळे 2006 मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्रातून राज्यसभेवर निवडून आल्या होत्या. 2009 मध्ये त्यांनी महाराष्ट्रातील बारामती लोकसभा मतदारसंघातून सार्वत्रिक निवडणूक लढविली आणि 3.36 लाख मतांनी विजय मिळविला.

पुढे 10 जून 2012 रोजी, राष्ट्रवादी काँग्रेस च्या 12 व्या स्थापना दिवसानिमित्त, त्यांनी तरुण मुलींना राजकारणात येण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी मुंबईत ङ्खराष्ट्रवादी युवती काँग्रेस ङ्ख सुरू केली. 2014 आणि 2019 मध्ये त्या महाराष्ट्रातील बारामती लोकसभा मतदार संघातून लोकसभेवर पुन्हा निवडून आल्या.

2009 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची कामगिरी थोडी खालवली 71 आमदारांचा आकडा या निवडणुकीत 62 व आला तर काँग्रेसचे 82 उमेदवार निवडून आले. यावेळी राष्ट्रवादीने उपमुख्यमंत्रीपद स्वीकारत राज्यात आघाडीची सत्ता स्थापन केली. 2009 मध्येही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे 9 खासदार निवडून आले.

2014 मध्ये हे चित्र बदलले. केंद्रात भाजपचे सरकार आले, आणि राज्यात देखील काँग्रेस राष्ट्रवादीला मोठा फटका बसला. राष्ट्रवादीचे केवळ 41 आमदार निवडून आले. तर 2019 च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे 54 आमदार निवडून आले. 2014 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकसभा सदस्याचा आकडा घसरुन 6 वर आला. तर 2019 मध्ये केवळ 5 खासदार निवडून आले.

**तारीक अन्वर बाहेर**

राफेल करारावरील वादामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बाजू घेतल्याने नाराज झालेले पक्षाचे खासदार तारीक अन्वर यांनी 2018 मध्ये तडकाफडकी राजीनामा दिला. अन्वर यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरचिटणीसपदाचाही राजीनामा दिला. तारीक अन्वर हे बिहारमधील कटिहार येथून लोकसभेवर निवडून गेले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे ते निकटवर्तीय मानले जातात. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून अन्वर पवार यांच्यासोबत होते.

राफेल करारामध्ये पंतप्रधान मोदी यांच्या हेतूंबद्दल काहीही शंका नाही, असे विधान शरद पवार यांनी केले होते. त्यावर अन्वर नाराज झाले होते. राफेल करारामध्ये पंतप्रधान मोदीही सहभागी आहेत. आतापर्यंत मोदी स्वतःला निर्दोष सिद्ध करू शकलेले नाहीत.

फ्रान्सच्या माजी अध्यक्षांच्या विधानावरून या करारामध्ये गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट होत आहे, असे अन्वर यांनी सांगितले. 'असे असताना माज्या पक्षाने पंतप्रधान मोदी यांचा बचाव करणे असमर्थनीय आहे. त्यामुळे मी पक्षाचा आणि लोकसभेतील खासदारकीचा राजीनामा देत आहे, असे अन्वर यांनी जाहीर केले.

**रोहित पवार झाले आमदार**

रोहित पवार हे शरद पवारांचे सख्खे भाऊ अप्पासाहेब पवार यांचे नातू आहेत. रोहित पवार हे राजकारणात आल्यापासून शरद पवारांसारखंच राजकारण करताना दिसतात. रोहित पवारांची राजकीय कारकीर्द बारामतीतूनच सुरू झाली.

2017 मध्ये पुणे जिल्हा परिषदेचे ते सदस्य बनले. त्यांचा झेडपी मतदारसंघ बारामतीतलं शिरसूफळ हा होता. दोन वर्षांनी आलेल्या म्हणजे 2019 च्या विधानसभा निवडणुकीत मात्र त्यांनी अहमदनगरमधील कर्जत-जामखेड मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि विजयी झाले.

**तिसरी पिढी राजकारणात**

पार्थ आणि रोहित पवार यांच्या रुपाने राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची तिसरी पिढी राजकारणात सक्रिय झाली आहे. आज पार्थ पवारांचा वाढदिवस आहे. 2014 मध्ये वयाच्या 24 वर्षी मामा पद्मसिंह पाटील यांच्या प्रचारात सहभाग घेऊन पार्थ यांनी राजकीय



वाटचालीची चुणूक दाखविली पार्थ यांनी 2019 मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढविली, मात्र त्यांना पराभव स्वीकारावा लागला.

**युगेंद्र पवारांचे दौरे वाढले**

गेली अनेक दिवस राज्यात बारामती विधानसभा मतदारसंघाबद्दल चर्चा सुरू आहे. या मतदारसंघातून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात युगेंद्र पवार निवडणूक लढणार अशी चर्चा सुरू आहे. युगेंद्र पवार हे अजित पवार यांचे थोरले बंधू श्रीनिवास पवार यांचे सुपुत्र आहेत.

युगेंद्र यांच्या मातोश्री शर्मिला पवार या गेल्या अनेक वर्षांपासून शरयू फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून बारामती व इंदापूर तालुक्यामध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात आले आहेत.

**..अन् मविआची स्थापना**

2019 मध्ये महाराष्ट्रात सत्तेचा मोठा पेच निर्माण झाला होता. शिवसेनेने भाजपसोबत काडीमोड घेतल्यानंतर सत्तेची समीकरणे फिसकटली होती. त्यावेळी शरद पवार यांच्या पुढाकाराने राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांनी एकत्र येत महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. पण यापूर्वी अजित पवारांनी भाजपसोबत युती करत 72 तास सरकारमध्ये उपमुख्यमंत्रीपदावर काम केले.

2023 हे वर्षही शरद पवारांच्या राजकीय प्रवासातले एक महत्त्वाचे वर्ष ठरले. महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेचे काही आमदार बाहेर पडल्यानंतर राज्यात शिंदे-फडणवीस यांचे सरकार सत्तेत आले आणि महाविकास आघाडी विरोधी बाकावर गेली.

यावेळी अजित पवार विरोधी पक्षनेते म्हणून कार्यरत होते. त्यानंतर काही दिवसांनी अजित पवार आपल्या समर्थक आमदारांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून बाहेर पडले आणि त्यांनी पक्षावर आपला हक्क सांगितला. त्यानंतर निवडणूक आयोगासमोर शरद पवार गट आणि अजित पवार गटाने आपापली बाजू मांडली.

6 फेब्रुवारी 2024 रोजी याप्रकरणी निकाल देत निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाला दिले. 6 महिन्यांहून अधिक काळ चाललेल्या 10 हून अधिक सुनावणीनंतर हा निकाल देण्यात आला.

शरद पवार अध्यक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये 2023 मध्ये फूट पडली. अजित पवार यांनी आपल्या समर्थक आमदारांसह पक्षावर हक्क सांगितल्यानंतर शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या नावाने तुतारी फुंकणाऱ्या माणसाच्या चिन्हावर निवडणूक लढवली.

**लोकसभेत मारली बाजी**

या निवडणुकीत शरद पवारांच्या पक्षाच्या 10 पैकी 8 जागा निवडून आल्या. तर अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ 1 जागा मिळाली. त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे रायगड लोकसभेतून निवडून आले. पण अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला.

यानंतर आता महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका लागल्या आहेत. पॉवरबाज शरद पवार या वयातही महायुतीला लोळवण्यासाठी कंबर कसून तयार असल्याचे दिसते . यावेळी ते कोणती नवी खेळी खेळतात? निकालानंतर दिसून येईलच.

●●●●●●●●●

## धूम्रपान आणि तंबाखू सेवनावरील अभ्यासाविषयी 4 महत्त्वाचे मुद्दे




# स्मोकिंगमुळे दरवर्षी ८० लाख मृत्यू

**सिगारेट ओढण्याचे अनेक तोटे आहेत. दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो. कर्करोगाचे १० पेक्षा जास्त प्रकार आहेत. जगातील प्रत्येक धूम्रपान करणाऱ्याला माहित आहे की तो विष पीत आहे. पण धूम्रपानाची ही हानी टाळण्याचा उपाय कोणता? एकच पद्धत आहे. धूम्रपान न करणे म्हणजे धूम्रपान सोडणे.**

---------------

'द लॅन्सेट' पब्लिक हेल्थ या जगप्रसिद्ध जर्नलमध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, 2050 पर्यंत धूम्रपानाचे प्रमाण केवळ 5% पर्यंत कमी झाले तर त्याचे अविश्वसनीय परिणाम होऊ शकतात. यामुळे पुरुषांचे आयुर्मान 1 वर्षाने आणि महिलांचे आयुर्मान 0.2 वर्षांनी वाढू शकते.

आशादायक गोष्ट म्हणजे संशोधकांनी असा अंदाज वर्तवला आहे की 2050 पर्यंत जगभरात धूम्रपानाचे प्रमाण पुरुषांमध्ये 21% आणि महिलांमध्ये सुमारे 4% पर्यंत खाली येईल. धूम्रपान सोडण्याच्या प्रयत्नांना गती दिल्यास जगभरातील लोकांच्या जीवनात अंदाजे 876 दशलक्ष वर्षे जोडली जाऊ शकतात असाही अंदाज आहे.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन नुसार, जगभरात दरवर्षी 80 लाखांहून अधिक लोक सिगारेट ओढल्यामुळे अकाली मृत्यू पावतात. भारतात दरवर्षी 10 लाखांहून अधिक लोकांचा धूम्रपानामुळे मृत्यू होतो. यात इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाची आकडेवारीही जोडली, तर भारतात दरवर्षी सुमारे 13.5 लाख लोकांचा तंबाखूच्या सेवनामुळे मृत्यू होतो.

जगात सर्वाधिक तंबाखू सेवन करणाऱ्या देशांच्या यादीत चीननंतर भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, भारतात १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे २५.३ कोटी लोक धूम्रपान करतात. यापैकी अंदाजे 20 कोटी पुरुष आणि 5.3 कोटी महिला आहेत.

कोणत्याही देशात दारू आणि सिगारेटवर बंदी घालण्याची मागणी केली जाते, तेव्हा त्यांच्याकडून मिळणाऱ्या करांवर अर्थव्यवस्थेचा मोठा भाग अवलंबून असतो, अशी चर्चाही वाढते. त्यामुळे बंदी घालणे सोपे नाही. तर सत्य हे आहे की दारू आणि सिगारेटमुळे होणाऱ्या आजारांमुळे अर्थव्यवस्थेवरचा भार वाढतो. ग्राफिकमध्ये पहा सिगारेट जगावरील आर्थिक भार कसा वाढवत आहे.

**सिगारेट कशी सुरू होते?**

चित्रपटांमध्ये धुम्रपान ग्लॅमर, उत्साह आणि बौद्धिकतेने दाखवले जाते. त्यामुळे किशोरवयीन मुले याकडे आकर्षित होतात. अमेरिकन कॅन्सर सोसायटीच्या मते, 10 पैकी 9 लोक त्यांच्या किशोरवयातच सिगारेट ओढू लागतात. त्यामुळे पालक आणि शिक्षकांनी मुलांना याबाबत जागरूक करणे गरजेचे आहे.

धूम्रपानामुळे 10 पेक्षा जास्त प्रकारचे कर्करोग, हृदयविकार, स्ट्रोक आणि दमा यांचा धोका असतो. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की कर्करोग आणि हृदयरोग हे जगातील सर्वाधिक मृत्यूचे कारण आहेत.

जगभरात दरवर्षी सुमारे ६ कोटी लोकांचा मृत्यू होतो. त्यापैकी अंदाजे 1.80 कोटी मृत्यू हृदयविकारामुळे आणि 1 कोटी मृत्यू कर्करोगामुळे झाले आहेत.

(उर्वरीत भाग पुढे)

●●●●●●●●●

# करवा चौथ

करवा चौथ एक पवित्र सण आहे . या सणाला सौभाग्यवतीचा सण असे ही म्हणतात. या दिवशी स्त्रिया आपल्या पतीच्या दिघार्यूसाठी आणि निरोगी जीवनासाठी उपवास करतात. हा उपवास फार कठीण असतो कारण हा निर्जल करावा लागतो, ज्यामध्ये काही ही खाऊ किंवा पिऊ नाही शकत.

हा उपवास पहाटेच्या तारांच्या सावलीत करावा लागतो आणि रात्री चंद्राचे दर्शन घेऊन सोडावा लागतो. या दिवशी आपल्या हिंदू सौभाग्यवती स्त्रिया नटून थटून रात्री देवाच्या समोर वचन घेतात की त्या मन , वचन आणि कर्मांनी म्हणजे सर्वस्व आपल्या पतीला समर्पित करतील.

इतिहास मधल्या कथांच्या आधारे हे लक्षात येते की करवा चौथचे काय फायदे आहेत? भारतीय हिंदू स्त्रिया हा उपवास शुद्ध अंतःकरणाने करतात आणि प्राचीन काळापासून ही प्रथा चालत आलेली आहे .

आपण कधी विचार केला आहे का की ह्या उपवासाचा उद्देश्य काय आहे? ह्या उपवासाचा सुद्धा इतर उपवासांप्रमाणे एक अध्यात्मिक महत्व आहे .आपल्या देशाच्या कणा-कणा मध्ये अध्यात्मिकता बसलेली आहे.

आपले सगळे सण,उत्सव आणि उपवास स्वतःच्या आत्मविकासासाठीच बनवले होते आणि उपवास हे शेवटी मोक्ष आणि प्रभू प्राप्तीसाठीच ठेवले जात होते. परंतु वेळेनुसार सत्य गायब होऊन जाते आणि आपण फक्त ह्या रीती रिवाजांच्या बंधनात अडकलेले आहोत.

परम संत कृपाल सिंह जी महाराज नेहमी सांगतात कि आपले जितके हे उपवास, सण,उत्सव आहेत ह्यांच्या मध्ये अध्यात्म रुजलेली आहे आणि हेच आपल्या प्रांताची विशेषतः आहे . ह्या सर्व रीती रिवाजांमध्ये काही ना काही अध्यात्मिक रहस्य दळलेले आहे. या आपण बघूया कि ह्या करवा चौथ मध्ये कोणते अध्यात्मिक रहस्य दळलेले आहे?

करवा चौथ पहाटेला चांदण्याच्या सावलीत ठेवला जातो आणि रात्री चंद्राचे दर्शन घेऊन हा उपवास पूर्ण केला जातो. खरं तर हे अशा दुराव्याचा प्रतीक आहे जे एका अध्यात्मिक धेय्यापासून दुसऱ्या अध्यात्मिक धेय्यापर्यंत घेऊन जाते. हा करवा चौथचा उपवास ताऱ्यापासून चंद्रापर्यंत म्हणजे आत्मा आणि परमात्मा यांच्या मिलन ची एक अवस्था आहे.

हा उपवास तेव्हाच फलदायी आहे जेव्हा आपण आपल्या अंतःकरणामध्ये तारे पाहतो आणि पूर्ण दिवस परमेश्वराच्या भक्तीमध्ये घालवतो.

ध्यान साधना करतो आणि संध्याकाळी चंद्राचे दर्शन आपल्या अंतःकरणा मध्ये करून नंतर आपल्या प्रियकरचा चेहरा बघतो, जो आपल्या हृदयाचा चंद्र आहे . जे आपले गुरु आहेत त्यांचे दर्शन करतो. अशाप्रकारे करवा चौथचा उपवास साजरा केला पाहिजे.

आता ह्या काळात असं होत की, आपल्या आई, विवाहित मुली तसेच बहिणी हे उपवास करतात. पण खरच त्या ह्या दिवशी परमेश्वराची आठवण करतात का? आपण हेच करतो की सकाळी उठलो, उपवास केला की नंतर मैत्रिणीकडे किंवा नातेवाईकांकडे गप्पा गोष्टी करायला जातो. वादविवाद करतो. त्या दिवशी टी.वी. पाहतो. दिवसा पिच्चर पाहतो.पण खरं तर ह्या दिवसाचा खरा उदेश्य होता कि दिवसभर देवाच्या आठवणीत व ध्यान करण्यात घालवायचा होता. पण आपण ह्याचे पालन नाही करत.

आपल्याला फक्त एक संधी मिळते नवीन नवीन कपडे, दागिणे मिळवायची आणि संध्याकाळी एका रितीनुसार, उपवास सोडायचा आणि आपण समजतो की एवढ केल की आपल्याला लायसन्स मिळालाय कि एका वर्षा साठी आपला पतीचा आरोग्य सुदृढ राहील आणि व्यवसायात, नोकरीत, प्रगती होईल. अशाप्रकारे आपण ह्या उपवासाचा खरा उद्देश्य विसरून जातो.

आपल्याला हा संपूर्ण दिवस सिनेमा, टी .वी . मध्ये वाया घालवायला नको , आपल्याला सकाळी ध्यान साधना मध्ये बसायला हवं, दिवसभर प्रभूच्या आठवणीत घालवावे आणि रात्री आपल्या गुरूच्या आशीवार्दाने आपल्या अंतःकरणात चंद्राचे दर्शन घ्यावे आणि मग त्यांचे नूरानी रूपाचे दर्शन करावे.

अंतःकरणातील चंद्र ज्याला आपण नेहमी बघू शकतो, तो खरा चंद्र आहे. अंतःकरणातील चंद्र बघूनच आपण खरं तर ह्या करवा चौथचा वास्तविक लाभ मिळवू शकतो.



संत राजिंदरसिंहजी महाराज

■ ■ ■ ■

# उशिरा रिटर्न दाखल केल्यावर किती पेनाल्टी लागेल?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

गेल्या आठवड्यात आपण लेट रिटर्न व पेनाल्टी (लेट फीस) बद्दल बघत होतो. आज आपण या बद्दल अधिक माहिती सोप्या भाषेतील प्रश्नोतर रुपात बघणार आहोत.

प्रश्न - उशिरा रिटर्न भरण्यासाठी किती पेनाल्टी लागेल? याला आपण सोप्या भाषेत समजुन घेऊ,

1) जर तुमचे टॅक्सेबल उत्पन्न 250,000 पेक्षा कमी आहे तर पेनाल्टी लागणार नाही.

2) जर ते उत्पन्न 250,000 पेक्षा जास्त परंतु 500,000 पर्यंत असेल तर 1000 रुपये पेनाल्टी लागेल.

3) जर उत्पन्न 500,000 पेक्षा जास्त असे असेल तर 5000 रुपयांची पेनाल्टी लागेल.

प्रश्न - माझे बरेच वर्ष जुने ऋऊ आहेत. जे वेळोवेळी नुतनीकरण (रिन्यू) केले जातात. चालू वर्षात कोणतेही नवीन ऋऊ केलेले नाही. तरी मी रिटर्न भरावे का?

एफ.डी. नुतनीकरण म्हणजे जुने एफ.डी. संपणे व नवीन एफ.डी. करणे होय. जेव्हा एफ.डी. नूतनीकरण केले जाते तेव्हा बँका द्वारे आयकर विभागाला सांगितले जाते. त्यावेळी आयकर विभागाच्या सिस्टीमला असं वाटते की तुम्ही नवीन एफ.डी. केला आहे आणि ते ए.आय.एस. वरही दाखवते की तुम्ही या वर्षात नवीन एफ.डी. केला आहे. यासोबतच तुम्हाला मिळालेले व्याज व त्याच्यावर कपात झालेले टी.डी.एस. सुद्धा तुमच्या पॅनवर (ए.आय.एस.) मध्ये दिसते. अशावेळी आयकर विभागाच्या सिस्टीमला तुमच्या पॅनवर एवढे व्यवहार दिसतात व आयकर रिटर्न भरले नाही असेही दिसते. अशावेळी आयकर विभागाकडून नोटीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून रिटर्न भरणे अधिक योग्य राहील.




प्रश्न - माझे 10,000 ळऊ्र कटले आहे. माझे उत्पन्न 4,90,000 आहे मी अजूनही रिटर्न दाखल केले नाही. उशिरा रिटर्न दाखल केले तर पेनाल्टी लागेल का?

पेनाल्टी ही उशिरा रिटर्न भरल्यामुळे लागत आहे. म्हणून जरी तुमचे ळऊ्र कटले असले तरी तुम्हाला पेनाल्टी लागणार. तुमचे ळऊ्र कटले असल्याने पेनाल्टीचे पैसे वजा करून म्हणजेच 10,000 ङ्म 1000 = 9000 रुपये रिफंड येतील.

## अशोकायन

**आपल्या बा चे काय जाते?**

भविष्यावर ठेवूनी डोळा
राजा उदार झाला
कुणाची मागणी नसतांनाही
बहिणींना आहेर करत सुटला ..

कजार्ने दबलेल्या अर्थव्यवस्थेची
होऊन राहीली दमछाक
जनतेच्या करातून येणाऱ्या
पैशाची उधळपट्टी हकनाक

आचारसंहीता लागू होणार
जाणून अग्रीम हप्ता दिला
निवडून आल्यावरही तो
नसता का देता आला?..



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# टोयोटा किर्लोस्कर मोटरने टोयोटा ग्लान्झाची फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन सादर करण्याची घोषणा केली




**बंगळुरू, १९ ऑक्टोबर :** सणाचा उत्साह लक्षात घेऊन, टोयोटा किर्लोस्कर मोटरने आज टोयोटा ग्लान्झाची 'फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन' सादर करण्याची घोषणा केली. ग्राहक आता विशेष डीलरद्वारे फिट केलेले टोयोटा जेन्युइन ॲक्सेसरीज (टीजीए) पॅकेजेसचा आनंद घेऊ शकतात, जे या सणासुदीच्या काळात ग्लान्झाच्या उत्कृष्ट स्टाइल, परफॉर्मन्स आणि आरामासह त्यांचा ड्रायव्हिंगचा अनुभव वाढवण्यासाठी डिझाइन केले आहेत.

ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी, आकर्षक डिझाइन आणि उच्च इंधन कार्यक्षमतेसाठी २०१९ पासून ओळखली जाणारी, टोयोटा ग्लान्झाची लिमिटेड एडिशन २०,५६७ रुपये किमतीच्या १३ विशेष टीजीए पॅकेजसह येते. या वाहनात क्रोम आणि ब्लॅक बॉडी साइड मोल्डिंग, बॅक डोअर गार्निश क्रोम आणि ओआरव्हीएम गार्निश क्रोम सारखे प्रीमियम वैशिष्ट्ये आहेत. इतर खास फीचर्समध्ये अतिरिक्त आरामासाठी ३ फ्लोरमॅट, डोअर व्हिझर प्रीमियम आणि नेक कुशन (ब्लॅक आणि सिल्व्हर कलर मध्ये) यांचा समावेश आहे. टोयोटा ग्लान्झाचे स्टायलिश आकर्षण रियर बंपर, फेंडर तसेच रियर रिफ्लेक्टर आणि वेलकम डोअर लॅम्प्सवर क्रोम गार्निशने अधिक समृद्ध केले आहे, ज्यामुळे त्याला प्रीमियम टच मिळतो.

श्री सबरी मनोहर -वाइस प्रेसिडेंट, सेल्स-सर्व्हिस-युज्ड कार बिझनेस - टोयोटा किर्लोस्कर मोटर, टोयोटा ग्लान्झाच्या फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन लाँच करताना म्हणाले, या सणासुदीच्या काळात टोयोटा ग्लान्झाची 'फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन' सादर करून आमच्या ग्राहकांमध्ये आणखी उत्साह आणण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. डायनॅमिक-स्पोर्टी डिझाइन, ॲडव्हान्स फीचर्स आणि उत्कृष्ट परफॉर्मन्स यांच्या मिश्रणासाठी ग्लान्झाचे नेहमीच कौतुक केले जाते आणि या लिमिटेड एडिशनसह, आम्ही त्याचे आकर्षण आणखी वाढवत आहोत.

टोयोटाची सर्वात परवडणारी एडिशन म्हणून, ग्लान्झा ही असंख्य भारतीय कुटुंबांची एक पसंतीची निवड बनली आहे. गेल्या काही वर्षांत, टेक्नॉलॉजीची जाण असलेल्या ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे वाहन सतत विकसित होत आहे आणि कार्यक्षम कामगिरी कायम ठेवत विशेष ड्रायव्हिंग अनुभव देण्याचा वारसा पुढे चालू आहे. आता, फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन सर्व व्हेरियंटमध्ये उपलब्ध असल्याने, स्टाइल आणि सोयींच्या परिपूर्ण मिश्रणासह मालकीचा अनुभव आणखी वाढवला गेला आहे.

सणासुदीच्या ऑफरचा एक भाग म्हणून, टोयोटा ग्लान्झा फेस्टिव्हल लिमिटेड एडिशनची निवड करणाऱ्या ग्राहकांसाठी मोफत टीजीए पॅकेज ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत उपलब्ध असेल. शिवाय, प्रत्येक ॲक्सेसरीज डीलरशिपवर प्रमाणित टोयोटा टेक्नीशियनद्वारे कुशलतेने फिट केले जाते, जे ग्राहकांना अतुलनीय अनुभव देण्यासाठी गुणवत्ता सुनिश्चित करते. फेस्टिव्हल लिमिटेड एडिशन लोकप्रिय टोयोटाच्या मॉडेलमध्ये केवळ उत्सवाचे आकर्षण वाढवत नाही तर विस्तारित वॉरंटी, अस्सल टोयोटा ॲक्सेसरीज आणि टोयोटाच्या प्रसिद्ध विक्रीनंतरच्या सेवांसह विशेष मूल्य देखील देते, जे ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. सर्व टोयोटा डीलरशिपवर बुकिंग सुरू आहे. ग्राहक https://www.toyotabharat.com/online-booking/ वर कार ऑनलाइन बुक करू शकतात किंवा त्यांच्या जवळच्या टोयोटा डीलरशिपला भेट देऊ शकतात.

# वारी एनर्जीज लिमिटेडची प्राथमिक समभाग विक्री सोमवार २१ ऑक्टोबर २०२४ पासून सुरू

**नागपूर, १९ ऑक्टोबर :** वारी एनर्जीज लिमिटेड (कंपनी) इक्विटी शेअर्सची (ऑफर) प्राथमिक समभाग विक्री सोमवार २१ ऑक्टोबर २०२४ पासून सुरू करत आहे. प्रमुख गुंतवणूकदाराच्या बोलीची तारीख एक कार्यालयीन दिवस आधीची शुक्रवार १८ ऑक्टोबर २०२४ असणार आहे. बोली/ऑफर बुधवार २३ ऑक्टोबर २०२४ रोजी बंद होईल. ऑफरचा किंमतपट्टा प्रति इक्विटी शेअरसाठी १,४२७ रुपये ते १,५०३ रुपये पर्यंत निश्चित करण्यात आला आहे. बोली किमान ९ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ९ इक्विटी शेअर्सच्या पटीत लावता येईल.

या ऑफरमध्ये ३६,००० दशलक्ष रु. पर्यंतच्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू (फ्रेश इश्यू) आणि ४,८००,००० पर्यंतच्या इक्विटी शेअर्सची (ऑफर केलेले शेअर्स) ऑफर फॉर सेल आहे. त्यामध्ये ४,३५०,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स वारी सस्टेनेबल फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड (प्रवर्तक विक्री समभागधारक); आणि ४५०,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स चंदुरकर इन्व्हेस्टमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड (इतर विक्री समभागधारक आणि प्रवर्तक विक्री समभागधारकांसह एकत्र, विक्री समभागधारक आणि विक्री समभागधारकद्वारे इक्विटी शेअर्सची विक्रीसाठीची ऑफर, ऑफर फॉर सेल) समाविष्ट आहे. या ऑफरमध्ये पात्र कर्मचाऱ्यांद्वारे (कर्मचारी राखीव हिस्सा) सबस्क्रीब्शनसाठी काही संख्येने इक्विटी शेअर्सचा राखीव हिस्सा समाविष्ट आहे. कर्मचारी राखीव हिस्स्याशिवाय असलेली ऑफर यापुढे नेट ऑफर म्हणून ओळखली जाते.

कंपनीचे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड वर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

ॲक्सीस कॅपिटल लिमिटेड, आयआयएफएल सिक्युरिटीज लिमिटेड, जेफरिज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, नोमुरा फायनान्शीयल ॲडव्हायजरी अँड सिक्युरिटीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, इंटेन्सीव्ह फिस्कल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि आयटीआय कॅपिटल लिमिटेड हे या ऑफरचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

## डॉ. विनोद गांधी: मूल एक वर्षाचं झाल्यावर त्याची आरोग्यदायी वाढ विकास होण्यासाठी सात आवश्यक लसी



**नागपूर, १९ ऑक्टोबर :** भारतात पहिल्या वर्षापर्यंत लसीकरणाचं प्रमाण चांगलं असलं तरी पहिल्या वाढदिवसानंतर हा दर कमी होतो. त्यामुळे अनेक मुलांचं लसीकरण पूर्ण होत नाही. आनंदी आणि आरोग्यदायी आयुष्यासाठी तसंच रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी पहिल्या वर्षानंतरही लसी घेणं अतिशय महत्त्वाचं आहे. लसीने जे रोग टळू शकतात त्यासाठी तर अतिशय महत्त्वाचं आहे.

इंडियन कॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स (IAP)ने एक ते २ वर्षांच्या मुलांसाठी ७ लसींची शिफारस केली आहे. त्यात कांजिण्या आणि हेपेटायटिस ए चे दोन डोस, मेंदूज्वर आणि एमएमआरचा दुसरा डोस, पीसीवी आणि डीटीपी एचआयबी आयपीव्हीचा बूस्टर डोझ, आणि फ्ल्यूसाठीचा वार्षिक डोस यांचा समावेश आहे. या सात लशींमुळे कांजिण्या, हेपेटायटिस ए, हेपेटायटिस बी***, मेंदूज्वर, गोवर, गालगुंड, रुबेला, न्यूमोनिया, इन्फ्लुएन्झा, घटसर्प, धनुर्वात, डांग्या खोकला, पोलिओ आणि एचआयबी या संसर्गांपासून बचाव होतो.

या लसींच्या गरजांबद्दल बोलताना कलर्स हॉस्पिटलचे संचालक, बालरोगतज्ज्ञ आणि निओनॅटॉलॉजिस्ट डॉ. विनोद गांधी म्हणाले, लसीने ज्या रोगांपासून संरक्षण मिळतं त्या लसी पालकांनी त्यांच्या १ ते २ वर्षं या वयोगटाल्या मुलांना द्याव्यात. माझ्या अनुभवानुसार ज्या मुलांचं पूर्ण लसीकरण झालं नाही अशा मुलांना तीव्र संसर्ग झाल्याची उदाहरणं पाहिली आहेत. त्यामुळे इंडियन कॅडमी ऑफ पेडियाट्रिक्सने शिफारस केलेल्या १४ लसींचं वेळापत्रक योग्य पद्धतीने पाळून त्या १ ते २ वर्षांच्या मुलांना द्याव्यात आणि मुलांचं रक्षण करावं.

मूल एक वर्षाचं झाल्यानंतरही त्याची प्रतिक्षम संस्था विकसित होत असते. त्यामुळे संसर्ग आणि गुंतागुंतीचा धोका वाढतो. त्याचा परिणाम त्यांच्या विकासावर होऊ शकतो. योग्य लसीकरण झालं नाही तर लहान मुलांची पोषणक्रिया नीट होत नाही. त्यामुळे संसर्ग होण्याचा धोका आणखी वाढतो आणि त्यातून बरं व्हायला आणखी वेळ लागतो असं एका संशोधनातून समोर आलं आहे.. लहान मुलं आजारी पडल्यावर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी पैसा उभा करण्याचं आव्हान असतं. त्याचबरोबर मुलांबरोबर सतत राहिल्याने पालकांनाही संसर्गाचा धोका निर्माण होतो.

ज्या लसींची शिफारस केली आहे त्यामुळे त्यामुळे संसर्गजन्य रोग टळतात, त्यामुळे रोगाची साथ पसरत नाही, आजार नाहीसे होतात आणि कुटुंबावरचा, आरोग्यव्यवस्थेवर आर्थिक ताणही कमी होतो. लसीकरणाच्या वेळापत्रक योग्य पद्धतीने पाळण्यासाठी पालकांनी बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. तसंच मुलांच्या आरोग्यासाठी, आनंदासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी या सात लसी प्राधान्याने द्याव्या.

## रेड बुल ६४ बार्स सीझन दोन मध्ये वजन रिलीज करण्यासाठी रॅपर संबाताने निर्माता करण कंचनशी हातमिळवणी

**पुणे, १९ ऑक्टोबर :** पुण्याच्या स्वतःच्या पॉवरहाऊस, संबाताने वजन हे आपले नवीन, रोमांचक सिंगल रिलीज करण्यासाठी प्रसिद्ध निर्माता करण कंचन याच्याशी हातमिळवणी केली आहे. या सीझनच्या रेड बुल ६४ बार्सचे हे या सीझनमधले तिसरे रिलीज आहे. वेस्ट कोस्टने प्रेरित असलेला हा ट्रॅक संबाताचा बेधडक प्रामाणिकपणा दाखवतो, ज्यात त्याने आपले कुख्यात गँगचे जीवन आणि रस्त्यांची विश्वसनीयता व्यक्त केली आहे आणि भारतीय हिप-हॉपमधील एक आघाडीचा आवाज म्हणून आपले स्थान मजबूत केले आहे.



वजन मधून एक कलाकार म्हणून वाईट भूतकाळ असलेल्या आणि जमावातून वर आलेल्या संबाताच्या विकासाची साक्ष मिळते. त्याच्या गाण्याच्या बोलांमधून लवचिकपणा आणि असुरक्षितता दोन्ही दिसते, जे त्याच्या अनुभवांचे सार आहे आणि रस्त्यावरील जीवनाचे कटू वास्तव त्यात टिपले आहे.

रेड बुल ६४ बार्स सीझन दोन भारतीय हिप-हॉप क्षेत्राची पुनर्व्याख्या करण्यास सज्ज आहे. यामध्ये कलाकार आणि शैलींचे वैविध्य आहे आणि त्या सर्वांना डेफ जॅम रेकॉर्डिंग इंडिया आणि युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप फॉर ब्रँड्स (युएमजीबी) चे समर्थन आहे. देशातील काही अत्यंत प्रतिभावान रॅपर्सना सादर करणारा हा सीझन या गीत प्रकाराला आणखी पुढे घेऊन जाईल असे वाटते.

वजनच्या मेकिंग बद्दल संबाता सांगतो, हा ट्रॅक म्हणजे माझ्या रस्त्यावरील जीवनाचे प्रतिबिंब आहे, ज्यात माझे खिसे रिकामे असताना मी केलेला संघर्ष, जेव्हा कुणीच मला ओळखत नव्हते तेव्हापासून ते आता मी एक स्थापित आणि या क्षेत्रातील उल्लेखनीय कलाकार झालो आहे. आणि लोक आता मला ओळखतात, असा संपूर्ण पट आहे. या ट्रॅकचे नाव आहे वजन, जे रॅपच्या क्षेत्रात माझे आहे आणि शेवटपर्यंत ते तसेच राहावे यासाठी माझा प्रयत्न असेल. याच विषयाभोवती हा ट्रॅक फिरतो.

संबाताशी भागीदारीबद्दल करण कंचन म्हणतो, संबातामध्ये एक जबरदस्त ऊर्जा आहे, ज्यामुळे तो जे काही करतो, त्यात प्रामाणिकपणा झळकतो. वजन मधून मला हेच टिपायचे होते. त्याची कहाणी आणि आपल्या शब्दांतून तो हे जग ज्या पद्धतीने साकारतो, ते अनोखे आहे. माझ्या साठी, वजन म्हणजे तो वेस्ट कोस्ट व्हाइब कायम ठेवून त्याच्या आवेगाला साजेसा साऊंड देणे इतकेच होते. ही भागीदारी सहज होती. आम्हा दोघांना आमच्या कक्षा अधिक वाढवायच्या होत्या आणि मला वाटते, वजन मुळे ते साध्य झाले आहे. हा असा ट्रॅक आहे, जो प्रत्येक अर्थाने उठून दिसणारा आहे. संबाता आणि करण कंचन या भारतातील दोन मोठ्या कलाकारांची भागीदारी भारतीय हिप-हॉप दुनियेत नक्की खळबळ माजवणार आहे.

# ॲक्सीस बँक Q2FY25 निकाल जाहिर

**नागपूर, १९ ऑक्टोबर :** भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सीस बँकेने आज त्यांचे Q2FY25 निकाल जाहीर केले. या तिमाहीत बँकेचा कोर ऑपरेटिंग नफा गेल्या वर्षीच्या तुलनेत १०% नी वाढून रु. ९,६०१ कोटी रु. झाला आहे. गेल्या वर्षीच्या ५,८६४ कोटींच्या तुलनेत Q2FY24 मध्ये १८% ची वाढ नोंदवत तो ६,९१८ कोटी रु एवढा झाला. बँकेचे निव्वळ व्याज उत्पन्न (NIL) वार्षिक ९% वाढून Q2FY25 मध्ये १३,४८३ कोटी रु. झाले.

ॲक्सीस बँकेचे एमडी आणि सीईओ अमिताभ चौधरी म्हणाले, या तिमाहीत आम्ही डिजिटलदृष्ट्या चांगली कामगिरी केली आहे. भौतिकदृष्ट्या विस्तारही चांगला झाला असून ग्राहकांशी आमची जवळीक साधली गेली आहे. गेल्या तीन महिन्यांत शहरी आणि ग्रामीण अशा १५० नवीन शाखा उघडल्या आहेत. कोलकाता येथे नवीन कॉर्पोरेट कार्यालयाची पायाभरणी करून बँकेने आपले प्रादेशिक अस्तित्व मजबूत केले, जे पूर्व विभागातील सर्व घडामोडींचे केंद्र असेल. आम्ही आमच्या खासगी बँकिंग व्यवसाय बरगंडी प्रायव्हेट नेटवर्कचा विस्तार १५ नवीन शहरांमध्ये करत भारतातील ४२ ठिकाणी आपली उपस्थिती दर्शवली आहे. भारताच्या वेगाने विकसित होत असलेल्या टियर २ बाजारपेठांमध्ये योग्य संपत्ती व्यवस्थापन सेवा ऑफर केली आहे.


## सर्वसमावेशक आरोग्य सेवा उपायसुविधांसह स्टार हेल्थ इन्शुरन्सने महाराष्ट्राशी असलेली आपली बांधिलकी केली आणखी मजबूत

**पुणे, १९ ऑक्टोबर :** भारतातील सर्वात मोठी स्वतंत्र आरोग्य विमा कंपनी स्टार हेल्थ इन्शुरन्स प्रचंड वाढीची क्षमता असलेली महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या महाराष्ट्रातील आपले स्थान आणखी मजबूत करत आहे. महाराष्ट्रात ८८७ शाखांपैकी १०७ शाखा असल्याने राज्य स्टार हेल्थच्या विविधांगी जनतेला सर्वसमावेशक आणि प्रवेशयोग्य आरोग्य सेवा उपाय सुविधा पुरविण्याच्या ध्येयाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्रातील १५ लाखांहून अधिक पॉलिसी धारकांना सेवा देणारे १.१५ लाखांहून अधिक एजंट्स आणि २,०४० हून अधिक कर्मचाऱ्यांचे मजबूत नेटवर्क यातून ही बांधिलकी प्रतिबिंबित होते. आम्ही राज्यासाठी वचनबद्ध असून आर्थिक वर्ष २४ मध्ये १९०० कोटी रु.च्या दाव्यांची पूर्तता केली आहे आणि गेल्या ५ वर्षांत ७००० कोटी रु.च्या दावे पूर्ण केले आहेत.

नुसत्या पुण्यातच, स्टार हेल्थ ५.७४ लाखांहून अधिक ग्राहकांना सेवा पुरवते आणि त्यासाठी १०,००० हून अधिक एजंट्सचे पाठबळ आहे. या स्थानिक कौशल्यामुळे कंपनीला प्रदेशाच्या विशिष्ट आरोग्य सेवा गरजांसाठी उपायसुविधा मिळवून देणे आणि ग्राहकांची सोय आणि काळजी यांना प्राधान्य देणाऱ्या सेवांचा पुरवठा करणे शक्य होते.

महाराष्ट्रात स्टार हेल्थच्या सातत्यपूर्ण लक्ष केंद्रित करण्याबद्दल भाष्य करताना स्टार हेल्थ इन्शुरन्सचे मुख्य विपणन अधिकारी हिमांशू वालिया म्हणाले, महाराष्ट्र हे स्टार हेल्थ इन्शुरन्समधील आमच्या व्यवसायाच्या कार्यपद्धतींचा कणा आहे.

# शब्दकोडे क्रमांक १९५१



**आडवे शब्द:-**
१) शाळेचे प्रमुख
५) सूर्याचे एक नाव
७) रागावलेला
११) सापाने त्यागलेली त्वचा
१२) सुळे
१४) प्रशाला
१५) नंतर
१६) नेता, चित्रपटाचा हिरो
१७) नूतन
१८) चुणीदार पट्टी
१९) जानकीपती
२०) खरकट्याचा ढीग
२३) सूर्य
२५) रजनी
२७) जन्ममृत्यू
३०) सेवक
३२) पंजाब मधील दोन नद्यांची नावे
३४) बारीक झणझण
३६) मृत्यू
३७) व्याज आकारणीतील द.सा.द.शे.
४१) मयूर
४२) निमग्न
४३) यज्ञ
४४) कबूतर
४५) रतिचा पती
४७) उद्याच्या नंतरचा दिवस
४८) अथवा, किंवा
४९) शर्त, परंतु, अट
५०) एक रंगीत कंदमूळ
५१) कोथिंबीरीचे बी
५२) पाणी
५४) झाडाभोवतीचा कट्टा
५५) निर्धन झालेला, दरिद्री
५६) कच्चाच्या विरुद्ध
५८) खांदा, खांद्याचा सांधा
६०) बुद्धीने कमी असलेला
६१) मीठ
६२) उसनवार
६६) निष्णात(गुन्हेगार)
६८) अफवा
६९) एक द्रिदल धान्य
७०) झकास
७१) लेखणी
७२) प्रस्थान करणे
७३) वेल
७५) पुरुष
७६) चांदी
७७) गाणे
७८) गुणांची चाहा करणारा

**उभे शब्द:-**
१) ज्याला बोलता येत नाही असा
२) सुप्रसिद्ध
३) घागरा
४) रेशमी धोतर
५) शपथ
६) रविवार
७) कलकत्त्याचे नवीन नाव
८) चरण
९) तालुक्यातील सरकारी महसुलीचे काम बघणारा अधिकारी
१०) मोठे गाव
१३) दृष्टीभेट
१८) स्वयंपाक घरातील एक छिद्राचे साहित्य
१९) वंदनाचा एक शब्द
२१) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
२२) हजार शेराचे वजन
२४) कापड विणून तयार करणारा
२६) बैलाच्या नाकात ओवलेली दोरी
२८) मोठे घर, राजवाडा
२९) विरोध, प्रतिबंध
३१) सवतीबद्दलचा आकस
३३) वीरगती
३५) बटाटा वा साबुदाण्याचा तळलेला रूचकर पदार्थ
३८) उपकरण
३९) एखादा घोटाळा दाबून टाकणे दाबणे
४०) एक प्रकारचा लांब अंगरखा
४४) डोळ्यावरील उघडझापीचा अवयव
४६) किंमत
५०) छ. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणारा ब्राह्मण
५१) हादरा, धडक
५३) पहारेकरी
५४) बसण्याची फळी
५६) अनुमती, मान्यता
५७) गावाची हद्द
५९) हवा, वारा
६२) पिता
६३) नूतन, जुनाच्या विरुद्ध
६४) शिक्षक
६५) दहावी रास
६६) मृत्यू नसलेला
६७) निकट, जवळ
७०) चिंतन
७४) दह्याचे पातळसर पेय

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर




BHONDEKAR SANSKRUTIK KRIDA VA SAMAJIK SHIKSHAN SANSTHA's

**POOJA NURSING COLLEGE, BHANDARA**

KISAN CHOWK, BANK COLONY, SAHAKAR NAGAR, BHANDARA . 441904 (MH)

**Institutional Level Round B.Sc. Nursing Colleges for Academic Year 2024-25**

| Sr. No. | Activity | Dates |
|---|---|---|
| 1 | Submission of application in prescribe format. | 18/10/2024 to21/10/2024 upto 05.00 pm |
| 2 | Display of Merit List-1 **Selection List** and Wait List | 22/10/2024 By 06.00 pm |
| 3 | Physical Joining of candidates from Selection List- all original Documents & payment | 23/10/2024 to25/10/2024 upto 05.30 pm |
| 4 | Display of Merit List-2 **Selection List** and Wait List | 25/10/2024 by 06.30 pm |
| 5 | Physical Joining of candidates from Selection List- all original Documents & payment | 26/10/2024 to 28/10/2024 upto 05.30 pm |
| 6 | Display of Merit List-3 **Selection List** and Wait List. | 28/10/2024 by 06.30 pm |
| 7 | Physical Joining of candidates from Selection List- all original Documents & payment | 29/10/2024 to30/10/2024 upto 05.30 pm |
| 8 | Publication of Residual Vacancy and list of Joined candidates | 30/10/2024 by 06.30 pm |
| 9 | Reporting of eligible candidates with Original Documents and Requisite Fees. | 31/10/2024 up to 01.00 pm |
| 10 | Filling of Residual Vacancy from reported eligible candidates | 31/10/2024 02.30 pm onwards |
| 11 | Reporting of admitted candidates in College Feedback Module | 31/10/2024 upto11.59 pm |
| 12 | **Cut-off date of admission for B.Sc. Nursing Course for A.Y. 2024-25.** | **31/10/2024** |

**Please Visit : www.mahacet.org** All Merit and Wait List on the Notice Board and website of the college.

**Contact No. 7391045392 / 7823006818 / 9850974842**

**Email ID : poojanursinginstitute@gmail.com web site:- poojanursing.com**



**BHONDEKAR SANSKRUTIK KRIDA VA SAMAJIK SHIKSHAN SANSTHA'S**

**POOJA NURSING COLLEGE BHANDARA**

**Kisan Chowk, Bank Colony, Sahakar Nagar, Bhandara – 441904**

**(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik & Maharashtra Nursing Council)**

**Contact No.: 7391045392 / 7823006818 / 9850974842,**

**Email: poojanursinginstitute@gmail.com, website: www.poojanursing.com**

**POST BASIC B.Sc. NURSING 2YRS. DEGREE COURSE AND M.Sc. NURSING 2 YRS. P.G. COURSE**

**ADMISSION NOTICE – 2024-25**

**Post Basic B.Sc. Nursing Eligibility**
1. GNM Passed
2. Registration with concerned State Council is essential
3. Candidate should be medically fit

**M.Sc. Nursing Eligibility**
1. Passed B.Sc. (N) / P.B.B.Sc./B.Sc. Nursing Marks – 55% & above 5% relaxation of marks for Reserved category (Maharashtra State)
2. Clinical Experience / Teaching exp. for one year.
3. Registration with concerned state council is essential
4. Candidate should be medically fit.

**M.SC. NURSING SEAT METRIX FOR ADMISSION 2024-25**

| M.Sc Nursing Speciality | SUBJECT WISE SEATS | NRI/ Institutional Quota | GENERAL | EWS | SEBC | SC | ST | VJ A | NT B | NTC | NT D | OBC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | NRI/IQ 15% | OPEN QUOTA 50% | | RESERVATION QUOTA 35% | | | | | | | |
| | 100% | 15% | 40% | 10% | 10% | 6.50 % | 3.50 % | 1.50 % | 1.25 % | 1.75 % | 1 % | 9.50 % |
| Medical Surgical Nursing | 7 | 1 | 3 | 0 | 1 | -- | -- | -- | -- | 1 | -- | 1 |
| Paediatric Nursing | 7 | 1 | 3 | 1 | 1 | -- | 1 | -- | -- | -- | -- | 1 |
| Community Health Nursing | 7 | 1 | 3 | 1 | -- | -- | -- | 1 | -- | -- | -- | 1 |
| OBGY Nursing | 7 | 1 | 3 | 1 | 1 | 1 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| Psychatric Nursing | 7 | 1 | 2 | 0 | 1 | 1 | -- | -- | -- | 1 | -- | -- |
| Total | 35 | 5 | 14 | 3 | 4 | 2 | 1 | 1 | 0 | 2 | 0 | 3 |
| | | | 17 | | 13 | | | | | | | |
| **POST BASIC B.SC NURSING SEAT MATRIX FOR ADMISSION 2024-2025** | | | | | | | | | | | | |
| Post Basic B.Sc Nursing | 60 | 9 | 24 | 6 | 6 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 6 |
| | | 9 | 30 | | 21 | | | | | | | |

**Shedule for Admission Process Extended cut off date:**

| | | |
|---|---|---|
| 1. | Issue and submission of duly filled application form | : 07/09/2024 to 30/10/2024 |
| 2. | Display of Merit List / Provisional selection and waiting list | : 31/10/2024 |
| 3. | Joining and Admission process on the basis Interview cum merit | : 31/10/2024 upto 5.00 PM |
| 4. | Cut off date of Admission | : 31/10/2024 |

- Admission will be strictly done on the basis of inter-se merit.
- All admission will be subject to approval from competent authorities.

Note : Course commencement date will be inform later telephonically as per INC Delhi and MUHS, Nashik instructions.

Principal
Pooja Nursing College
Bhandara

Secretary
Bhondekar Sanskrutik Krida Va Samajik
Shikshan Sanstha, Bhandara

# जिल्हाधिकारी यांनी घेतला विधानसभा क्षेत्राचा आढावा



## निर्भय भयमुक्त निवडणुका होणार : पियुष चिवंडे

विधानसभा दरवर्षी प्रमाणे विद्यानसभा निवडणुका- 24 निर्भय व भयमुक्त होणार असून याकरिता फ्लाईगं स्कॉट,परप्रांतीय, ग्रस्त, सीमा,चेकपोस्ट सर्व ठिकाणी नियोजन व चोख सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. काटोल उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहम यांचे मार्गदर्शनात शांतता व चोख निवडणुका पार पाडण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. निवडणूक मतदान टक्केवारी वाढण्यासाठी प्रचार व प्रसार यंत्रनेत तहसीलदार राजू रणवीर,बिडीओ रामदासजी गुंजनकर,महसूल विभाग,शिक्षण विभाग मतदान टक्का वाढविण्यासाठी जनजागृती मोहीम राबवित आहे.

## काटोल विधानसभेत सर्वाधिक मतदार

एकूण मतदार 2,80486 पैकी सर्वाधिक 62हजार 404 मतदार तीस ते एकोणचाळीस तरुण वयोगटातील आहे. तेच मतदार याभागाचा आमदार निश्चित करू शकतात. वयोगट -18 ते 19 मध्ये 5हजार 820 नवमतदारांची नोंद झाली आहे. दुसरा मोठा मतदार 40 ते 49 वयोगटातील 61हजार 955मतदार आहे. म्हणजेच 30ते 50 वयोगटातील मतदार ज्यांचे कडे वळतील त्यांचा विजय पक्का गृहीत असल्याचे आकडेवारीवरून निश्चित होते.मतदार संघात महिला मतदार पुरुषांपेक्षा फक्त चार हजार मतांनी कमी आहे. यावर्षी लाडकी बहीण काय? करणार यावर सुद्धा अनेकांचे लक्ष्य आहे.

■ **महासागर प्रतिनिधी**
**काटोल, दि. १९ :**
विधानसभा क्षेत्रात शंभरी वय पार करणारे 82 मतदार असून, एकसे दहा वर्षाचे वर यादीत एका महिला मतदाराची नोंदणी आहे. सहा(6) मतदार तृतीय पंथिय मतदानाचा अधिकार बजावणार आहे.

काटोल विधानसभा क्षेत्र निवडणुका करिता एकूण 332 मतदान केंद्रे असून एकूण 2 लक्ष 80 हजार 486मतदानाचा अधिकार बजावणार असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा एसडिओ पियुष चिवंडे यांनी माहिती दिली.

स्थानिक नबीरा महाविद्यालयात शनिवार दि 19ऑक्टोबरला निवडणूक प्रथम प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. याकरिता मुख्यता 1040 पुरुष प्रशिक्षकांची निवड केली होती. तर रविवारला विशेषतः महिला 1036 प्रशिक्षणार्थी राहणार आहे. प्रशिक्षणाला निवडणूक निर्णय अधिकारी पियुष चिवंडे यांचे मार्गदर्शनात काटोलचे तहसीलदार राजू रणवीर, तहसीलदार सुनील खोडके नरखेड, यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नायब तहसीलदार विजय डांगोरे, भागवत पाटील,संजय भुजाडे आदी उपस्थित होते. काटोल विधानसभा क्षेत्र - 48 निवडणूक तयारी बाबत जिल्हाधिकारी विपीन इटणकर यांनी शुक्रवारला काटोल येथे भेट देऊन माहिती जाणून घेतली.

मतदार, सुरक्षा व्यवस्था, मतदान केंद्रे, प्रशिक्षण आदिबाबत चर्चा केली. मतदान कार्यक्रम तयारीबाबत समाधान व्यक्त केले.

# भोयर की सावरकर बाजी मारणार?

■ **महासागर प्रतिनिधी**
**कामठी, दि. १९ :**
कामठी मौदा विधान सभा क्षेत्रांतील आमदारकी करता अनेक जन उत्सुक दिसतात. त्यामध्ये सुरेश भोयर यांचे नांव सर्वात पुढे असल्याचे चर्चेतुन दिसते. मागील विधान सभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार टेकचंद सावरकर यांना टक्कर देत शेवटच्या टप्प्यात जवळपास ११ हजार मतांनी सुरेश भोयर यांचा निसटता पराभव झाला. सुरेश भोयर हे कामठी मौदा परिसरात कामठी शहरासह ग्रामीण भागात कार्य करत पकड मजबूत करतांना प्रयत्न करीत आहेत. त्यांचे सोबत कॉंग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ता जुडले असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.

मागील काही महिन्यांपासुन हवसे, नवसे गवसे सारखे नेते मोठमोठे पोस्टर्स बॅनर्स लावुन जनते समोर येण्याचा प्रयत्न करीत आहेत. तर काही प्रतिष्ठानच्या नावांवर कार्यक्रम राबवत असल्याचे दिसते.

जानकर नागरीकांचे असे मत आहे की हेच कार्य त्यांनीं पांच वर्षात केले असते. तर त्यांनाही निवड्णुकीचे घोदामैदान जवळ असते. काही नेते पक्षाच्या वरिष्ठांची मर्जी राखण्यातच धन्यता मानुन उमेदवारी मिळविण्याचा प्रयत्न करतांना डिसताण दिसतात.

नागपुर जिल्ह्याचे कर्तबगार धडाडीचे व जमिनी शी जुळलेले तसेच सर्वांची कामे करणारे नेते सुनील केदार यांच्या लोकसेवा जनसेवा कायार्मुळे रामटेक लोकसभा निवडणुकीत विजयश्री खेचुन आणली. कॉंग्रेस पक्षाची उमेदवारी मिळविण्याची कसरत करत असल्याचे दिसते.

# जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत संकष्टी ठवकर प्रथम

■ **महासागर प्रतिनिधी**
**काटोल, दि. १९ :**
एस.आर. दळवी फाऊंडेशन, शाखा नागपूर कडून नवरात्र महोत्सव निमित्त जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात वर्ग १ ते ५ वी करिता ' माझी आवडती महिला' तर वर्ग ६ ते ८ करिता ' शिक्षण व सामाजिक क्षेत्रात महिलांचे योगदान ' हे विषय होते.

बक्षिस वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी माजी गटशिक्षणाधिकारी दिनेश धवड तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाध्यक्ष राजेंद्र टेकाडे, रजनी मानकर, प्रशांत शेंडे, प्रमोद बोडखे, शारदा अडागळे, रोशन सावरकर, हसिना शेख प्रामुख्याने उपस्थित होते.



कनिष्ठ गटात प्रथम - संकष्टी विनोदराव ठवकर (जि.प.प्राथमिक शाळा, कोंढाळी), द्वितीय-ओजस्वी धर्मेंद्र माटे (जि.प.प्राथमिक शाळा, चारगांव) तृतीय-वंश गोविंदराव अंबुडारे (जि.प.उच्च प्राथमिक शाळा, झिलपा) तृतीय - कु. रोहिणी सुभाष बावणे (न.प.उच्च प्राथमिक शाळा क्र.२, काटोल) तर वरिष्ठ गटात प्रथम - कुणाल योगेश पाठे (जि.प.उच्च प्राथमिक शाळा, जुनापाणी) व द्वितीय - कु. श्रावणी देवेंद्र मरसकोल्हे (जि.प.उच्च प्राथमिक शाळा, इसापूर खुर्द) यांनी पारितोषिक पटकाविले. त्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात गटशिक्षणाधिकारी दिनेश धवड म्हणाले, आधुनिक स्पर्धेचे युगात टिकण्याकरता चार भिंतीच्या बाहेरील व पुस्तकाव्यतिरिक्त अभ्यास करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्य आत्मसात करून आत्मनिर्भर व्हावे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून जीवन यशस्वी करता येते , तेव्हा वाचन, भाषण व लेखन कौशल्य वृद्धिंगत करावेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सतिष बागडे, सूत्रसंचालन कपिल अंबुडारे तर आभार प्रदर्शन हिमांशू रेवतकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सुनंदा जामदार, मिनाक्षी बकाल, प्रल्हाद पडोळे आदींनी सहकार्य केले.

## देवलापार पोलीसांची मोहफुल दारू काढणाऱ्यावर कार्यवाही

■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. १९ :**
दि. १७ ऑक्टोबर देवलापार पोलीस स्टेशन परीसरात पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरव्दारे माहीती मिळाली की, देवलापार हद्दीतील मौजा रयतवाडी, मौजा पवनी, मौजा तुमडीटोला शेत शिवार, मौजा मानेगावटेक येथे काही इसम आपल्या घरून तसेच शेत शिवारातून अवैदयरित्या विनापरवाना मोहाफुल गावठी दारूची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खबरेवरून नमुद घटनास्थळी रेड कारवाई करून आरोपी विलास रामप्रसाद उईके वय ४२ वर्ष रा रयतवाडी,टिकाराम सिताराम गोडबोले वय ६६ वर्ष रा पवनी, नंदकिशोर गुलाब उईके वय ३६ वर्ष रा तुमडीटोला, गणेश मंगल भलावी वय ४५ वर्ष रा मानेगावटेक यांचे घराची दारूबाबत घरझडती घेतली असता त्यांचे ताब्यातून एकुण २९१ लिटर मोहाफूल गावठी दारू कि. २९१०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार, रामटेक उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन देवलापार येथील ठाणेदार सहायक पोलीस निरीक्षक नारायण उरकुंडे, शिवचरण नागपुरे यांनी पार पाडली.

# वाडी शहर पथविक्रेता समिती निवडणूक



■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी, दि. १९ :**
नगर परिषद अंतर्गत वाडी शहर पथविक्रेता समिती २०२४ च्या समिती सदस्यांकरीता संपन्न झालेल्या निवडणूकीत बिनविरोध निवडून आलेल्या ८ सदस्यांना वाडी नगर परिषदचे मुख्याधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विजय देशमुख यांनी सदस्य प्रमाणपत्र देऊन अभिनंदन केले.

वाडी शहरातील पथविक्रेता समिती साठी ८ सदस्य नियुक्ती करिता कामगार आयुक्त यांचे निर्देश पत्रानुसार निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये सर्वसाधारण गटात ३ सदस्यांपैकी १ महिला राखीव, २ पुरुष,अनुसूचित जाती मधून १, अनुसूचित जमाती महिला मध्ये १, इतर मागासवर्गीय १, अल्पसंख्याक महिला १,व दिव्यांग गटातून १ अश्या ८ जागांसाठी निवडणूका घेण्यात आल्या.

सोमवार ७ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखे पर्यंत आरक्षित जागेसाठी प्राप्त झालेल्या उमेदवारी अजार्नुसार शुक्रवार १८ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विजय देशमुख यांच्या समक्ष सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दिनेश बुधे व योगेश नगराळे, नंदन गेडाम यांनी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करून सर्वसाधारण गटातून पारसमनी कुडप्पा, नरेश चव्हाण,शमीम शेख, अनुसुचित जाती मधून रोशन सोमकुवर, अनुसुचित जमाती मधून माधुरी भलावी, मागासवर्गीय मधून अजय देशमुख,अल्पसंख्याक नजमा शेख, व दिव्यांग गटातून रोशन बागडे यांची नावे बिनविरोध निवड म्हणून घोषित करण्यात आले.यावेळी डॉ.विजय देशमुख यांनी नियुक्त सदस्यांचे प्रमाणपत्र देऊन अभिनंदन केले.

# साई इंटरनॅशनल स्कूलमध्ये ग्लोबल हँड वॉश डे साजरा

■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. १९ :**
ग्लोबल हँड वॉशिंग डे ही जगभरातील लोकांना त्यांच्या हात धुण्याच्या सवयी सुधारण्यासाठी प्रेरित आणि एकत्रित करण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय हात धुण्याची जाहिरात मोहीम आहे.

साई इंटरनॅशनल स्कूलच्या किंडरगार्टन विंगच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राथमिक वर्गांनी त्यांच्या वर्ग शिक्षकांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली साबणाने हात धुण्याचा आनंद लुटला. त्यांनी हात धुण्याच्या क्रियाकलापांशी संबंधित सुंदर गाणी देखील गायली.



या कार्यक्रमा मागचा मुख्य उद्देश आणि उद्देश हा जागतिक हात धुवा दिनाच्या महत्त्वाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता पसरवणे हा होता. प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि सर्व सहभागींना शुभेच्छा दिल्या.

# जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा

■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी , दि. १९ :**
येथील जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामधे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विज्ञान अभ्यास मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या वादविवाद स्पर्धेत प्राची मेश्राम या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकावला.

यावेळी ३०सहभागी विद्यार्थ्यांनी आजच्या आधुनिक युगामध्ये स्त्री ही सुरक्षित आहे की नाही या विषयावर वादविवाद करून विषयाच्या सकारात्मक व नकारात्मक बाजूने आपले विचार मांडले.




यावेळी सदर स्पर्धेच्या परीक्षकांनी सहभागी विद्यार्थ्यांचे संवाद कौशल्य, प्रेक्षकाभिमुख वक्तृत्व, वेळेचे नियोजन, मुद्देसूद मांडणी या बाबीचा विचार करून सदर स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धेत नगमा पठाण हिने द्वितीय तर संजना भांडारकर हिने तृतीय क्रमांक मिळविला. स्पर्धेचे परीक्षण प्रा. शितल बोंडे, प्रा. राहुल डोईफोडे व प्रा. अक्षय पाटील यांनी केले. यावेळी जवाहरलाल नेहरू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. संजय टेकाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ. नरेंद्र घारड, डॉ. गजानन झाडे, डॉ. लीना फाटे, डॉ. अर्चना देशमुख, डॉ. नभा कांबळे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ZAKIA SULTANA AHMED.** NOW MY NEW NAME IS **ZAKIA NIAZ AHMED.**
**ADD :** PLOT NO.1,B FIRDOUSE COLONY, ROHINI CO-OP, H.SOCIETY, NR. SHYAM LAWN, NAGPUR - 440013

# वाघांच्या हल्ल्यात बळी पडलेल्यांचा कुंटुबीयांना भेट



■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक, दि. १९ :**
तालुक्यातील खनोरा आणि जमुनिया टूयापार परिसरात वाघांच्या हल्ल्यात दोन निष्पाप आदीवासी नागरिकांनी आपला प्राण गमावला आहे.

राजकुमार खंडाते आणि सुकराम सरयाम या दोघांचा या दुर्दैवी घटनेत मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

तर सदर घटनेने परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, स्थानिक लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना आहे. यावेळी माजी मंत्री तथा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मुळक तसेच जिल्हा परिषद सदस्या श्रीमती शांताताई कुमरे यांनी मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

# बीकेसीपी शाळेच्या खेळाडूंची मैदानी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी

■ **महासागर प्रतिनिधी**
**कन्हान, दि. १९ :**
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, चंद्रपूरच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय ॲथलेटिक्स स्पर्धेत बीकेसीपी शाळा कन्हान पारशिवनी तालुक्या तील खेळाडुंनी उत्कृष्ट कामगिरी केली.

दि.१७ ते १९ या कालावधीत जिल्हा क्रीडा अधिकारी चंद्रपूर यांच्यामार्फत विभागीय मैदानी खेळां चे आयोजन करण्यात आले होते. या खेळात बीकेसी पी शाळा कन्हानच्या काही गुणवंत खेळाडुंनी उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्णपदक पटकावले व राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश निश्चित केला आहे. या स्पर्धेत शाळेची गुणवंत खेळाडु कु. अनन्या मंगर हिने ४०० मीटर व धावनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण पदक पटकावले व राज्यस्तरीय स्पर्धेत आपले नाव नोंदवले आहे. अनन्यासह, गौरव सिंग, प्रथमेश बारई, सोहम ठाकरे, सनी कारेमोरे या खेळाडुंनी ४ ७ १०० रिले धावनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून सुवर्ण पदक प्राप्त करून राज्य स्पर्धेत आपल्या चंमुचा प्रवेश निश्चित केला आहे. हे सर्व खेळाडु बीकेसीपी शाळेच्या शारीरिक शिक्षक अमित राजेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्श नात प्रशिक्षण घेत आहेत. बीकेसीपी शाळेचे संस्था अध्यक्ष राजीव खंडेलवाल, सचिव पुष्पा गेरोला, हायस्कुलच्या मुख्याध्यापिका कविता नाथ, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका रुमाना तुर्क, ज्येष्ठ शिक्षक विनयकुमार वैद्य, सर्व अधिकारी, शिक्षक, शिक्षि का व कर्मचारी वृंदानी विजेत्या खेळाडुंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



**जाहीरनामा**

**को.वि.श्रीमती. सारीका धात्रक, तहसिलदार, रामटेक यांचे न्यायालय**

प्र.क्र. ३/ एम आर सी-८१/२०२४
मौजा किरणापुर ता. रामटेक
जिल्हा नागपूर

ज्याअर्थी माया चंद्रभान चरपे रा. किरणापूर, ता. रामटेक, जि. नागपूर यांनी स्वतः नामे माया चंद्रभान चरपे यांचा जन्म दिनांक ०१.०१.१९८३ रोजी मौजा किरणापूर, ता. रामटेक येथे राहत्या घरी येथे झाला असुन जन्मची नोंद गट ग्रामपंचायत, किरणापुर येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत, किरणापुर यांनी दिनांक २६.०८.२०२४ रोजी नोंद नसल्याचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे नामे माया चंद्रभान चरपे यांचा जन्म दिनांक ०१.०१.१९८३ बाबत गट ग्रामपंचायत, किरणापुर येथे नोंद घेणे बाबत आदेश पत्र मिळणे करीता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जात नमूद माया चंद्रभान चरपे यांचा जन्म दिनांक दिनांक ०१.०१.१९८३ बाबत गट ग्रामपंचायत, किरणापुर येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २२/१०/२०२४ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितानी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०७/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

स्थळ :- रामटेक
दिनांक :- ०७/१०/२०२४

(सारीका धात्रक)
नायब तहसिलदार,
रामटेक

**पब्लिक नोटीस ( जाहीर सुचना )**

**कोर्ट विद्यमान ७ वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नागपूर**

नियमित दिवाणी दावा क. ११९३/२०२४
रुम नं ५१५ Pro. No. 16361
पे. ता. २९/११/२०२४ Dt. 11/10/24
वादी : १) पारवताबाई गणपत घोडेश्वर
२) भिमराव गणपत घोडेश्वर
३) अर्जुन गणपत घोडेश्वर
रा शिवसेना कार्यालयाजवळ, पाढंराबोडी, नागपूर.
... विरूध्द...
प्रतीवादी : १ जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी, सिव्हील लाईन, नागपूर.
Missing व्यक्ती- गणपत लकडुजी घोडेश्वर
(Missing dtd 10/11/2016)
रा. शिवसेना कार्यालयाजवळ, पाढराबोडी, नागपूर.

ज्याअर्थी उपरोक्त गणपत लकडुजी घोडेश्वर (Missing dtd 10/11/2016) रा. शिवसेना कार्यालयाजवळ, पाढराबोडी, नागपूर, हा बेपत्ता आहे. तो दि. १०/११/२०१६ पासून बेपत्ता झाला व त्यानंतर तो जिवंत किंवा मृत असल्याबद्दल त्याच्याविषयी कोणतीही माहिति उपरोक्त वादीस नसल्याचे वादींनी आपल्या दाव्यात नमुद केलेले आहे. सबब सदर गणपत लकडुजी घोडेश्वर तो अंदाजे ०८ वर्षापासून बेपत्ता असून तो मृत झाल्याचे घोषीत करण्यासाठी व वादी हे त्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी उपरोक्त वादीने या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर सूचनेद्वारे गणपत लकडुजी घोडेश्वर यांचे सर्व नातेवाईकांना, संबंधीतांना व आम जनतेस सुचित करण्यात येते की, त्यांचे बद्दल कोणत्याही व्यक्तीस, तो जिवंत असल्याबद्दल किंवा मृत झाल्याबद्दल कोणतीही माहिती असल्यास किवा वादी हे त्याचे कायदेशीर वारस असल्याबाबत काही आक्षेप, हरकत असल्यास अश्या व्यक्तींनी अशी माहिती किवा हरकत या न्यायालयात दिनांक २९/११/२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावी. नमूद दिलेल्या तारखेस अश्या प्रकारची कोणतीही माहिती किंवा हरकती या न्यायालयात उपस्तीठ न झाल्यास उपरोक्त दाव्याची एकतर्फी सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक १४/११/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर. नागपूर

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# भक्तिमार्ग

# प्रकाशपर्वाचं स्वागत असो

**दीपावलीच्या प्रकाशपर्वाला सामोरं जाण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असली तरी मानस एकच असतो, तो म्हणजे आनंद वाटणं आणि द्विगुणित करणं. याच समीकरणानुसार सध्या सगळीकडे आनंद आणि उत्साहाचे तरंग अनुभवायला मिळत आहेत. मनसोक्त बरसलेल्या पावसाने सृष्टीतही नवचैतन्य दाटलं आहे. अशा प्रसन्न आणि मंगलमय वातावरणात आलेल्या या प्रकाशपर्वाचं सहर्ष स्वागत करू या. मांगल्याचे दीप प्रज्वलित करु या!**



प्रासंगिक

दिवाळी, प्रकाशाचा महोत्सव... दीपावलीच्या मंगलपर्वाची सर्वांनाच आतुरता असते, प्रतीक्षा असते. खरं पाहता सध्या दिवाळीचं अप्रूप राहण्याचं कारण दिसत नाही कारण रोजच दिवाळी असल्यासारखी परिस्थिती आहे. तेव्हा राजाला दिवाळीचं नाविन्य काय? हे विधान अनेक लोकांना लागू पडणारं आहे. पण तरीदेखील हे औत्सुक्य टिकण्यामागे काही कारणं आहेत. दिवाळीच्या सणामागे अनेक मतितार्थ दडलेले आहेत. दिवाळी म्हणजे खरेदी, दिवाळी म्हणजे गोडाधोडाचे, चटपटीत फराळाचे जिन्नस, दिवाळी म्हणजे भेटवस्तूंची देवाणघेवाण, दिवाळी म्हणजे घराची सजावट. यादी कितीही लांबवता येईल पण आता आपल्याला या कशाचंच अप्रूप राहिलेलं नाही. जुन्या पिढीसाठी नसलं तरी नवीन पिढीसाठी खरेदी, बाजारहाट, साजरीकरण, एकत्र भेटणं, मजा करणं, भेटींची देवघेव या नित्यनियमाने घडणाऱ्या बाबी आहेत. पणत्या पेटत नाहीत हाच काय तो बदल, अन्यथा रोजचा दिवस आणि दिवाळीतील पाच दिवस यात विशेष फरक जाणवण्याचं तसं काहीच कारण दिसत नाही. पण तरी प्रत्येकाला दिवाळीची प्रतीक्षा असते. या पाच दिवसांमध्ये काय काय धमाल करायची, कोणाकडे जायचं, पर्यटनासाठी कोणती ठिकाणं निवडायची यावरील चर्चा खरंतर गौरी-गणपतीपासूनच सुरू होते. तेव्हापासूनच हे आनंदतरंग पसरायला लागतात. दिवाळी जवळ येऊ लागते तसतसा हा उत्सवज्वर वाढत जातो. सध्याही नेमकं हेच वातावरण अनुभवायला मिळत आहे. प्रकाशज्योती नंतर पेटतात पण आधी मनामनात उत्साह आणि उमंगाची ज्योत प्रज्वलित होते. सध्या जनमानसात अशा असंख्य प्रज्वलित ज्योती लवलवताना दिसत आहेत. त्यामुळे निर्माण होणारं पवित्र आणि प्रसन्न वातावरण अनुभवायला मिळत आहे. त्यात यंदा निसर्गाने साथ दिल्यामुळे सृष्टीनेही नवा शृंगार ल्यालेला आहे. सर्व सकारात्मकतेच्या पार्श्वभूमीवर येणारी ही दीपावली एक मंगलमय पर्वाची नांदी ठरो ही कामना.

भारतीय संस्कृतीमध्ये सणांची कमतरता नाही. दर महिन्याला कोणता ना कोणता सण असतो आणि उत्सवप्रेमी भारतीय प्रत्येक सण उत्साहाने साजरा करतो. ऋतूनुसार सणांचं प्रयोजन आणि साजरीकरण असतंच त्याचप्रमाणे साचलेपण दूर करुन चैतन्याचे धुमारे फुटावेत या हेतूनेही सण साजरे होतात. जनमानसातील चेतनाशक्ती चेतवणं हादेखील यामागील हेतू असतो. विचार करु जाता एक बाब प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे पाश्चात्य देशांमध्ये निसर्ग फारसा अनुकूल नाही. एक तर कमालीचा उकाडा अथवा कडाक्याची थंडी, आणि त्यात कोणतंही वेळापत्रक नसणारा पाऊस... सहाजिकच या लहरी आणि बेभरवशाच्या वातावरणाचा माणसांच्या चित्तवृत्तींवर दुष्परिणाम पडू शकतो, किंबहुना तो दिसतोही. वर्षातील बरेच महिने हाडं गोठवून टाकणाऱ्या आणि प्रखर सूर्यप्रकाशाअभावी चैतन्य हरपलेल्या अवस्थेत काढताना त्यांना नैराश्य अथवा मानसिक अस्थैर्याला तोंड द्यावं लागणं स्वाभाविक आहे. पण असं असूनही उत्साह वाढवणारे, सर्वांना एकत्र आणणारे, समाजमन जागृत करणारे सण मोठ्या संख्येने बघायला मिळत नाहीत. ख्रिसमस आणि थँक्स गिव्हिंग सारखे मोजके सण सोडले तर सणांची इतकी रेलचेल आणि इतकं वैविध्य अपवादानेच पहायला मिळतं. पण आपल्याकडे याच्या बरोबर उलट परिस्थिती आहे.

आपण प्रत्येक ऋतूचं, ऋतूच्या बदलत्या कलांचं स्वागत करतो. त्या बदलाला सामावून घेण्याचा, निसर्गाशी एकरूप होण्याचा आपला प्रयत्न असतो. दिवाळीदेखील हीच एकरूपता सांधण्याचा एक भाग आहे. येऊ घातलेल्या आल्हाददायक थंडीचं स्वागत, ऊन पाण्याचं स्नान, उटणं आणि सुगंधी साबणाने होणारं अभ्यंगस्नान, गोडधोड आणि चमचमीत फराळाची रेलचेल हे सगळे सोपस्कार आपल्याला या बदलाशी नकळत एकरूप करुन टाकतात. पौराणिक कथा, त्यांची आठवण म्हणून साजरे होणारे पूजाविधी, अर्चना, आराधना हा दिवाळीचा एक भाग झाला; जनमानसाची क्रयशक्ती वाढवणं, त्यांना एकत्र आणणं आणि नव्या प्रकाशपर्वाकडे घेऊन जाणं हा दुसरा भाग झाला आणि समाजातील उपेक्षित, गांजलेल्या वर्गाला आपल्याबरोबर घेऊन सण साजरा करणं हा तिसरा भाग झाला. दिवाळी अशी वेगवेगळे अर्थ घेऊन येते. जो अर्थ भावेल, पटेल, रुचेल तो घ्यावा आणि आनंद लुटावा. दिवाळी सगळ्यांनाच तृप्त करते.

सण हे माणसाच्या आयुष्यात आनंदाचे मळे फुलवण्यासाठी असतात. प्रत्येकाने सण कसा साजरा करावा हा अत्यंत वैयक्तिक प्रश्न आहे. कोणाला स्वत:साठी आणि कुटुंबियांसाठी खरेदी करुन दिवाळी साजरी करायला आवडेल तर कोणाला समाजातील उपेक्षित वर्गाला, गरजू मुलांना जरुरीचं सामान देऊन हा आनंद मिळेल. यावर कोणीच कोणाला काही सांगावं अशी परिस्थिती नाही. मला एक विचार पटतो याचा अर्थ तो सगळ्यांनाच पटेल असंही नाही. पण समाजाचा एक भाग म्हणून स्वत:चा विचार करतो तेव्हा दिवाळीचा असा सर्वव्यापी विचार व्हावा असं वाटतं. संवेदना, सहिष्णुता, विवेक, तारतम्य या सर्व पातळ्यांवर जोखताना दिवाळीचं असं साजरीकरण ही काळाची गरज असल्याचं जाणवत राहतं. दिवाळी आहे म्हणून मी स्वत: घरभर दिवे लावते, खूप सारी खरेदी करते असं नाही. लक्ष्मीपूजनासारखे पूजाविधी उत्साहाने होतात, पण या पलिकडे फार काही करत नाही. कारण दिवाळी म्हणजे परंपरा आणि आधुनिकता यांचा संगम आहे, असं मी मानते.

मला सणाच्या परंपरा मोडायच्या नाहीत पण त्यात फार अडकूनही रहायचं नाही. काळाशी सुसंगत असा बदल केला तरच सणाचं खरं प्रयोजन साध्य होतं असं मला वाटतं. आज 'मी'च्या पुढे जाऊन विचार करण्याची गरज आहे. या 'मी' च्या कोशातून कोणी, कसं आणि किती बाहेर यायचं हा ज्याचा-त्याचा प्रश्न आहे. कोणी दिवाळीला एखाद्या अनाथाश्रमातल्या मुलांना फराळाचं, नवीन वस्तूंचं वाटप करतात, कोणी विकासगंगेचा थेंबही वाट्याला न आलेल्या भागात जाऊन त्या वंचित आणि मागास बांधवांसमवेत दिवाळीचा आनंद लुटतात, कोणी मागास भागांमधील मुलांना शहरात आणून त्यांच्यासमवेत दिवाळी साजरी करतात तर कोणी वर्षभर घरात काम करणाऱ्या माणसांसवे दिवाळीचा आनंद लुटतात. प्रत्येकाचे मार्ग वेगळे असतात, पद्धत वेगळी असते पण अंतिमत: उद्देश एकच असतो... आपला आनंद दुसऱ्यांमध्ये वाटायचा! कारण वाटल्याने आनंद द्विगुणीत होतो हे सिद्ध झालेलं आणि मान्यता पावलेलं सत्य आहे.

आज आपण अशाच एका साजिऱ्या दिवाळीच्या स्वागतास सज्ज आहोत. लवकरच प्रत्येक अंगण ज्योतींच्या मंद प्रकाशाने उजळून निघेल, विजेच्या माळांनी आसमंत प्रकाशमान होईल. वाऱ्याच्या मंद झुळूकीवर आकाशदिवा झुलेल. बालगोपाळांनी केलेल्या छोटेखानी किल्ल्यांवर मावळे दिसू लागतील, फुलबाज्यांची तेजाळती रिंगणं बालमुखावर हास्य पसरवतील, नवे कपडे घालून आबालवृद्ध देवळाराऊळांमध्ये देवदर्शनाला जातील. दिवाळी पहाटसारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून एक संस्कारित, सौंदर्यगर्भ आणि मनमोहक वर्तुळ तयार होईल. हे सगळं वातावरण आपल्याला नेहमीच्या दिनक्रमातून बाहेर काढणार आहे. हा प्रकाश पाच दिवसच नव्हे तर पुढील ३६० दिवस उजळून टाकणारा आहे. या दिवसांमध्ये जुळलेले ऋणानुबंध संपूर्ण आयुष्याला नवा साज देणारे आहेत. म्हणूनच या आनंदपर्वाला हर्षोल्हासाने सामोरे जाऊ या! प्रकाशपर्वाचं मनापासून स्वागत करू या!

## बना कर्मयोगी...



बोध

शरीराचा आजार बरा करण्यासाठी आपण वैद्य किंवा डॉक्टरांकडे जातो. लक्षणांवरून रोगनिदान होतं आणि औषधोपचार केले जातात. हे झालं शारीरिक आजाराचं. मग मानसिक आजाराचं काय? राग, लोभ, ईर्ष्या हे सगळे मानसिक आजार आहेत. त्यांना षड्रिपु असंही म्हणण्यात आलंय. या षड्रिपुंवर विजय मिळवला की माणसाचं कल्याण होतं. या षड्रिपुंपैकी एक म्हणजे क्रोध. क्रोधामुळे माणसातले रजोगुण वाढतात. रजोगुण वाढले की माणूस क्रोधित होतो. यामुळे इच्छा नसतानाही माणूस पापकर्म करण्यास प्रेरित होतो. त्याच्या हातून अजाणतेपणी पाप होतं. रजोगुणाच्या संपर्कात आल्याने कामभावना उत्पन्न होते. या भावनेचं स्थायी रूप म्हणजे कामना. माणसाची कामना पूर्ण झाली नाही की त्याच्या मनात क्रोध उत्पन्न होतो. क्रोधामुळे माणसाची बुद्धी भ्रष्ट होते. आपण काय करतोय, याचं भानही माणसाला क्रोधात उरत नाही. बुद्धी भ्रष्ट झाल्याने विवेक नष्ट होतो. अखेरीस माणसाचं पतन होऊन विनाश होतो. क्रोध माणसाच्या विनाशास कारणीभूत ठरतो. म्हणूनच क्रोध हाच माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे.

आपल्या इंद्रियांवर नियंत्रण सर्वाधिक गरजेचं आहे. यासाठी दोन उपाय सुचवण्यात आले आहेत. पहिला उपाय म्हणजे यम आणि नियम. दुसरा उपाय म्हणजे इंद्रियांना ईश्वरभक्तीसाठी प्रेरित करणं. परमेश्वराच्या भक्तीमध्ये लीन झाल्यानंतर इंद्रियांना इतर कशाचंही भान राहणार नाही. विशेष करून कामभावनेचं भान उरणार नाही. या भावनेची जागा भक्तीने घेतलेली असेल. निसर्गातल्या तमो आणि रजोगुणांच्या पुढचा टप्पा म्हणजे सतोगुण धारण करणं. हा सुद्धा एक मार्ग मानण्यात आला आहे. रजोगुणामुळे माणूस सकाम कर्म करून कर्माच्या फळाची अपेक्षा धरतो. वांछित फळ मिळालं नाही की तो क्रोधित होतो. त्यामुळे सतोगुण अंगिकारण्यासाठी माणसाला कर्मयोगी बनलं पाहिजे. गीतेत निष्काम कर्मयोगाची व्याख्या वर्णन करण्यात आली आहे. कर्म करा पण फळाची अपेक्षा बाळगू नका, असं श्रीकृष्ण सांगतो. हीच भावना आपल्याला सतोगुणापर्यंत पोहोचवू शकते. त्यामुळे कर्म करताना आपण फळाची अपेक्षा धरता कामा नये. यामुळे कामना जागृत होणार नाही आणि क्रोधावरही नियंत्रण येईल.

## दुर्गासप्तशती साराविषयी...

**देवी म्हणजे आदिशक्ती. तिची प्रार्थना, आराधना तिन्ही त्रिकाळ करायला हवी. देवीमहात्म्याचं फल पुण्यदायी आहे. देवीची कृपा प्राप्त करून घेण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपायांपैकी एक म्हणजे दुर्गासप्तशतीसाराचं पठण. सप्तशतीमध्ये एकूण तेरा अध्याय आहेत. या अध्यायाचं तीन चरित्रांमध्ये विभाजन करण्यात आलं आहे. पहिल्या भागात मधु आणि कैटभ या दैत्यांच्या वधाचं वर्णन आहे. दुसऱ्या भागात महिषासूर मर्दनाची कथा गुंफण्यात आली आहे तर अखेरच्या भागात शुंभ-निशुंभाचा वध आणि सुरथ आणि वैश्यला मिळालेल्या वरदानाची कथा आहे. प्रत्येक अध्यायाच्या पठणाचं वेगळं फळ मिळतं. त्यामुळे आपल्या मनोकामनेनुसार सप्तशतीतल्या अध्यायाचं नियमित पठण केलं गेलं पाहिजे.**



परंपरा

सप्तशतीच्या पहिल्या अध्यायाच्या नियमित पठणामुळे सगळ्या चिंतांपासून मुक्ती मिळते. दुसऱ्या अध्यायाच्या पठणाने कोर्ट-कचेरीच्या खटल्यांमध्ये यश मिळतं. अर्थात भक्त प्रामाणिक आणि सच्चा असेल तरच देवी मदतीला धावून येते. खोट्या कामांसाठी देवी धावून येत नाही, हे लक्षात घेणं गरजेचं आहे. शत्रू तसंच विरोधकांच्या खेळींमुळे वैतागला असाल तर तिसऱ्या अध्यायाचं नियमित पठण केलं पाहिजे. दुर्गा मातेच्या कृपादृष्टीचा लाभ घ्यायचा असेल तर चौथ्या अध्यायाचं पठण केलं पाहिजे. पाचव्या अध्यायाच्या पठणाने देवी भक्तांच्या समस्या सोडवण्यात मदत करते. सहाव्या अध्यायाच्या पठणाने भय, शंका यापासून मुक्ती मिळते. मनोकामना पूर्ण करण्यासाठी सातव्या अध्यायाचं पठण केलं पाहिजे. सुयोग्य जोडीदार मिळावा यासाठी आठव्या अध्यायाचं पठण करा. हरवलेली व्यक्ती सापडावी तसंच अपत्यप्राप्ती व्हावी यासाठी नवव्या अध्यायाचं पठण करावं. दहाव्या अध्यायाच्या पठणामुळे दु:खाचा नाश होतो. मनोकामना पूर्ण करण्यासाठीही हा अध्याय वाचता येईल. व्यवसायात भरभराट व्हावी यासाठी अकरावा अध्याय वाचावा. मानसन्मान आणि सुखसंपत्ती हवी असेल बारावा अध्याय वाचावा. तेराव्या अध्यायाच्या पठणाने देवीची कृपा प्राप्त होते.

## नैवेद्यम समर्पयामी..



जाणून घ्या

परमेश्वराला नैवेद्य दाखवल्यानंतरच आपण प्रसाद किंवा अन्न ग्रहण करतो. देव नैवैद्यातला छोटासा अंश ग्रहण करतो, असं मानलं जातं तर देव नैवेद्याचा फक्त वास घेतो, असंही म्हटलं जातं. पण देव भावाचा आणि भक्तीचा भुकेला आहे. तांदळाच्या एका दाण्यातला अर्धा भाग देवाला भक्तीभावाने अर्पण केला तरी तो प्रसन्न होतो. महाभारतात कुंतीने श्रीकृष्णाला तांदळाचा अर्धा दाणाच खायला घातला होता. सुदाम्यानेही श्रीकृष्णासाठी मूठभर पोहे नेले होते. आपण होम हवन करतो. या हवनात अर्पण केलेल्या सामुग्रीतूनच देवाला अन्न मिळतं, असा उल्लेख धर्मग्रंथांमध्ये आढळतो. हवनामुळे पर्यावरण शुद्ध होतं शिवाय देवाची भूकही भागते. तसं पहायला गेलं तर देव नैवैद्य म्हणून भक्तांचा अहंकार ग्रहण करतो आणि आपल्याला अन्न परत करतो. परमेश्वराला फळं, मिठाया अर्पण करताना आपण अर्पण केल्याची भक्ताची भावना असते. पण नैवेद्य दाखवल्यानंतर तो प्रसाद होऊन जातो आणि लोकांमध्ये वाटला जातो. देवाचा प्रसाद कोणताही भेदाभेद करत नाही. यामुळे माणसाचा अहंकार दूर होतो.

प्रसाद ग्रहण करण्याआधी देवाचं स्मरण करावं. देवाला अर्पण केलेला नैवेद्य खाल्ल्याने अनेक देवी-देवतांची कृपा आणि शक्ती आपल्याला मिळते. यामुळे आपल्या आसपासच्या आणि अंतरातल्या नकारात्मक ऊर्जेचा अंत होतो. प्रसाद खाल्ल्याने माणसाच्या जन्मजन्मांतरीच्या पापांचा नाश होऊन पुण्याची वृद्धी होते असं पुराणांमध्ये नमूद करण्यात आलं आहे.

## बँकॉकचं ब्रह्म मंदिर...



तीर्थक्षेत्र

ब्रह्मदेवाने या जगाची उत्पत्ती केली असली तरी त्याची जगभरात तीन ते चार मंदिरं आहेत. त्यापैकी एक म्हणजे बँकॉकचं ब्रह्म मंदिर. हे मंदिर फार प्राचीन नाही. अवघ्या ६० ते ७० वर्षांपूर्वी याची निर्मिती करण्यात आली आहे. पर्यटनाच्या दृष्टीने या मंदिराला मोठं महत्त्व आहे. भूताखेतांपासून बचाव करण्यासाठी या मंदिराची निर्मिती करण्यात आल्याचं बोललं जातं. या मंदिराला 'ईरावन तीर्थ' असं म्हटलं जातं. हे मंदिर १९५६ मध्ये उभारण्यात आलं. इथे ब्रह्मदेवाची सोन्याची मूर्ती आहे. या मंदिराच्या निर्मितीमागची कथा मोठी रंजक आहे. या ठिकाणी 'ईरावन' नावाचं हॉटेल बांधण्याचं योजलं गेलं होतं. हॉटेलच्या कामाला सुरूवात झाल्यापासूनच बऱ्याच अडचणी येऊ लागल्या. इथल्या काही कामगारांचे मृत्यूही झाले. त्यामुळे या ठिकाणी वाईट शक्तींचा वास असल्याची धारणा झाली. परिणामी, कुणीही इथे काम करायला तयार होत नव्हतं. ही समस्या सोडवण्यासाठी ज्योतिषाचा सल्ला घेण्यात आला. या स्थानी ब्रह्मदेवाचं मंदिर बांधण्याची सूचना त्याने केली. विश्वाचा निर्माता असल्याने ब्रह्मदेवाचं मंदिर बांधल्यानंतर समस्या दूर होईल, असं मानण्यात आलं. त्यानुसार मंदिराची उभारणी करण्यात आली. मंदिराच्या स्थापनेनंतर इथे हॉटेलची उभारणीही झाली. इथे ब्रह्माची चार तोंडांची मूर्ती आहे. जिटर पिंकवित नावाच्या मूर्तीकाराने या मूर्तीची निर्मिती केली. प्लास्टर ऑफ पॅरिसवर सोन्याचं पाणी चढवून ही मूर्ती घडवण्यात आली आहे. ९ नोव्हेंबर १९५६ रोजी या मूर्तीची स्थापना करण्यात आली.


थायलंडमध्ये ब्रह्मदेवाला ताओ महाप्रोमच्या नावानेही ओळखलं जातं. बांधकामासंबंधात काही अडचणी असतील तर ब्रह्मदेव दूर करतो, अशी इथल्या भाविकांची श्रद्धा आहे. हिंदूधर्मीयच नाही तर बँकॉक आणि आसपासच्या परिसरातले इतर धर्मीयही या मंदिरात येऊन पूजा-अर्चना करतात. हे मंदिर अनेकांचं श्रद्धास्थान बनून गेलंय.

## महती महावास्तुची...

वास्तू भक्ती

स्वत:चं हक्काचं घर असावं, असं प्रत्येकाला वाटत असतं. आपल्या घरात आनंद नांदावा, असं वाटत असेल तर विशिष्ट शुभमुहुर्तावरच घराचा पाया रचला गेला पाहिजे किंवा गृहप्रवेश केला गेला पाहिजे. नवरात्र तसंच दिवाळीतले काही दिवस गृहप्रवेशासाठी अत्यंत शुभ मानले जातात. नवरात्र आणि दिवाळीच्या वातावरणात आनंदी आणि समृद्धीच्या तत्त्वांचा संचार असतो. या दिवसांमध्ये वातावरणातली पाच तत्त्वं संतुलित असतात. त्यामुळे या दिवसात महावास्तूयोग बनतो आणि हा महावास्तूयोग घराच्या दृष्टीने शुभ मानला जातो.

वातावरणात अनादी अनंत काळापासून महावास्तु अस्तित्त्वात आहे. महावास्तू चार दिशा आणि पंचतत्त्वांमध्ये वसली आहे. पंचतत्त्व आणि चार दिशांमधल्या रिक्त जागा महावास्तू भरते. जीवनात आनंद नांदण्याच्या दृष्टीने महावास्तू अत्यंत महत्त्वाची मानली जाते. घराची निर्मिती करताना किंवा घर विकत घेताना काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. मुलांच्या खोल्या उत्तर आणि पूर्व दिशेला असल्या पाहिजे. शौचालय घराच्या उत्तर-पूर्व दिशेला असू नये. नवपरिणित दांपत्याची खोली उत्तर किंवा उत्तर-पश्चिम दिशेला असली पाहिजे. कार्यालयात शौचालय दक्षिण दिशेला असलं पाहिजे. सकारात्मक ऊर्जेसाठी कार्यालयाचं प्रवेशद्वार उत्तर किंवा पूर्वेकडे असलं पाहिजे. स्वयंपाकघर दक्षिण-पूर्व दिशेला असलं पाहिजे. घर किंवा कार्यालय विकत घेण्याआधी प्रवेशद्वाराची दिशा तपासून घ्यायला हवी. प्रवेशद्वार पूर्व किंवा उत्तर दिशेला असलं पाहिजे. पूर्वेकडे असलेलं प्रवेशद्वार शुभ मानलं जातं.



## का जावं तीर्थयात्रेला?

धर्म देशोदेशीचे

हिंदू धर्मात तीर्थयात्रा करण्यावर भर देण्यात आलाय. संन्यासाश्रमात सगळी कर्तव्यं पूर्ण होतात तेव्हा तीर्थयात्रा केल्याने पुण्य मिळतं आणि हे पुण्य मोक्षदायी असतं असं मानलं जातं. पण माणसाचा मोह अखेरपर्यंत सुटत नाही. त्यामुळे तीर्थक्षेत्री जाणं दूरच; जवळच्या मंदिरात जायलाही त्याला वेळ नसतो. पापांमधून मुक्ती, मोक्ष, पुण्याची प्राप्ती या कारणांमुळे तीर्थक्षेत्री गेलं पाहिजे. यासोबतच तीर्थक्षेत्री जाण्याचे अनेक लाभ आहेत. या लाभांमुळे तीर्थक्षेत्री जाण्याची योजना आखायला हवी.

* मंदिर आणि तीर्थस्थानांना ऊर्जेचं केंद्र मानलं जातं. या ठिकाणांसारखी ऊर्जा इतर कोणत्याही ठिकाणी नसते. त्यामुळे मंदिरात गेल्यावर माणासाला शांत वाटतं. इथे गेल्यावर बळ मिळाल्याची जाणीव होते. नियमितपणे मंदिरात जाणारे लोक शांत आणि सकारात्मक ऊर्जेने भारलेले असतात.

* हिंदू धर्मातली अनेक तीर्थस्थानं उंच डोंगरावर आहेत. नदी तसंच समुद्रकिनारीही ही स्थानं वसली आहेत. या ठिकाणचं वातावरण पवित्र असतं. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब सकारात्मक मानली जाते. उंचावर असलेल्या मंदिरांमुळे व्यायामही होतो.



* तीर्थयात्रेमुळे आपलं भौगोलिक, अध्यात्मिक आणि ऐतिहासिक ज्ञान वाढतं. त्या ठिकाणची परंपरा जाणून घ्यायची संधीही मिळते.

* तीर्थयात्रेमुळे आपण अनेक लोकांना भेटतो. आपला संपर्क वाढतो. विचारांची देवाणघेवाण होते.

हे सगळे लाभ लक्षात घेता तीर्थयात्रेला जाणं गरजेचं आहे.




### ठाकरे गटाच्या उमेदवारासाठी बूथही लावणार नाही, काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा इशारा

# दक्षिण नागपूरवरून मविआत वाद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघावरून महाविकास आघाडीतील काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात टोकाचा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसच्या येथील पदाधिकाऱ्यांनी ही जागा ठाकरे गटाला सोडली तर त्यांचे कोणतेही काम न करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. एवढेच नाही तर त्यांनी या विरोधात सामूहिक राजीनामा देण्याचाही इशारा दिला आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. त्यानुसार २० नोव्हेंबर रोजी राज्यात एकाच टप्प्यात निवडणूक होणार आहे. त्यासाठी बुधवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पण विरोधी बाकावरील महाविकास आघाडीचे जागावाटप अद्याप हातावेगळे झाले नाही. त्यातच काँग्रेस व ठाकरे गटात दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघावरून चांगलाच वाद रंगला आहे.

महाविकास आघाडीच्या जागावाटपात दक्षिण नागपूर व रामटेक विधानसभा मतदारसंघावरून काँग्रेस व ठाकरे गटात जोरदार रस्सीखेच सुरू आहे. नागपूर शहरातील ६ पैकी १ व ग्रामीण भागातील ६ पैकी १ अशा २ जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला हव्या आहेत. शिवसेनेने रामटेक मतदारसंघातून यापूर्वी निवडणूक लढवली आहे. त्यामुळे हा मतदारसंघ आपल्याला देण्यात यावा असा आग्रह त्यांनी काँग्रेसकडे धरला आहे. यामुळे वाद वाढला आहे.

दुसरीकडे, नागपूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या मतदारसंघातील ठाकरे गटाची ही मागणी जोरकसपणे फेटाळून लावली आहे. ते म्हणाले, नागपूर दक्षिण मतदारसंघात काँग्रेस घरोघरी पोहोचलेला पक्ष आहे. इथे शिवसेनेची कोणतीही उपस्थिती नाही. त्यामुळे हा मतदारसंघ काँग्रेसलाच मिळाला पाहिजे. असे झाले नाही तर काँग्रेसचे येथील पदाधिकारी आपले सामूहिक राजीनामे देतील.

विशेषतः ठाकरे गटाच्या उमेदवारासाठी ते येथे बूथही लावणार नाहीत. मग त्यांनी मते घेऊन दाखवावेत. या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उद्धव ठाकरे यांना स्थिती ओळखण्याचीही विनंती केली आहे.

ठाकरे गट प्रमोद मानमोडे नामक इच्छुक उमेदवारासाठी नागपूर दक्षिण विधानसभेची मागणी करत आहे. पण मानमोडे यांना मागील विधानसभा निवडणुकीत केवळ ४ हजार मते मिळाली होती. त्यांना त्यांचेच कर्मचारीही मतदान करत नाहीत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी स्थिती ओळखून निर्णय घ्यावा. आमचा आमच्या पक्षश्रेष्ठींवर विश्वास आहे. नाना पटोले हा मतदारसंघ पक्षाकडे राखण्यात यशस्वी होतील, असेही या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

२०१९ च्या निवडणुकीत दक्षिण नागपूरमधून भाजपाचे मोहन मते यांच्या विरोधात काँग्रेसने गिरीश पांडव यांना रिंगणात उतरविले होते. त्यावेळी मते यांना ८४३३९ तर पांडव यांना ८०३२६ मते मिळाली होती. अवघ्या ४०१३ मतांनी पांडव पराभूत झालेत. यावेळी गिरीश पांडव नव्या दमाने लढण्याच्या तयारीत असले तरी ठाकरे गटाने आपले घोडे दामटले आहे. परिणामी, काँग्रेसमध्ये कमालीचा रोष उफाळून आला आहे.

# विदर्भाच्या ११ जिल्ह्यातील विधानसभेचे आमदार

## २०१९ मधील निवडणूक निकाल आणि नंतर पक्ष बदलामुळे झालेल्या फेरबदलानुसार

### बुलढाणा जिल्हा :

21) मलकापूर विधानसभा - राजेश एकाडे (काँग्रेस)
22) बुलढाणा विधानसभा - संजय गायकवाड (शिवसेना - शिंदे)
23) चिखली विधानसभा - श्वेता महाले (भाजप)
24) सिंदखेड राजा विधानसभा - राजेंद्र शिंगणे (राष्ट्रवादी)
25) मेहकर विधानसभा - संजय रायमूलकर (शिवसेना शिंदे)
26) खामगाव विधानसभा - आकाश फुंडकर (भाजप)
27) जळगाव जामोद विधानसभा - संजय कुटे (भाजप)

### अकोला जिल्हा :

28) अकोट विधानसभा - प्रकाश भारसाकळे (भाजप)
29) बाळापूर विधानसभा - नितीन देशमुख (शिवसेना - उद्धव ठाकरे)
30) अकोला पश्चिम विधानसभा - गोवर्धन शर्मा (भाजप) (निधन)
31) अकोला पूर्व विधानसभा - रणधीर सावरकर (भाजप)
32) मूर्तिजापूर विधानसभा - हरीश पिंपळे (भाजप)

### वाशिम जिल्हा :

33) रिसोड विधानसभा - अमित झनक (काँग्रेस)
34) वाशिम विधानसभा - लखन मलिक (भाजप)
35) कारंजा विधानसभा - राजेंद्र पाटनी (भाजप)

### अमरावती जिल्हा :

36) धामणगाव रेल्वे विधानसभा - प्रताप अरुण अडसड (भाजप)
37) बडनेरा विधानसभा - रवी राणा (अपक्ष)
38) अमरावती विधानसभा - सुलभा खोडके (काँग्रेस)
39) तिवसा विधानसभा - यशोमती ठाकूर (काँग्रेस)
40) दर्यापूर विधानसभा- बळवंत वानखेडे (काँग्रेस) (लोकसभेवर निवड)
41) मेळघाट विधानसभा - राजकुमार पटेल (प्रहार जनशक्ती)
42) अचलपूर विधानसभा - बच्चू कडू (प्रहार जनशक्ती)
43) मोर्शी विधानसभा - देवेंद्र भुयार (स्वाभिमानी) - सध्या अजित पवारांसोबत

### वर्धा जिल्हा :

44) आर्वी विधानसभा - दादाराव केचे (भाजप)
45) देवळी विधानसभा - रणजित कांबळे (काँग्रेस)
46) हिंगणघाट विधानसभा - समीर कुणावार (भाजप)
47) वर्धा विधानसभा - पंकज भोयर (भाजप)

### नागपूर जिल्हा :

48) काटोल विधानसभा - अनिल देशमुख (राष्ट्रवादी- शरद पवार)
49) सावनेर विधानसभा - सुनील केदार (काँग्रेस)
50) हिंगणा विधानसभा - समीर मेघे (भाजप)
51) उमरेड विधानसभा - राजू पारवे (काँग्रेस) - सध्या शिवसेना एकनाथ शिंदे
52) नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा- देवेंद्र फडणवीस (भाजप)
53) नागपूर दक्षिण विधानसभा - मोहन माटे (भाजप)
54) नागपूर पूर्व विधानसभा - कृष्णा खोपडे (भाजप)
55) नागपूर मध्य विधानसभा - विकास कुंभारे (भाजप)
56) नागपूर पश्चिम विधानसभा - विकास ठाकरे (काँग्रेस)
57) नागपूर उत्तर विधानसभा - नितीन राऊत (काँग्रेस)
58) कामठी विधानसभा - टेकचंद सावरकर (भाजप)
59) रामटेक विधानसभा - आशिष जयस्वाल (अपक्ष - शिंदे गट)

### भंडारा जिल्हा :

60) तुमसर विधानसभा - राजेंद्र कारेमोरे (राष्ट्रवादी - अजित पवार )
61) भंडारा विधानसभा - नरेंद्र भोंडेकर (अपक्ष- शिंदे गट)
62) साकोली विधानसभा - नाना पटोले (काँग्रेस)

### गोंदिया जिल्हा :

63) अर्जुनी मोरगाव विधानसभा - मनोहर चंद्रिकापुरे (राष्ट्रवादी - अजित पवार)
64) तिरोडा विधानसभा - विजय रहांगदळे (भाजप)
65) गोंदिया विधानसभा - विनोद अग्रवाल (अपक्ष - भाजपाला समर्थन)
66) आमगाव विधानसभा - सहसराम कोरेटी (काँग्रेस)

### गडचिरोली जिल्हा :

67) आरमोरी विधानसभा - कृष्णा गजबे (भाजप)
68) गडचिरोली विधानसभा - डॉ. देवराव होळी (भाजप)
69) अहेरी विधानसभा - धर्मरावबाबा आत्राम (राष्ट्रवादी- अजित पवार)

### चंद्रपूर जिल्हा :

70) राजुरा विधानसभा - सुभाष धोटे (काँग्रेस)
71) चंद्रपूर विधानसभा - किशोर जोगेवार (अपक्ष)
72) बल्लारपूर विधानसभा - सुधीर मुनगंटीवार (भाजप)
73) ब्रह्मपुरी विधानसभा - विजय वडेट्टीवार (काँग्रेस)
74) चिमुर विधानसभा - कीर्तीकुमार भांगडिया (भाजप)
75) वरोरा विधानसभा - प्रतिभा धानोरकर (काँग्रेस) (सध्या लोकसभेवर)

### यवतमाळ जिल्हा :

76) वणी विधानसभा - संजीव रेड्डी बोदकुलवार (भाजप)
77) राळेगांव विधानसभा - अशोक उईके (भाजप)
78) यवतमाळ विधानसभा - मदन येरावार (भाजप)
79) दिग्रस विधानसभा - संजय राठोड (शिवसेना- एकनाथ शिंदे)
80) आर्णी विधानसभा - संदीप धुर्वे (भाजप)
81) पुसद विधानसभा - इंद्रनिल मनोहर नाईक (राष्ट्रवादी - अजित पवार)
82) उमरखेड विधानसभा - नामदेव ससाणे (भाजप)

# भंडाऱ्यात महायुतीत फाटले तुमसरमध्ये आघाडीत बेबनाव

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर उमेदवारीसाठी प्रचंड मारामार असताना महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातही प्रचंड बेबनाव सुरू झाला आहे. विधानसभेचे केवळ ३ मतदारसंघ असलेल्या भंडारा जिल्ह्यातील भंडारा आणि तुमसर या दोन मतदारसंघातही कमालीचा संघर्ष दिसून येतो आहे. भंडारा मतदारसंघात एकनाथ शिंदे समर्थक अपक्ष आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्याविरोधात मित्रपक्ष भाजपानेच दंड थोपटले आहेत. दुसरीकडे, तुमसरमध्ये भाजपाचे माजी आमदार चरण वाघमारे यांच्या शरद पवार गटातील प्रवेशावरून मविआत वादाची ठिणगी पडली आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव भंडारा विधानसभा मतदारसंघात गेल्यावेळी भाजपा-शिवसेना युतीने ही जागा आठवले गटासाठी तर काँग्रेस-राकाँ आघाडीने प्रा. जोगेंद्र कवाडे गटासाठी सोडली होती. त्यावेळी भोंडेकर हे अपक्ष म्हणून निवडून आले. अडीच वर्षापूर्वीच्या बंडात त्यांनीही सूरत, गुवाहाटीची सफर केली. महायुतीमध्ये ही जागा शिंदे गटाच्या रूपात भोंडेकर यांनाच दिली जाईल, असे संकेत असताना आता भाजपा पदाधिकाऱ्यांनी त्यांचा प्रचंड विरोध चालवला आहे.

पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत भोंडेकर यांनी युतीधर्म पाळला नाही, भाजपा उमेदवार सुनील मेंढे यांच्यासाठी काम केले नाही, यासह इतर अनेक आरोप भाजपा पदाधिकारी करत आहेत. भोंडेकरांना तिकीट दिल्यास विरोधात काम करण्याचा इशाराही भाजपा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

**तुमसरमध्ये टोकाचा संघर्ष**

२०१४ मध्ये भाजपाकडून आमदार झालेले चरण वाघमारे यांना २०१९ मध्ये भाजपाने तिकीट नाकारले. यावेळी राष्ट्रवादीकडून राजू कारेमोरे निवडून आले. तेच चरण वाघमारे यांनी काही दिवसांपूर्वीच शरद पवार राष्ट्रवादीत प्रवेश घेतला असून, दादा गटातील कारेमोरेंना टक्कर देण्यास सज्ज झाले आहेत.

तथापि, शरद पवार गटासह काँग्रेसच्या अनेकांनी वाघमारेंना उमेदवारी नको म्हणून टोकाची भूमिका घेतली आहे. वाघमारेंचा राजकीय प्रवास अनेक पक्षातून झाला. २०१४ मध्ये भाजपाने त्यांना येथून संधी दिली आणि ते आमदारही झाले. मात्र, नंतरच्या काळात भाजपातच ज्येष्ठांशी त्यांचे बिनसले. परिणामी, आमदार असूनही त्यांना २०१९ च्या निवडणुकीत डावलण्यात आले. जिल्हा परिषदेत नाना पटोलेसोबत सत्तेत सहभागी झाल्याने वाघमारे मविआत येतील, असा अंदाज होता. अखेर त्यांनी शरद पवार गटात प्रवेश केला.

मात्र, शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष किरण अतकरी यांच्यासह अनेकांनी वाघमारेंचा विरोध चालवला आहे. नुकताच हा विरोधी गट मुंबईची वारी करून आला. सुप्रिया सुळे यांच्या मध्यस्थीने हा विरोधी गट तूर्तास शांत असला तरी, वाघमारे रिंगणात उतरल्यास शरद पवार यांच्या गटात पुन्हा एका बंडांची शक्यता नाकारता येत नाही.

# हमराज पक्षही विधानसभेच्या आखाड्यात उतरणार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक हमराज पक्ष लढवणार आहे. शिक्षण, आरोग्य, पाणी, जंगल, जमीन आणि घटनात्मक हक्क या मुद्द्यांवर हमराज पक्ष विधानसभेच्या रिंगणात उतरणार आहे.




सत्ताधारी पक्ष जनतेला आकर्षित करण्यासाठी आश्वासने देत आहेत. पण शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये असमानता आहे, बेरोजगारी वाढली असून, सत्ताधारी सत्तेच्या नशेत मस्त आहेत.

पाचव्या अनुसूचित क्षेत्रातील विकासाबरोबरच संविधानाने दिलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी कटिबद्ध राहू, सर्वसामान्यांचे हीत जोपासण्यास आमची प्राथमिकता असेल, असे राष्ट्रीय अध्यक्ष अकबर राम कोराम यांनी पत्र परिषदेत सांगितले. प्रदेश अध्यक्ष बारीराव मडावी, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद नागवंशी , प्रदेशाध्यक्ष बारीकराव मडावी उपस्थित होते .

## आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा लढणार ७५ जागा

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १९ :**
आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाने विधानसभा निवडणुकीमध्ये कंबर कसली आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांवर आरोप करत थेट ७५ जागांवर उमेदवार लढवण्याची घोषणा केली आहे.

आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने पत्रकार परिषदेत राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे यांनी सांगितले की, आघाडीच्या नेत्यांवर विश्वास ठेवला होता. परंतु रिपब्लिक कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता निवडणूक लढवली जात आहे. विधानसभेच्या निवडणुकीत आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा राज्यातील राखीव मतदार संघासह ७५ जागा स्वबळावर लढणार आहे. त्यात विदर्भातील अनेक जागांवर उमेदवार उभे करणार असल्याचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

## निधन

### सरजुबाई मानधना

■ **महासागर प्रतिनिधी, मेहकर, दि. १९ :**
माहेश्वरी समाजाचे प्रतिष्ठीत नागरीक अशोक मानधना यांच्या मातोश्री तथा लक्ष्मीकांत इलेक्ट्रीकल्सचे संचालक आनंद मानधना यांच्या आजी सरजुबाई श्रीकिसन मानधना यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी शुक्रवारी निधन झाले.



## आमदार संतोष बांगर यांना निवडणूक आयोगाची नोटीस

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :**
निवडणूक आयोगाने निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करताच राज्यात आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहितेचा पहिला फटका शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांना बसला आहे.



आमदार संतोष बांगर यांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे निवडणूक आयोगाने बांगर यांना नोटीस पाठवली आहे. निवडणूक आयोगाने नोटीस पाठवल्याने संतोष बांगर यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. कळमनुरी येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना आमदार संतोष बांगर यांनी मतदारांना आणण्यासाठी पैसे 'फोनपे'ने पाठवा असे विधान केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते व इच्छुक उमेदवार अजित मगर यांनी आमदार बांगर यांनी मतदारांना पैशांचे प्रलोभन दिल्याने निवडणूक आयोगाने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. यानंतर निवडणूक आयोगाने आमदार संतोष बांगर यांना त्यांनी केलेल्या वक्तव्याचा खुलासा करण्यासाठी नोटीस बजावली आहे. तसेच पुढील २४ तासांत खुलासा सादर करण्याची मागणी नोटीसीमधून निवडणूक आयोगाने केली आहे.

या प्रकरणावर बोलताना संतोष बांगर म्हणाले, मी कोणतेही वक्तव्य केले नाही. विरोधकांनी तयार केलेली कॉपी आहे. त्यामुळे माझ्या विरोधात जे काही झाले आहे ते सर्व चुकीचे आहे. विरोधकांकडे काही काम राहिले नाही. आपल्याला निवडणूक आयोगाकडून नोटीस आलेली नाही. नोटीस आल्यावर सुद्धा हाच खुलासा करणार असल्याचे संतोष बांगर म्हणाले.

## हेल कॅफेतील हुक्का पार्लरवर धाड

■ **महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि. १९ :**
बजाजनगर चौकातील हेल कॅफेवर पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर धाड टाकली. तेथे कॅफेच्या आड हुक्का पार्लर सुरू होता. पोलिसांनी संचालकासह 7 जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

अजहर रफीक शेख (38) रा. रामदासपेठ, रेहान नेगी (30) रा. सिव्हील लाईन्स, मणिकांता रेड्डी (23), चेतन रेड्डी (19), वीरबोयना आदित्य वर्धन (19) तिन्ही रा. व्हीएनआयटी कॉलेज, शुभम प्रकाश उईके (30) रा. ओमकारनगर आणि सोनिक विलास विधायतकर (27) रा. संजयनगर, पांढराबोडी अशी आरोपींची नावे आहेत. ग्राहकांना तंबाखूजन्य फ्लेव्हर मिश्रित हुक्का दिला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून बजाजनगर पोलिसांनी कॅफेवर धाड टाकली आणि कॅफे संचालकासह हुक्का पिणाऱ्या तरुणांना ताब्यात घेतले. कॅफेमधून 17,580 रुपयांचा मालही जप्त केला.

# भाजपाचे बहुतांश विधानसभा मतदार संघ पराभवाच्या छायेत...

**रघुवीरसिंह चौहान / यवतमाळ, दि. १९ :**

यवतमाळ जिल्हा एकेकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. पण,सत्तेची हवा काँग्रेस वाल्यांच्या एवढी डोक्यात शिरली होती की, सामान्यांच्या समस्या ऐकून घेण्यास काँग्रेसच्या पुढाऱ्यांना वेळच मिळत नव्हता, शेवटी नाईलाजाने मतदात्यांनीच ती हवा काढून घेतली. परिणामी मागील २० वर्षांपूर्वी हा काँग्रेसचा बालेकिल्ला ढासळण्यास सुरुवात झाली. बघता- बघता यवतमाळ- वाशीम लोकसभा आणि जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदार संघात काँग्रेसचे पानीपत झाले. पुढे लोकसभा मतदार संघासह जिल्ह्यातील पुसद वगळता सहाही विधानसभा मतदार संघ भाजप-सेनेच्या ताब्यात गेले.

काही पंचवार्षिक कालावधीपासून तर वणी, केळापूर, राळेगाव, यवतमाळ, उमरखेड हे पाच विधानसभा मतदार संघ अव्याहत भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात आहेत. परिणामी आता सत्तेची हवा सत्तारूढ भाजप आमदारांच्या डोक्यात एवढी शिरली की, हे काँग्रेसच्याही समोर निघून गेले.

यवतमाळ जिल्ह्यातील मतदाते आता अत्यंत सजग, सूज्ञ, समझदार झाले आहेत. त्याचा प्रत्यय नुकत्याच झालेल्या यवतमाळ - वाशिम लोकसभेच्या निवडणुकीत आला. भाजपसमर्थीत उमेदवाराचा १ लाखापेक्षा अधीक मतांनी पराभव करून, उध्दव ठाकरेच्या शिवसेनेचे म्हणजेच महाविकास आघाडीच्या संजय देशमुख यांच्याकडून, भाजपसमर्थीत उमेदवाराला पराभव पत्करावा लागला. एवढ्याने बरे की आधीच्या खासदार भावना गवळी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपसमर्थीत सेनेच्या उमेदवार नव्हत्या, अन्यथा पराभवातील फरकाचा आकडा कित्येक पटीने वाढला असता. मतदारांमध्ये सत्ताधारी महायुतीबाबत चीड निर्माण झाली आहे. त्याची कारणेही अनेक आहेत.

आता भाजप पक्षाच्या किंवा मोदीच्या नावावर कोणीही निवडून येते हा गैरसमज भाजपवाल्यांनी डोक्यातून काढून टाकणेच शहाणपणाचे ठरणार आहे. कारण, भाजपच्या काही आमदारांच्या कार्यप्रणालीला व डोक्यात गेलेल्या हवेमुळे मतदाते कंटाळले आहेत.सर्वसामान्य मतदारांसाठी कोणत्याच प्रकारचे समाधानी वातावरण अलीकडे दिसत नाही. भाजपच्या काही विद्यमान आमदारांबाबत मतदारांमध्ये तीव्र रोष व्यक्त होत आहे.

विशेषतः यवतमाळ,राळेगाव, केळापूर-आर्णी विधानसभा मतदार संघातील सामान्य नागरिकांचे कोणीही वालीच राहिले नाही असे नागरिक खुलेआम बोलताना दिसत आहेत. कोणत्याही अधिकारी, कर्मचाऱ्यांवर आमदारांचा वचक राहिला नाही. दिवसाढवळ्या खून, दरोडे, खुलेआम चालणारे अवैध धंदे, अवैध वाहतूक, शहरातील रस्त्यांची झालेली अत्यंत दैनावस्था, यवतमाळ शहरातील कोणत्याही रस्त्यांवर खड्डयांचेच साम्राज्य बघायला मिळते, त्याचे कारण काय ? हा संशोधनाचा विषय आहे.

विविध कामांमध्ये टक्केवारी प्रचंड फोफावल्याचा खुला आरोप दोन महिन्यापूर्वी एका माजी आमदाराने केला होता हे सर्वश्रुतच आहे. यवतमाळ शहरातील कोणत्याही रस्त्याने ये- जा करणा-या अनेक दुचाकीधारकांचे कंबरडे मोडल्याचे उदाहरणे समोर आले आहे. याचे कारण म्हणजे टक्केवारीतून झालेले रस्त्यांचे निकृष्ट काम.

यवतमाळ शहरवासीयांना अजूनही आठवडयातून एकदाच पिण्याचे पाणी मिळते, अमृत योजनेंतर्गतचे पाणी नियमित पुरविण्यात अजूनही यश आले नाही, प्रमुख अधिका-यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यासंदर्भात नेहमीच फुटणारे चर्चांचे पेव, शहरावासीयांना नेहमीच खंडीत विद्युत पुरवठयाचा करावा लागणार सामना,अशा निर्माण झालेल्या विविध समस्यांबाबत, समाधानाची अपेक्षा स्थानिक आमदारांकडून पूर्ण होने अपेक्षित असते. पण, तसे होताना दिसत नाही.

येन-केन प्रकारे भाजपला महायुतीची सत्ता महाराष्ट्रात स्थापन करायची आहे, त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवाभाऊ यांनी नानावीध योजना आणल्या, त्यात लाडकी बहीण, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके कामगार, लाडके कर्मचारी यांना तात्पुर्ते आकर्षित करणा-या योजनांच्या घोषणा करून, काही प्रमाणात अमलबजावणीही सुरू झाली. पण, सदर योजना महायुतीसाठी कितपत लाभदायक ठरेल हे सांगणे कठीनच आहे. उपरोक्त योजनेंतर्गत लाभार्थ्यांमध्ये समाधानापेक्षा, असमाधानीच वक्तव्ये ऐकायला मिळत आहे.

**भाजपला नवीन चेहरा गवसला**

एकंदरीत स्थिती बघता यवतमाळ जिल्ह्यातील भाजपाचे काही विधानसभा मतदार संघ डेंजरस झोनमध्ये असल्याचे सर्वत्र बोलले जात आहे. त्यात यवतमाळ, राळेगाव आणि केळापूर-आर्णी या विधानसभा मतदार संघाचा प्रकर्षाने अन्तर्भाव आहे, त्यामुळे या तिनही मतदार संघात भाजप नवीन चेहऱ्यांना संधी देण्याचे संकेत आहेत.

राळेगाव व केळापूर-आर्णी मतदार संघात नवीन चेहऱ्यांचा शोध सुरू असल्याचे वृत्त आहे. यवतमाळ विधानसभा मतदार संघात मात्र भाजपाकडे सर्व बाजूंनी समर्थ असलेला निष्ठावान नवीन चेहरा समोर आला आहे, ते म्हणजे भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र डांगे.. त्यांनी अनेक वर्षे भाजपाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली, त्यांनी पक्षसंघटनेत स्वतःला अनेक वर्षांपासून वाहून घेतले आहे.

राजेंद्र डांगे यांच्या जिल्हाध्यक्षपदाच्या कार्यकाळात जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदार संघातील निवडणुका जिंकून, भाजपाचे पाच आमदार विधानसभेत पाठविले. लोकसभेची निवडणूक लढण्यास राजेंद्र डांगे इच्छुक होते, कदाचित ते विजयी सुध्दा झाले असते व भाजपाच्या एका खासदाराची आणखी भर पडली असती. परंतु, यवतमाळ-वाशिम लोकसभेची जागा शिंदे गटाच्या सेनेला गेली होती. त्यामुळे महायुतीला दारूण पराभव पत्करावा लागला. यवतमाळ मतदार संघातून महायुतीत भाजपच्या उमेदवारी माळविण्यासह निवडणुकीत विजय प्राप्त करण्यासाठी राजेंद्र डांगे यांचे भाजपातील व बाहेरील सुध्दा समर्थक जोमाने कामी लागले असल्याचे दिसत आहे.

**देशांतर्गत उद्योग, कारखानदारी निर्धोक चालावी अशी इच्छा असेल, तर बँका सुस्थितीत असणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यापार-उद्योगासाठी दिलेल्या कर्जांची वसुली वेळेत होणे आवश्यक आहे. २०१६ मध्ये आलेल्या इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्सी कोडमुळे कर्जबाजारी कंपन्यांचे लवकरात लवकर पुनर्वसन होऊन त्या सक्रिय होणे अपेक्षित होते. आज आठ वर्षांनंतर या कोडमुळे नेमके काय साधल्याचे दिसते?**

# आयबीसीने काय साधले?



परामर्श

**हेमंत देसाई**
ज्येष्ठ पत्रकार

कर्ज थकवणाऱ्या कंपन्यांच्या दिवाळखोरी निराकरण प्रक्रियेत कर्जे देणाऱ्या बँका आणि वित्तीय संस्थांना फटका बसतो. त्यांनी दिलेल्या कर्जरकमेवर पाणी सोडावे लागण्याचे म्हणजेच 'हेअरकट'चे प्रमाण २०२३-२४ मध्ये ७३ टक्क्यांपर्यंत वाढले. म्हणजेच प्रत्येक थकित शंभर रुपयांमध्ये केवळ २७ रुपयेच वसूल होत आहेत. २०२२-२३ मध्ये 'हेअरकट'चे प्रमाण ६४ टक्के होते. म्हणजे ३६ टक्के रक्कमच वसूल होत होती. या प्रक्रियेत बँकांना होणारा भुर्दंड प्रचंड असून शेवटी हे पैसे सर्वसामान्य ठेवीदारांचेच असतात, हे लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने म्हणजेच 'एनसीएलटी'ने २०२४ मध्ये २६९ प्रकरणांचे निराकरण केले, जे वर्षभरापूर्वीच्या कालावधीत निराकारण झालेल्या १८९ प्रकरणांपेक्षा जास्त होते, असे 'इक्रा' या पतमानांकन संस्थेने आपल्या अहवालात म्हटले आहे.

आज यासंदर्भात नव्याने दाखल प्रकरणे २०२२-२३ मधील १२६३ वरून २०२३-२४ मध्ये ९८७ पर्यंत घसरली आहेत. परंतु कोविड टाळेबंदी आणि त्या कारणाने ठप्प पडलेल्या आर्थिक चक्राचा ताण आल्यामुळे २०२२-२३ या आर्थिक वर्षात दाखल प्रकरणांचे प्रमाण जास्त होते. एकूण थकलेली देणी पाहता, कर्ज देणाऱ्या बँका आणि वित्तीय संस्थांना या प्रकरणात सोसावे लागणारे नुकसान काळजी वाटावे इतपत आहे. विशेषतः कंपन्यांच्या दिवाळखोरीच्या निराकरणाच्या बाबतीत हा प्रश्न गंभीर बनला असून बोलीदाराला मालमत्ता कोणत्या मूल्यावर मिळत आहेत, याबद्दल काळजी वाटणे स्वाभाविकच आहे. इतक्या स्वस्तात मालमत्ता मिळत असतील, तर काहीजणांना शंकाही वाटू शकते. आयबीसी प्रक्रियेद्वारे निराकारणासाठी लागणारा सरासरी वेळ २०२३-२४ मध्ये वाढून ८४३ दिवसांवर पोहोचला आहे. अगोदरच्या वर्षात सरासरी वेळ ८३१ दिवस इतका होता. खरे तर, दिवाळखोरी कायद्यानुसार कालबद्ध निराकरणाची कमाल मर्यादा ही ३३० दिवसांची आहे. परंतु प्रत्यक्षात लागणारा वेळ हा अडीचपट अधिक आहे. 'इक्रा'च्या कर्जदात्या बँकांची सरासरी वसुली विद्यमान २०२४-२५ या आर्थिक वर्षातही ३० ते ३५ टक्क्यांच्या आत बाहेर राहील, असा अंदाज आहे.

आयबीसी कायद्याच्या अंमलबजावणीमुळे कर्जवाटप व्यवस्थित झाले तसेच एनपीए किंवा थकित कर्जाचे प्रमाण घटले. बड्या बड्या कॉर्पोरेट कंपन्यादेखील आपली कर्ज फेडण्याबाबत तुलनेने अधिक सजग झाल्या, हे खरे आहे. यापूर्वीही दिवाळीखोरी आणि कर्ज पुनर्रचना यासाठीची सोय होती. पण त्या प्रक्रियेत गुंतागुंत बरीच होती. त्यामुळे व्यवसायांना आणि बँकिंग क्षेत्राला थकित कर्जाबद्दल निर्णय घेणे जरा त्रासाचे होत असे. केंद्र सरकारने 'ईझ ऑफ डुइंग बिझिनेस' म्हणजेच सुलभतेने व्यवसाय करण्याच्या उद्देशाने नादारीविषयीचे कालबाह्य नियम बदलले आणि नवी संहिता लागू केली. परिणामी आणि अन्य काही कारणांमुळे 'ईझ ऑफ डुइंग बिझिनेस'मध्ये आंतरराष्ट्रीय मानांकनात भारताची क्रमवारी १४२ वरून ६३ अशी सुधारली.

वाढते शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे अनेक व्यवसाय आकाराला येत असून कर्ज घेण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. बँका आणि एनबीएफसी, म्हणजेच वित्तीय बँकेतर संस्थांनी विशेष कर्ज योजना आखून कर्जाची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. उद्योगक्षेत्र, व्यक्ती आणि नवउद्योजक या सर्वांच्या पतविषयक गरजा पूर्ण होऊ लागल्या. २०१६ मध्ये अस्तित्वात आल्यापासून पुढील थकित कर्जांच्या एकूण प्रकरणांपैकी ७२ टक्के प्रकरणे सोडवण्यात आली आहेत. विदेशी गुंतवणुकीचे सर्वाधिक पसंतीचे स्थान म्हणून भारताची ओळख आहे. शिवाय अन्य देशांच्या तुलनेत भारतात व्याजदर अधिक असल्यामुळे गुंतवणूकदारांना त्याचेही आकर्षण असते. परंतु नादारी निराकरणाच्या प्रक्रियेसाठी सगळ्या प्रकारचे सहकार्य करूनही काही कंपन्यांचे संचालक निराकरण अधिकाऱ्यांच्या विरोधात पोलिसात तक्रारी दाखल करतात.

२०२१ मधील एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने नादारी निराकरण प्रक्रियेत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या अटकेवर नाराजी व्यक्त केली होती आणि त्यांना पोलीस कोठडीतून सोडवलेही होते. दुसरे उदाहरण घडले, ते एका कला दिग्दर्शकाला देण्यात आलेल्या कर्जाबाबत. त्याला १८२ कोटी रुपयांची कर्जे स्टुडिओसाठी देण्यात आली. त्यांनी २०२० मध्ये या कर्जांची परतफेड करण्याचे थांबवल्यामुळे थकबाकी २५२ कोटी रुपयांवर गेली. कारण त्यात अर्थातच व्याज आणि दंडात्मक व्याजाचा समावेश होता. संबंधित असेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीने या कंपन्यांशी संबंधित समस्या हाताळणाऱ्या एनसीएलटी या विशेष न्यायालयाकडे याचिका दाखल केली. ती मान्य करण्यात आली. एनसीएलटीच्या आदेशानुसार संबंधित कंपनीला मालमत्तेचे हस्तांतरण किंवा विक्री करण्यास मनाई करण्यात आली. नादारीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही स्थगिती राहणार होती. दरम्यान, कर्ज घेणाऱ्या व्यक्तीने, म्हणजेच कलादिग्दर्शकाने आत्महत्या केली. त्याबरोबर कर्ज देणाऱ्या संबंधित कंपनीच्या अध्यक्ष आणि अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. एखाद्या व्यक्तीने आत्महत्या करणे, हे दुर्दैवी असले, तरीदेखील कर्जवसुली करावीच लागते, याचे भान ठेवले पाहिजे. अशा प्रकरणात राजकीय किंवा अन्य हस्तक्षेप झाल्यास स्टार्ट अप आणि नव्या उद्योजकांसाठी आवश्यक ते भांडवल पुरवण्यात बँका आणि एनबीएफसी यांच्याकडून हात आखडता घेतला जाऊ शकतो. एकूण, कर्ज निराकरण प्रक्रियेतील दिरंगाई संपली पाहिजे आणि थकित रकमेची जास्तीत जास्त वसुली होण्याची गरज आहे, हे विसरता कामा नये.

कर्ज देणारे पेमेंट डिफॉल्ट दर्शवणारी बँक स्टेटमेंट तयार करू शकतात तर कर्जदार आर्थिक अडचणी किंवा कराराच्या जबाबदाऱ्यांवरील विवाद दर्शवणारे आर्थिक रेकॉर्ड सादर करू शकतात. आवश्यक असल्यास न्यायाधिकरण विवादाचे मुद्दे स्पष्ट करण्यासाठी आणि सर्व संबंधित तथ्यांची कसून तपासणी केल्याची खात्री करण्यासाठी परीक्षांचे आयोजन करते. कर्ज परतफेडीच्या अटींवरील विवादात, डीआरटी कर्जदाराच्या आर्थिक स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी किंवा पेमेंट इतिहासाची पडताळणी करण्यासाठी बँकिंग रेकॉर्डची छाननी करण्यासाठी आर्थिक तज्ज्ञांना बोलावू शकते. ही सूक्ष्म तपासणी सुनिश्चित करते की निर्णय तथ्यात्मक अचूकता आणि कायदेशीर व्याख्यांवर आधारित आहेत. औपचारिक निर्णयाबाहेरील पक्षांमधील ऐच्छिक समझोता सुलभ करण्यासाठी डीआरटी सक्रिय रहात मध्यस्थीला प्रोत्साहन देतात. मध्यस्थी प्रक्रिया कर्जदार आणि कर्जदारांना परस्पर स्वीकार्य ठराव साध्य करण्याच्या उद्देशाने रचनात्मक वाटाघाटींमध्ये व्यस्त राहण्यास प्रोत्साहित करतात. हा दृष्टिकोन केवळ खटल्यातील खर्च कमी करण्यात मदत करत नाही, तर दीर्घकाळापर्यंत कायदेशीर लढाया टाळून कर्जवसुलीची प्रक्रिया जलद करते. उदाहरणार्थ, कर्जदार आणि कर्जदार परतफेडीच्या वेळापत्रकांची पुनर्रचना करणे किंवा मालमत्ता हस्तांतरण किंवा आंशिक देयकांसह, सेटलमेंटच्या पर्यायी पद्धतींवर सहमत होणे यासारखे पर्याय शोधू शकतात. यशस्वी मध्यस्थीचा परिणाम परस्परसंमतीच्या अटींमध्ये होतो, ज्यांचे संमती ऑर्डरमध्ये औपचारिक रूपांतर होते.

कर्जवसुली न्यायाधिकरणाने घेतलेल्या निर्णयांवर अपील करण्याचा कर्जदारांना अधिकार आहे. 'डीआरटी'च्या निर्णयाचे पुनरावलोकन करणाऱ्या डेट रिकव्हरी अपील न्यायाधिकरण (डीआरएटी)समोर अपील सामान्यत: दाखल करणे आवश्यक असते. अपीलीय कार्यवाही कर्जदारांना प्रतिकूल निर्णयांना आव्हान देण्याची आणि उच्च न्यायालयीन छाननीद्वारे निराकरण करण्याची संधी देते. 'डेट रिकव्हरी ट्रिब्युनल'समोर होणारी मध्यस्थीची कार्यवाही पक्षांमधील ऐच्छिक समझोता सुलभ करून औपचारिक निर्णयासाठी प्रभावी पर्याय देते.

◇◇◇

**'ग्रेन बाऊल' म्हणून ओळखला जाणारा पंजाब भारतीय शेतीचा आधारस्तंभ आहे. तिथली सुपीक माती आणि समर्पित शेतकरी दरवर्षी लाखो टन धान्याचे उत्पादन करतात, जे भारताच्या अन्न गरजा पूर्ण करतातच पण निर्यातीतही योगदान देतात. असे असले तरी हवामानबदल, पाण्याचा अतिवापर आणि जमीन वापरातील बदल यासारख्या घटकांमुळे पंजाबच्या शेतजमिनीला धोका निर्माण होऊ शकतो, अशी चिंता समोर आली आहे.**

# पंजाबचे वाळवंट?



विशेष

**प्रा. अशोक ढगे**

शेतीमध्ये उच्च उत्पादन मिळवण्यासाठी पंजाबमध्ये नायट्रोजन, फॉस्फेट आणि पोटॅश यासारख्या खतांचा सर्वाधिक वापर केला जातो. केंद्रीय रसायन आणि खते मंत्रालयाने ६ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यसभेत सादर केलेल्या आकडेवारीनुसार, पंजाबने २०२३-२४ मध्ये प्रति हेक्टर २४७.६१ किलो खताचा वापर केला. हे प्रमाण राष्ट्रीय सरासरी (१३९.८१ किलो प्रति हेक्टर)च्या जवळपास दुप्पट आहे. पंजाबमध्ये भारतातील केवळ १.५३ टक्के कृषी क्षेत्र असले, तरी देशात वापरल्या जाणाऱ्या एकूण खतांपैकी नऊ टक्के खतांचा वापर होतो. आकडेवारीनुसार, एनपीके (नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम) खतांचा वापर गेल्या चार दशकांमध्ये (१९८०-२०१८) १८० टक्क्यांनी वाढला आहे. याच चार दशकांमध्ये एकट्या पंजाबमध्ये युरिया (नायट्रोजन)चा वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. त्याच अहवालानुसार भात आणि गव्हासाठी युरियाचा वापर अनुक्रमे ०.९ क्विंटल आणि १.१ क्विंटल प्रति एकर (०.४ हेक्टर) असावा; परंतु येथिल शेतकरी साधारणपणे यापेक्षा ०.४-०.६ क्विंटल अधिक वापरतात. १९८० ते २०१८ दरम्यान राज्यात खतांच्या वापरामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. याउलट या काळात धानाच्या उत्पादनात केवळ ६८ टक्के तर गव्हाच्या उत्पादनात ८५ टक्के वाढ झाली आहे. याशिवाय भूजल पातळीतही सातत्याने घट होत असल्याने शेतकऱ्यांना पाण्यासाठी ५०० फुटांपर्यंत कूपनलिका खोदावी लागत आहे. हरित क्रांतीने भारताला अन्न उत्पादनात स्वयंपूर्णतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलण्यास मदत केली; परंतु त्याचे कृषी आणि पर्यावरणावर गंभीर दुष्परिणाम झाले. या क्रांतीचा सर्वात मोठा परिणाम पंजाबमध्ये दिसून येत आहे.

पंजाबमध्ये पहिल्यापासूनच भात आणि गव्हाच्या लागवडीला प्राधान्य दिले गेले. या एकतर्फी दृष्टिकोनामुळे शेतकरी या पिकांवर जास्त अवलंबून आहेत, परिणामी कृषी विविधता कमी झाली आहे. याव्यतिरिक्त, रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर धोका आहे. पंजाबमध्ये पूर्वी मका, बाजरी, ज्वारी, कडधान्ये, तेलबिया आणि भाजीपाला तसेच दुग्धजन्य पदार्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होत होते. यामुळे शेतकरी कुटुंबांना स्थिर उत्पन्न आणि संतुलित अन्न उपलब्ध झाले. या बहुआयामी शेतीव्यवस्थेने शेतकऱ्यांना स्वावलंबी ठेवले. त्यामुळे ते बाजारपेठेवर कमी अवलंबून राहिले. १९८० च्या दशकापूर्वी, शेतकरी काडेपेटी, मीठ आणि मसाले यासारख्या छोट्या वस्तू बाजारातून विकत घेत असत, कारण ते त्यांच्या शेतीतून इतर सर्व गरजा भागवत. त्या काळात शेतीमुळे जमिनीची सुपीकता तर राहिलीच; शिवाय शेतकरी कुटुंबांचे आरोग्यही राखले गेले. म्हणूनच जास्त भात आणि गहू पिकवल्याने पंजाबची शेती वाळवंटात बदलत आहे का, असा प्रश्न आता उत्पन्न होत आहे. पंजाबच्या शेतांना वाळवंटात बदलण्यात भात आणि गव्हाच्या अतिशेतीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अधिकृत अहवालांनुसार, जास्त निचरा, जमिनीची गुणवत्ता ढासळणे आणि रासायनिक खतांचा अतिवापर यामुळे येथिल जमिनीची सुपीकता कमी झाली आहे.

पंजाब कृषी विभागाच्या अहवालात हे स्पष्ट करण्यात आले आहे, की हवामानबदल आणि अस्थिर मॉन्सूनमुळे जलसंकट अधिक गडद होत आहे. त्यामुळे शेतजमिनीच्या उत्पादकतेवर परिणाम होत आहे. दीर्घकालीन मोनोक्रॉपिंग पद्धतींमुळे मातीची विविधता नाहीशी झाली असून जलस्रोतांवर दबाव वाढला आहे. या परिस्थितीमुळे योग्य उपाययोजना न केल्यास पंजाबमधील शेतीची जमीन एक दिवस अक्षरशः वाळवंटी भागात बदलू शकते. देशासाठी अन्नधान्य निर्माण करणाऱ्या पंजाबचे वाळवंट होण्यामागे काही कारणे आहेत. एकाच पिकाची (जसे भात आणि गहू) सतत वाढ केल्याने जमिनीतील पोषक तत्वांची विविधता कमी होते. त्यामुळे जमिनीच्या सुपीकतेवर परिणाम होतो. या पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर वाढवला आहे. रासायनिक खतांचा दीर्घकाळ वापर केल्याने जमिनीतील संतुलन बिघडते आणि नैसर्गिक सुपीकता कमी होते. भातशेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. यामुळे भूजल पातळी कमी होते आणि पाण्याचे संकट निर्माण होते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. सतत पीक घेतल्याने मातीची धूप वाढते. त्यामुळे त्याची रचना आणि पोषण कमी होते. पीक विविधतेच्या अभावामुळे कीड आणि रोगांचा दबाव वाढतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक कीटकनाशके वापरण्यास भाग पाडले जाते. त्याचा परिणाम माती आणि पाण्याच्या स्त्रोतांवरही होतो.

वस्तुत: शेतकऱ्यांना धान आणि गव्हाऐवजी डाळी, तेलबिया किंवा फळे आणि भाजीपाला यासारखी इतर पिके घेण्यास प्रवृत्त केल्यास जमिनीची सुपीकता वाढेल आणि फायदेही मिळतील. जमिनीच्या गुणवत्तेनुसार खतांची निवड करून समतोल वापर करण्याबाबत शेतकऱ्यांना जागरूक करणे आवश्यक आहे. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते. पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन तंत्राचा वापर करण्यावर भर दिल्यास भूजल पातळीत सुधारणा होईल. सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेतीचा अवलंब केल्यास जमिनीची सुपीकता राखण्यात मदत होऊ शकते. शेतकऱ्यांना नवीन कृषी तंत्रज्ञान आणि पद्धतींबद्दल शिक्षित करण्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. आकडेवारीनुसार, गेल्या चार दशकांमध्ये (१९८०-२०१८ दरम्यान) एनपीके खतांचा वापर १८० टक्क्यांनी वाढला आहे. त्याच वेळी, १९८० ते २०१८ या काळात केवळ युरियाचा (नायट्रोजन) वापर २०२ टक्क्यांनी वाढला आहे. येथे शेतात खतांचा अतिवापर होणे हे आता गुपित राहिलेला नाही. शेतकरी खतांचा वापर एका रात्रीत कमी करू शकत नाहीत. ही प्रक्रिया वर्षानुवर्षे संथपणे चालत असावी, अन्यथा उत्पादनात मोठी घट होईल. यानंतर कीटकनाशकांचा क्रमांक येतो. उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रानंतर पंजाब हे रासायनिक कीटकनाशकांचा देशातील तिसरा सर्वात मोठा ग्राहक आहे. खतांसोबतच कीटकनाशकांचा वापरही वाढतो.

खतांच्या अतिवापरामुळे वनस्पतीवृद्धी वाढते. म्हणजेच पीक गडद हिरवे होते. त्यामुळे कीटकांचे आक्रमण आणि रोग अधिक आकर्षित होतात. पानातील द्रवपदार्थ हे कीटकांचे अन्न आहे. पान जितके जाड असेल, तितके कीटक आणि कृमींचे अन्न जास्त असते. बर्नाला जिल्ह्यात वसलेले पट्टी खट्टर हे गाव सतलज नदीच्या दक्षिणेस पंजाबच्या माळवा भागात आहे. 'सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्ड'च्या मूल्यांकनानुसार, येथिल बहुतांश ब्लॉक्स 'डार्क' झोनमध्ये येतात. ते भूजलाच्या अति-शोषणाची पातळी दर्शवतात. तांदळामुळे पंजाबचे खूप नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्याचे वाळवंटात रुपांतर होत आहे. पंजाबमध्ये १४ लाख कूपनलिका भातपिकाच्या हंगामात आठ तास चालतात. एक हेक्टर जमिनीवर एक इंच पाणी म्हणजे एक लाख लिटर. पंजाबमध्ये भाताच्या हंगामात किमान ४-५ इंच पाणी साचत राहते. दर वर्षी राज्यातील पाण्याची पातळी ३-५ फुटांनी घसरते. भूजल पातळी कमी होण्याचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय समितीने २०२१ मध्ये भूजल उत्खननाची सध्याची प्रवृत्ती कायम राहिल्यास पुढील २५ वर्षांमध्ये राज्य वाळवंटात बदलेल, असा अंदाज वर्तवला आहे. वाढत्या लोकसंख्येला पोसण्याच्या गरजेने भारतात हरितक्रांतीची सुरुवात झाली आणि त्यासोबतच तांदूळ गहू पीक प्रणाली आली. तिथे एकाच जमिनीवर वारंवार ही पिके घेतली जातात.

१९६० पासून सादर केलेल्या उच्च-उत्पादक वाणांनी भारताला अन्न सुरक्षा प्राप्त करण्यास मदत केली आणि ती राखण्यात मोठी भूमिका बजावली. अनुदानित खतांमुळे याला आणखी चालना मिळाली आणि पंजाब हा देशातील सर्वाधिक लागवडीचा प्रदेश बनला. यामुळे शेतीतील भुस्सा जाळण्याचे प्रमाण वाढले. परिणामी, मातीतील सूक्ष्मजीव क्रियाकलाप बिघडला आणि जमिनीतील मायकोरिझा (एक प्रकारची बुरशी) नष्ट झाली. मातीमध्ये मायकोरिझाईची भूमिका वनस्पतींच्या मुळांना अधिक पोषक द्रव्ये शोषण्यास मदत करते. पंजाब आणि हरियाणामध्ये दर वर्षी ऑक्टोबरचा उत्तरार्ध ते नोव्हेंबरच्या मध्यापर्यंत भाताचे कापणीनंतरचे अवशेष जाळण्याचे प्रमाण व्यापक आहे, कारण शेतकऱ्यांना १०-१५ दिवसांच्या कालावधीत भात कापणी आणि गहू पेरणे आवश्यक असते. मायकोरायझी नायट्रोजनचे अमोनियममध्ये रूपांतर करतात, जे झाडे शोषून घेतात आणि वापरू शकतात. २०२२ मध्ये पंजाब कृषी विद्यापीठाने मातीचाचणी केली तेव्हा जमिनीत पोटॅशचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त असल्याचे आढळले. ही समस्या खूप गंभीर आहे. अशा अनेक समस्यांवर मात करण्याचे आव्हान पंजाबपुढे आहे आणि ते क्लौशल्याने पेलावे लागणार आहे.

◇◇◇

# कसा रंगेल निवडणुकीचा आखाडा?

विश्लेषण

अनिकेत जोशी
ज्येष्ठ पत्रकार

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यामुळे राजकीय घडामोडींना वेग आला आहे. गेल्या पाच वर्षांचा राजकीय काळ अनेक धक्कादायक, अनपेक्षित घटनांनी हादरवून टाकणारा होता. या काळात राज्यात नवी राजकीय समिकरणे बघायला मिळाली. या काळात राज्याने घातकी राजकीय डावही बघितले. आता आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही मोठ्या युतींच्या खेळी बघणे रंजक ठरणारे आहे.

महाराष्ट्रात पंधराव्या विधानसभेसाठी निवडणूक जाहीर झाली. २३ नोव्हेंबर या ऐतिहासिक तारखेला त्याचा निकाल जाहीर होणार आहे. २३ नोव्हेंबर २०१९ रोजी फडणवीस आणि अजित पवार यांच्या सरकारचा शपथविधी झाला होता आणि त्याच दिवसापासून महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळजनक घटनांची मालिका सुरू झाली होती, जी आजपावेतो सुरूच आहे. त्याआधी महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट होती. त्या पहाटे ती उठवली गेली आणि शपथविधी पार पडला. खरे तर या घटनेनेच धक्कातंत्राचा नमुना सेट केला होता आणि ही संपूर्ण विधानसभा तशाच प्रकारे अतिशय खळबळजनक घटनांनी गाजत राहिली. भाजपबरोबर युती करुन निवडणूक लढवणारी शिवसेना निकालानंतर ताबडतोब शरद पवार आणि काँग्रेसबरोबर गेली आणि महाविकास आघाडी स्थापन झाली. त्यावेळी शिवसेनेचे ५६ आमदार होते तर शरद पवारांचे ५४ होते. दोन आमदार जास्त असल्याच्या बळावर उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्रीपद मिळाले. राज्यातील मोठा, अधिक मतदार असणारा पक्ष असूनही काँग्रेसला केवळ ४४ जागा मिळाल्या. भाजपाकडे १०५ आमदार होते. मात्र सगळ्यात मोठा पक्ष असूनही तो विरोधात बसला, हीदेखील क्वचितच बघायला मिळणारी बाब त्यावेळी दिसून आली. पुढे कोरोनामुळे हे सरकार नीट चालू शकले नाही. जवळपास दीड वर्ष त्यातच गेले. त्या काळी विधानसभेचे कोणतेही अधिवेशन आठवड्यापेक्षा अधिक काळ चालले नाही. स्वाभाविकच राजकारणात एक खदखद जाणवत होती. त्यामुळेच कोरोनानंतरच्या काळात झालेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनात म्हणजे मार्च २०२२ मध्ये सरकार गडगडण्यास सुरूवात झालेली दिसली.

या टप्प्यावर सर्वप्रथम अनिल देशमुख यांचे प्रकरण निघाले. उद्धव ठाकरेंचा कार्यकर्ता असणारा एक पोलीस अधिकारी सचिन वाझे यांनी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घराखाली कथित बॉंब ठेवण्याचे धाडस केल्याची घटना गाजली. तिने धक्कादायक वा भूकंप घडवून आणणाऱ्या घटनांच्या मालिकेत भर घातली. पुढे गाडीचा मालक मृतावस्थेत आढळला आणि प्रकरण चिघळले. हा खटला अद्यापही सुरू झालेला नाही. दीड-दोन वर्षांनंतर अनिल देशमुख तुरुंगाबाहेर आले. दरम्यान, नबाब मलिक अडचणीत आल्याचे आपण पाहिले. त्यापाठोपाठ संजय राठोड अडचणीत आले. थोडक्यात, उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळातील बरेच मंत्री अडचणीत येत होते आणि भाजपाला मोठा फायदा मिळत होता. सरकारकडे नसणारी माहिती आधी फडवणीसांकडे येत होती. त्यामुळे सरकार अस्थिर अवस्थेत होते. नंतरच्या राज्यसभेच्या निवडणुकीतही शिवसेनेला मोठा फटका बसला आणि पुढील दहाच दिवसात झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीनंतर सरकार कोसळले. त्यानंतर जूनच्या अखेरीस एकनाथ शिंदेंचे सरकार आले पण ते वैध की अवैध यावर प्रश्नचिन्ह होते. हे प्रकरण सुप्रीम कोर्टात जाऊनही कोणताही निकाल लागलेला नाही. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस फुटली आणि पक्षाचा मोठा घटक अजित पवारांच्या नेतृत्वाखाली बाहेर येऊन महायुती सरकारमध्ये सामील झाला. भाजपाच्या मतदारांना हे पटले नव्हते, रुचले नव्हते; पण सरकार काम करत राहिले.

जून २०२२ नंतरच्या कालखंडात महायुती सरकारने अनेक महत्वाचे निर्णय घेतले. थांबलेली प्रकरणे, अडलेले प्रकल्प मार्गी लागले. असे असले तरी या सरकारला शेतकरीवर्गाची नाराजी दूर करता आली नाही. मराठा समाज आरक्षणाच्या मुद्द्यावरुन आक्रमक झाला. मनोज जरांगेंच्या आंदोलनाने या प्रश्नाला मोठी गती आणि वेगळा आयाम दिला. मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण मिळू शकते, कुणबी असल्यामुळे त्यांना कुणबी दाखले द्या, ही मोठे सामाजिक अभिसरण घडवून आणणारी मागणी त्यांनी केली. या घुसळणीतून अमृत न निघता जातीयवादाचे विष मात्र निघाले. सरकारने हे आंदोलन शांत करण्याचे प्रयत्न केले आणि जरांगेंना मर्यादेपलीकडे जाऊन आश्वासने दिली. ती पूर्ण करणे शक्य नव्हते. पण लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी त्यांना शांत करण्याचा प्रयत्न साध्य केला गेला. २०२४ च्या लोकसभा निकालामध्ये या सगळ्याचा मोठा फटका भाजपा आणि मित्रपक्षांना बसला. या सगळ्या स्फोटक पार्श्वभूमीवर येऊ घातलेली निवडणूकही अतिशय गुंतागुतीची आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. महाराष्ट्राचे दोन मोठे पक्ष फुटले आहेत. आधी शिवसेनेची १६-१७ टक्के आणि राष्ट्रवादीचीही साधारणत: तेवढीच मतांची टक्केवारी होती. शरद पवारांनाही महाराष्ट्रात कधीही ६० पेक्षा जास्त जागा मिळाल्या नाहीत तर शिवसेनेला ७० जागांपुढे जाता आलेले नाही. म्हणजेच १०० पेक्षा जास्त जागा न मिळाल्याने कधीही स्वबळावर त्यांचे सरकार आलेले नाही.



दुसरीकडे भाजपाला दोन वेळा सरकार आणता आले. सलग दोन निवडणुकांमध्ये (२०१४ आणि २०१९) शंभरपेक्षा जास्त जागा मिळवून त्यांनी ही बाब साधली. ऐंशीच्या दशकात काँग्रेस करत असणाऱ्या विक्रमाशी त्यांना बरोबरी साधता आली. भाजपाची स्वत:ची मतेही फार कमी झालेली नाहीत. मात्र शरद पवार, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना या निवडणुकीत मोठा फटका बसणार आहे. लोकसभेला ठाकरे आणि शरद पवारांना एकमेकांची मदत झाली. दोघांकडील पेटून उठलेल्या कार्यकर्त्यांनी चांगला हात दिला. पण तशी मदत विधानसभेला मिळणार नाही, कारण ही लढत २८८ मतदारसंघांमध्ये होत आहे. त्यामुळेच ४८ मतदारसघांमध्ये एकत्र आलेली ताकद विखुरलेली दिसेल. विधानसभा निवडणुकांच्या परिप्रेक्ष्यातून लोकसभेच्या निकालाचे विश्लेषण केले तर काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष दिसतो. त्यानंतर भाजपाची वर्णी आहे. पण शरद पवार आणि ठाकरेंची ती परिस्थिती नाही. त्यामुळेच शिवसेनेच्या दोन्ही गटांचा ५०-६० जागांवरच प्रभाव राहील, असे वाटते. थोडक्यात, हा ठाकरे आणि शिंदे या दोन्ही गटांना फटका आहे. त्याचप्रमाणे अजित पवार आणि शरद पवारांनाही फटका बसेल. हे दोन्ही गट एकमेकांची मते खाऊनच मागे पडण्याची चिन्हे आहेत. मतदारासंघामध्ये प्रथम क्रमांक मिळवणाऱ्यांनी तेथे लढायचे असे गणित वा मांडणी महायुतीमध्ये असल्यामुळे भाजपाला जास्त मतदारसंघ लढता येतील. सहाजिकच तेवढ्या जागा अन्य दोन पक्षांना मिळणार नाहीत.

मतांचे गणित तपासून बघायचे तर लोकसभेला दोन्ही मोठ्या आघाड्यांना मिळालेल्या मतांमध्ये अवघ्या अर्ध्या टक्क्याचा फरक आहे. महायुतीला तेवढीच मते वाढवावी लागतील. लाडकी बहीण योजनेचे सहा हप्ते दिल्यानंतर महिला मतदारांचा झुकता कल हा फरक भरुन काढू शकेल. खेरीज सोयाबीन, तांदूळ, धान आदी पिकांचे राहिलेले पैसेही दिले गेले आहेत. त्याचबरोबर अडकलेल्या मोठ्या योजनाही महायुतीतर्फे मार्गी लावल्या गेल्या आहेत. पुण्यामध्ये मेट्रो जाळे विस्तारणे, मुंबईत मेट्रोच्या ॲक्वा लाईनचा एक टप्पा, कोस्टल रोडचा एक भाग, अटल सेतू सुरु होणे, सामान्यजनांसाठी टोल हटवले जाणे हे याचे उदाहरण म्हणावे लागेल. अगदी आचारसंहिता लागू होण्याच्या काही तास आधी महायुतीने मुंबई महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना बोनस जाहीर केला. थोडक्यात, लोकांच्या हाती पैसे, सेवा पुरवून खुश करण्याचा प्रयत्न महाआघाडीने केला आहे. सात आमदारांची नेमणूक ही आणखी एक महत्त्वपूर्ण घटना म्हणावी लागेल. म्हणजेच मतदारांना आपल्याकडे वळवण्यासाठी राज्यकर्त्यांना आवश्यक असणारी सगळी काळजी त्यांनी घेतली आहे. याचा प्रत्यक्ष फायदा कसा होतो आणि आवश्यक असणारी एक-दोन टक्का अधिक मते ते कसे खेचून आणू शकतात, हे लवकरच बघायला मिळेल.

लाडकी बहीण योजनेमध्ये एकेका विधानसभा मतदारसंघात एक लाखांपेक्षा अधिक महिला समाविष्ट केल्या गेल्या आहेत. त्यातील निम्म्या मतदार महिलांनी पूर्वीचे मतदान बदलून मते फिरवली तरीदेखील मोठा फरक पडेल आणि अडचणीत असणारे मतदारसंघ सूकर होतील असे काही विद्यमान तर काही विरोधी पक्षातील आमदार सांगत आहेत. अर्थात असे असले तरी महायुती सरकारच्या काही निर्णयांमुळे नाराज वर्गाची संख्याही मोठी आहे. मराठा आरक्षण, आदिवासी सवलती, धनगर-धनगड वाद, शेतकऱ्यांची नाराजी यासारख्या प्रश्नांचे खापर सरकारच्या माथी फुटू शकते. या सगळ्याची प्रचिती २३ नोव्हेंबरच्या निकालामधूनच येईल.

**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

◇◇◇

# रात्र थोडी, सोंगे फार!

**निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यामुळे राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात 'कही खुशी, कही गम' असे वातावरण होते. मात्र या चित्राची किनार दिवसागणिक बदलत नेली. जनतेच्या मनाचा थांग लावण्यासाठी राजकीय पक्षांची लगबग वाढू लागली. आता प्रत्यक्ष तारखा जाहीर झाल्यामुळे घोडामैदान जवळ आले असून आपले घोडे दामटवण्यात कोणताही पक्ष मागे राहणार नाही.**

दखल

जनार्दन पाटील

बहुप्रतिक्षित विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यामुळे राज्यातील राजकीय हालचालींना वेग येणार आहे. असेही लोकसभा निवडणुकीनंतर 'कही खुशी, कही गम' असे वातावरण होते. मात्र लगोलग घडणाऱ्या घटनांनी या चित्राची किनार दिवसागणिक बदलत नेली. जनतेच्या मनाचा थांग लावण्याचा प्रयत्न करत आपापले आखाडे मजबूत करण्यासाठी राजकीय पक्षांची लगबग वाढू लागली. आता प्रत्यक्ष तारखा जाहीर झाल्यामुळे घोडामैदान अगदी जवळ असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्वाभाविकच आपलेच घोडे पुढे दामटण्यात कोणीही मागे पडणार नाही. राज्यातील निवडणूक एकाच टप्प्यात होणार असून २० नोव्हेंबर रोजी मतदान तर २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होतील. अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २९ ऑक्टोबर असेल. चार नोव्हेंबर ही अर्ज मागे घेण्याची तारीख असणार आहे. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान पार पडेल तर २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होईल. एकूण २८८ जागांसाठी ९ कोटी ६३ लाख मतदार आपले मत नोंदवतील. त्यात नवमतदारांची संख्या २०.९३ लाख इतकी आहे. पुरूष मतदार ४.९७ कोटी, महिला मतदार ४.६६ कोटी, युवा मतदार १.८५ कोटी, तृतीयपंथी मतदार ५६ हजारांहून अधिक, ८५ वर्षांवरील मतदार १२.४८ लाख, शंभरी ओलांडलेले मतदार ४९ हजारांहून जास्त, दिव्यांग मतदार ६.३२ लाख अशी आकडेवारी असणार आहे. राज्यात एकूण एक लाख १८६ मतदान केंद्रांवर मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. यातील शहरी मतदार केंद्रांची संख्या ४२,६०४ इतकी आहे तर ५७,५८२ ग्रामीण मतदार केंद्र आहेत. एका मतदान केंद्रावर सरासरी ९६० मतदार मतदान करतील.

मतदानाच्या या पूर्ण प्रक्रियेचे व्हिडीओ रेकॉर्डींग होणार आहे. खेरीज ८५ पेक्षा अधिक वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना घरातूनच मतदान करण्याची सुविधा देण्यात येणार आहे. त्यासाठी त्यांना निवडणूक आयोगाचा एक फॉर्म भरावा लागेल. त्याचबरोबर निवडणूक आयोगाच्या वतीने 'सुविधा पोर्टल' नावाने ॲप जारी करण्यात आले आहे. या ॲप्लिकेशनवर मतदारांना तक्रार करता येईल. एखाद्या ठिकाणी काही अनुचित घटना घडली किंवा उशिरापर्यंत मतदान सुरु असेल तर केवळ फोटो काढून या ॲप्लिकेशन्सवर अपलोड केल्यास ९० मिनिटांमध्ये निवडणूक आयोगाची टीम तिथे पोहचेल, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. आता महायुतीमधील भाजप, एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे अजित पवार हे एका बाजूने तर दुसरीकडे काँग्रेस, ठाकरेंची शिवसेना आणि राष्ट्रवादीचे शरद पवार मैदानात उतरण्यास सज्ज आहेत. लोक त्यातील कोणाची निवड करतात आणि सत्तेची माळ कोणाच्या गळ्यात घालतात हे लवकरच कळेल. त्यात, मनसे आणि वंचित बहुजन आघाडीने आघाडी घेत अनुक्रमे सात आणि २१ उमेदवार जाहीर केले आहेत.

महायुतीनेही जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित केला आहे. महायुतीसमोर सत्ता कायम राखण्याचे आव्हान आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला मतदारांनी जोरदार दणका दिला. 'मिशन ४५' हाती घेत निवडणूक लढवणाऱ्या महायुतीला केवळ १७ जागांवर यश मिळाले, तर महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या. लोकसभेला पिछेहाट झाल्यानंतर महायुती सरकारने लोकानुनयी घोषणांचा अक्षरश: धडाका लावला. गेल्या आठवडाभरात जवळपास १४०० शासन निर्णय घेण्यात आले. घोषणांचा पाऊस पाडणाऱ्या महायुतीने विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप जवळपास निश्चित केले आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप १५८ जागांवर निवडणूक लढवेल. युवा स्वाभिमानी पक्ष तसेच राष्ट्रीय समाज पक्षाला भाजप आपल्या कोट्यातून जागा देईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ७० जागा देण्यात येणार आहेत तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ५० जागा सोडण्यात येणार आहेत. लोकसभेला भाजपने ४८ पैकी २८ जागा लढवल्या होत्या. आता विधानसभा निवडणुकीतही भाजप सर्वाधिक जागा लढवणार आहे.

लोकसभेला भाजपने सर्वाधिक जागा लढवल्या होत्या. त्यानंतर शिंदे सेनेला १५ आणि अजित पवारांना पाच जागा देण्यात आल्या होत्या. आताही शिंदेसेनेला अजित पवार गटापेक्षा अधिक जागा मिळणार आहेत. अजित पवार गट ६५ ते ७० जागांसाठी तर शिंदे गट ९० ते १०० जागा लढवण्यासाठी उत्सुक होता; पण दोन्ही मित्रपक्षांना अपेक्षेइतक्या जागा मिळणार नाहीत. २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाने २६० जागांवर उमेदवार दिले होते. त्यातील १२२ जागा भाजपने जिंकल्या होत्या. २०१९ मध्ये भाजपने १६४ जागा लढवत १०५ जागांवर बाजी मारली. सलग दोन निवडणुकांमध्ये भाजपने शंभरचा टप्पा ओलांडला. सलग दोनदा राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरण्याची किमया भाजपने करून दाखवली. भाजपने राज्यात पहिल्यांदाच अशी कामगिरी केली. आता त्याच कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचे आव्हान भाजपसमोर आहे. या वेळी कमी जागा लढवणाऱ्या भाजपपुढे शंभरी गाठण्याचे आव्हान आहे. विशेषतः शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसपुढेही आहे त्या जागा टिकवण्याचे आव्हान आहे.

मागील लोकसभा निवडणुकीमध्ये केवळ एक जागा जिंकणारी काँग्रेस १३ जागांवर पोहोचल्याने पक्ष कार्यकर्त्यांचा, नेत्यांचा उत्साह चांगलाच वाढला. प्रमुख नेत्यांनी पुढील मुख्यमंत्री काँग्रेसचाच, असे म्हणत दावा करण्यास सुरुवात केली; पण हरियाणामध्ये काँग्रेसला दणका बसला. सगळी सर्वेक्षणे पक्षाच्या बाजूने असूनही भाजपने सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली. त्यानंतर काँग्रेस काहीशी बॅकफूटवर गेली आहे. जागावाटपावरून वाद टाळा, मुख्यमंत्रिपदावर बोलू नका, अशा सूचना दिल्लीतील नेतृत्त्वाकडून राज्यातील नेत्यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता काँग्रेस नेत्यांनी जुळवून घेण्याची भाषा सुरू केली आहे. महायुती सरकारने आणलेल्या लोकानुनयाच्या योजना, दलित आणि आदिवासी पुन्हा भाजपकडे जाण्याची शक्यता, मराठा आरक्षणाच्या मुद्यावर मनोज जरांगे यांनी महायुतीचे उमेदवार पाडण्याचा दिलेला इशारा आणि त्याविरोधात जरांगे यांच्या पाठिशी असणाऱ्या पक्षाविरोधात भूमिका घेण्याचा ओबीसी संघटनेचा पवित्रा, धनगर आरक्षणाचा न सुटलेला प्रश्न तसेच आदिवासी समाजामध्ये आरक्षणात वाटेकरी येण्याची असलेली भीती अशा मुद्द्यांवर निवडणूक रंगणार आहे. शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची ऐन निवडणुकीच्या काळात झालेली अँजियोप्लास्टी, त्यामुळे त्यांना प्रचारात येणाऱ्या मर्यादा हे महाविकास आघाडीपुढील मोठे आव्हान असेल.



गेल्या दोन वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात अनेक राजकीय भूकंप झाले. सर्वात आधी शिवसेनेतील अंतर्गत बंडाळी, त्यानंतर सत्तेत असलेले महाविकास आघाडी सरकार कोसळणे, शिंदे यांनी भाजपच्या साथीने महायुती सरकार स्थापन करून स्वतः मुख्यमंत्रिपदी विराजमान होणे, त्यानंतर अजित पवार यांच्या बंडानंतरची राष्ट्रवादीतील फूट तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अनुक्रमे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर ठोकलेला दावा या सर्व घडामोडी राज्याच्या राजकारणाला हादरे देणाऱ्या ठरल्या. त्यामुळे मतदारराजा या वेळी राज्याचे सिंहासन कुणाच्या हवाली करणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये पिपाणी चिन्हावर बंदी नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्ये पिपाणीचा पुन्हा तुतारीला फटका बसण्याची शक्यता आहे. तुतारी हे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे चिन्ह आहे; मात्र लोकसभा निवडणुकीत पिपाणीमुळे तुतारीला फटका बसल्याची तक्रार शरद पवार गटाने केली होती. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने दहा जागा लढवल्या. तेव्हा चार लाखांहून अधिक मतदान पिपाणीला पडले होते. विशेषतः सातारा मतदारसंघात पिपाणी या चिन्हामुळे त्यांच्या उमेदवाराला पराभवाचेही तोंड पहावे लागले होते. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेऊन शरद पवार गटाने पिपाणी चिन्ह गोठवण्यासाठी निवडणूक आयोगाकडे धाव घेतली होती; मात्र निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीत पिपाणी हे चिन्ह कायम ठेवले. तुतारी वाजवणारा माणूस लहान आणि अस्पष्ट दिसतो. त्याचा आकार वाढवण्यात यावा, ही मागणी मात्र आयोगाने मान्य केली. महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही वर्षांमध्ये घडले, ते अनेक दशकांपासून घडले नव्हते. महाराष्ट्राला एक चांगली राजकीय संस्कृती आहे, असे सुरूवातीपासून मानले जात आहे. असे असले, तरी या संस्कृतीला आता खरेच गालबोट लागले आहे का, राजकारणात घडलेल्या घडामोडींवर लोकांचा रोष आहे का हे आता निवडणुकीतून समोर येणार आहे. निवडणुकीच्या प्रचारात महायुती सरकारच्या प्रचारात विकासकामे, लाडकी बहीण योजनांसारख्या विविध मोठ्या घोषणा केंद्रस्थानी राहतील, तर महाविकास आघाडीच्या प्रचारात पक्षफोडीचा तसेच सर्वधर्मसमभावाचा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो.

◇◇◇

# अभिजात मराठी आता आधुनिकही व्हावी!

अभिजात दर्जामुळे मराठी समोरच्या खऱ्या समस्या सुटणार नाहीत. त्यासाठी मराठी ही आता आधुनिक आणि ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, रोजगार, विकास, संधींची भाषा झाली पाहिजे. मराठीच्या अभिजात दर्जासाठी झटलेल्या तमाम बांधवांना आता तिला आधुनिक आणि ज्ञानभाषा बनवण्यासाठी पुन्हा कंबर कसावी लागेल.

केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरूवारी मराठी भाषेला अभिजात दर्जा बहाल करण्याचा ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय घेतला. हा दर्जा लाभावा यासाठी मराठी भाषिक समाजाच्या, संस्थांच्या वतीने, मराठीच्या व्यापक हितासाठी चळवळ आणि महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी म्हणून आम्ही गेली दहा वर्षे प्रयत्न करत होतो, निवेदने देत होतो, राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात त्याबद्दल अभिवचने मागत होतो, ती न देणाऱ्यांना मतदान करू नये हेही सांगत होतो.

विविध राजकीय पक्षांच्या पातळीवर केंद्र आणि राज्य सरकारांची इच्छाशक्ती जागवण्यासाठी प्रयत्न करत होतो. अशा साऱ्यांच्याच प्रयत्नांना शेवटी यश आले. त्याबद्दल आम्ही केंद्र सरकारचे आणि या सगळ्याच प्रयत्न करणाऱ्यांचेही आभार मानत अभिनंदन केले. महाराष्ट्रात, मराठी भाषिक समाजाच्या संदर्भात असे प्रथमच घडले. त्याचे कारण मराठी भाषेच्या संबंधाने चाललेल्या कार्याच्या, मागण्यांच्या, आंदोलनांच्या, पाठपुराव्याच्या ज्या बातम्या, त्याबाबतचे लेख प्रसिद्ध करीत यासाठीच्या मोहिमा वृत्तपत्रे आणि माध्यमांनी मोठ्या प्रमाणात पुढे नेल्या. त्यातून मराठी भाषिक समाजाची सजगता वाढली. त्या अर्थाने हे यश मराठी भाषेच्या चळवळीचेही आहे.

अभिजात दर्जा मिळण्यापर्यंतचा संघर्ष वेगळा होता. पण पुढे काय? याचा विचार आता करण्याची गरज आहे. त्यासाठी अभिजात दर्जा लाभण्याचे जे सर्व व्यावहारिक लाभ केंद्र सरकारच्या शासन निर्णयात कागदावर लिहून ठेवले गेले आहेत, ते प्रत्यक्षात मिळावे यासाठी प्रयत्न सुरू ठेवावे लागतील.

मराठीला हा दर्जा लाभण्याचा अर्थ महाराष्ट्री प्राकृतलाही तो लाभणे असा आहे. म्हणूनच मराठीसोबत पाली आणि प्राकृतलाही तो दिला गेला. सोबत बंगाली आणि आसामी या भाषाही आहेतच. मराठीसह या भारतीय भाषांचीही अभिजात प्रतिष्ठा मान्य केली गेली, ही भारतीय भाषिक इतिहासातील महत्त्वाची घटना आहे.

### दूरगामी, लोकानुवर्ती परिणाम

भाषेचा अभिजात दर्जा म्हणजे काय, तर त्या भाषेचे प्राचीनत्व आणि श्रेष्ठत्व याला मिळणारी भारत सरकारची मान्यता. त्याचा अर्थ फक्त अभिजनांची मराठी असा होत नाही. उलट हा दर्जा मुळात महाराष्ट्री प्राकृतला, एका अर्थाने प्राकृत भाषेला म्हणजेच बहुजनांच्या मराठी भाषेला मिळालेला दर्जा आहे.

ही भारतीय भाषांपैकी विशिष्ट भाषेच्या आणि त्या निमित्ताने विशिष्ट वंश श्रेष्ठत्वाच्या, वर्चस्वाच्या भावनेला आणि त्यावर आधारित प्रचलित राजकारणालाही शह देणारी महत्त्वाची घटना ठरणार आहे. कारण महाराष्ट्री प्राकृत, पाली, प्राकृत या श्रमण संस्कृतीच्या भाषा आहेत. त्या संस्कृतीतील धर्म, तत्त्वज्ञाने, दर्शने, संचित, विचार यांच्या भाषा आहेत. त्या साऱ्याला आपल्या देशात प्रथमच अधिकृतरित्या अभिजात भाषांचा दर्जा आणि प्रतिष्ठा दिली गेली आहे. त्याचे देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक इतिहासासंदर्भात दूरगामी, लोकानुवर्ती असे इष्ट परिणाम होणार आहेत.

### दर्जामुळे काय लाभ होतील?

या अभिजात दर्जामुळे मराठी भाषेच्या (साहित्याच्या नव्हे) विकासासाठी दरवर्षी ५०० कोटी रुपये केंद्राचे अनुदान मिळेल, जे मराठीच्या जतन, संवर्धनासाठी अतिशय उपयुक्त ठरेल. त्याशिवाय, देशभरातील सुमारे ४० विद्यापीठांतून मराठी भाषेचे अध्ययन - अध्यापन केले जाईल. तिथे मराठीविषयक संबंधित रोजगार संधीत मोठी वाढ होऊ शकते.



डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

अभिजात भाषाविषयक म्हणजे मराठीच्या सखोल अध्ययनाचे केंद्र स्थापन केले जाईल. त्यायोगे मराठी भाषेतून संशोधक, अध्यापकांची पदे निर्माण होतील. अभिजात दर्जा ज्या भाषांना दिला जातो, त्यातील दोन व्यासंगी ख्यातनाम अभ्यासकांना दरवर्षी आंतरराष्ट्रीय महत्त्वाचा पुरस्कार मिळत राहील.

### वैश्विक अधिष्ठान मिळेल

या सर्व गोष्टींमुळे मराठीकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधले जाईल. त्याचे आणखी कितीतरी अतिरिक्त लाभ मराठीला होऊ शकतात. महाराष्ट्रात अमराठी भाषिकांची आणि विदेशातील लोकांची रूची वाढली तर विविध प्रकारच्या उद्योजकतेच्या विस्तारासाठी संधीही वाढतील. असे अकल्पित आणि अनुषंगिक लाभही बरेच आहेत.

मराठी भाषेचे शिक्षण, अध्ययन, संशोधनात रूची वाढली तर मराठी अध्यापनातील रोजगारांमध्ये वाढ, पाठ्यपुस्तकांची निर्मिती, ग्रंथनिर्मिती अशा अनेक परस्परावलंबी बाबींचा लाभ संभवतो. मराठी भाषेत रूची वाढली तर मराठी नियतकालिके, वृत्तपत्रे, ग्रंथ, पुस्तके या व्यवहारातही वाढ होऊ शकते. आंतरराष्ट्रीय समुदायाचे मराठीकडे लक्ष वेधले गेल्याने मराठीतून इतर भाषांतील अनुवादाच्या संधीही वाढतील. एका अर्थाने मराठीला वैश्विक अधिष्ठान मिळणे शक्य होईल.

### लाभांसाठी लढावे लागेल

आता हे सगळे प्रत्यक्षात आणि आपोआप होणार आहे का? तर त्याचे उत्तर नाही असे आहे. कारण या अगोदर ज्या सहा भाषांना हा दर्जा लाभला, त्यांच्या संदर्भातही अद्याप यातले फारसे काहीच घडलेले नाही. त्यामुळे उत्सवी मराठी स्वभावाप्रमाणे केवळ गुढ्या - तोरणे उभारून, रोषणाई करून, फटाके फोडून आणि कोणामुळे हा दर्जा मिळाला याच्या श्रेयाचे बँड वाजवून आनंद व्यक्त केल्याने पुढे काही घडणार नाही.

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण आणि मराठी भाषा धोरणासारखा हा दर्जाही नुसता कागदावरच अडून राहणार नाही, याची कोणतीही खात्री पुर्वानुभवामुळे देता येत नाही. त्यामुळे अभिजात दर्जा मिळण्याचे प्रत्यक्षातील सारे वर्णित लाभ मराठीला मिळतील, यासाठीचा लढा सुरू ठेवावा लागेल.

केंद्राने अभिजात दर्जा लाभलेल्या भाषांपैकी केवळ २८ हजार लोकांची भाषा असलेल्या संस्कृतला २६२ कोटी रुपये दिले, तर उर्वरित अभिजात भाषांना मिळून, त्यांना दर्जा मिळाल्यापासून केवळ ६४ कोटी दिले गेले आहेत. मल्याळीला तर एकही रुपया मिळाला नाही, ही वस्तुस्थितीही या उत्सवी उत्साहात नजरेआड होऊ नये.

अभिजात दर्जा मिळाल्याने मराठी समोरच्या खऱ्या समस्या सुटणार नाहीत, हे लक्षात घ्यायला हवे. मराठी केवळ अभिजातच नव्हे, तर आधुनिक आणि ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, रोजगार, विकास, संधीची भाषा झाली पाहिजे. हे होण्यासाठी बंद पडलेल्या मराठी माध्यमाच्या शाळा सुरू कराव्या लागतील. नव्या मराठी शाळांना परवानगी द्याव्या लागतील. मराठी जगाची भाषा होण्यासाठी आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठ स्थापन करावे लागेल.

खालच्या स्तरापर्यंत मराठीचे जतन, संवर्धन होण्यासाठी धोरणे आखली गेली पाहिजेत. या आणि अशा बहुतांश बाबी केंद्र सरकारच्या नव्हे, तर राज्य सरकारच्या कक्षेतील आहेत. त्यामुळे इंग्रजीचा अवास्तव, अनाठायी आग्रह धरत तिचे जतन, संवर्धन करण्याऐवजी सरकारने आता मराठीला सर्वार्थाने बळ देण्याची आवश्यकता आहे. मराठीच्या अभिजात दर्जासाठी झटलेल्या तमाम बांधवांना आता तिला आधुनिक आणि ज्ञानभाषा बनवण्यासाठी पुन्हा कंबर कसावी लागेल.

●●●●●●●●●

# हरियाणाने का चकित केले?

जम्मू-काश्मीर आणि हरियाणाचे निवडणूक निकाल बरेच काही सांगत आहेत. काश्मीरमध्ये काय झाले असे विचारले तर? उत्तर स्पष्ट आहे, जम्मू वगळता काश्मीर खोऱ्याने भाजपचा 370 चा मुद्दा पूर्णपणे नाकारला आहे.

असे म्हणता येईल की काश्मीर खोऱ्यातील लोक कलम 370 हटवण्याच्या बाजूने नाहीत. यावेळी तेथील नॅशनल कॉन्फरन्सला लोकांनी उघड पाठिंबा दिला आहे. गेल्या वेळी सर्वात मोठा पक्ष असलेला पीडीपी दोन-तीन जागांवर मर्यादित होता.

बरं, यावेळी काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सच्या बाजूने जाईल हे काही प्रमाणात दिसत होतं, पण हरियाणाचा निकाल सर्वात धक्कादायक होता. इथे काँग्रेस जास्त मेहनत न करता लाडू खाण्याचा प्रयत्न करत होती. कदाचित त्यांच्या अतिआत्मविश्वासाने त्यांना बुडवले असावे.

वास्तविक, केंद्रीय नेतृत्वाने वेळेत कोणताही निर्णय घेतला नाही. माजी मुख्यमंत्री भूपेंद्र हुड्डा यांनाही त्यांच्या मर्जीनुसार तिकिटे मिळत होती. कुमारी शैलजा स्वतः निवडणूक लढवण्याच्या आशेवर होत्या आणि तेव्हाही त्या रागावून काही दिवस घरी बसल्या होत्या.

निकालानंतर असा अंदाज लावला जाऊ शकतो की जाट नेत्यांकडे जास्त कल असल्यामुळे बाकीच्या जाती काँग्रेसपासून जवळजवळ दूर झाल्या आहेत. हरियाणातील 36 बिगर जाट समुदाय अतिशय महत्त्वाचे आहेत. काँग्रेसला त्यांचा विचार करायचा नव्हता. हीच त्यांच्यासाठी सर्वात मोठी समस्या होती.

मात्र, सकाळी अकरा वाजेपर्यंत हरियाणाचे निकाल असे होते की, काँग्रेसला पासष्ट ते सत्तर जागा मिळतील, असा अंदाज होता, मात्र काँग्रेसचा हा आनंद काही तासांतच विरून गेला. निर्णय किंवा अंदाज अचानक उलटले आणि ते भाजपच्या बाजूने गेले. कसे? कोणालाच माहीत नाही.

जवान, पहलवान और किसान या मुद्द्याचे काय? झाले? हे मुद्दे फक्त हवेत होते आणि त्याचा जमिनीवर काहीही परिणाम झाला नाही का? निकालावरून असेच दिसून येत आहे. मात्र, हरियाणात काँग्रेसला 55 ते 60 जागा देणाऱ्या सर्व एक्झिट पोलचे काय झाले? एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, भाजप येथे कोणत्याही लढतीत दूर नव्हता. मग हे काय आणि कसे घडले? गेल्या लोकसभा निवडणुकीतही एक्झिट पोलची हीच स्थिती होती.

तेव्हा सर्व एक्झिट पोलने भाजपला चारशे किंवा त्याहून अधिक जागा मिळतील असे भाकीत केले होते, पण त्यावेळी भाजपला अडीचशे जागाही गाठता आल्या नाहीत. आता हरियाणातही असेच झाले आहे. शेवटी, या एक्झिट पोलमध्ये काय अंतर उरले आहे? सोशल मीडियाच्या वादळात ते वाहून गेले आहेत का? किंवा कुठल्यातरी दबावाखाली ते काही पक्षांना मनमानीपणे जागा देत राहतात. गेल्या वेळी दबावाखाली भाजपला जास्त जागा देणारे एक्झिट पोल यावेळी हरियाणात काँग्रेसला विजयी करून समतोल साधण्याचा प्रयत्न करत असल्याचे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळेच अंदाज चुकला.

वास्तविकता जाणून न घेता अंदाज बांधण्याचे असे परिणाम आहेत. असे म्हणता येईल की कोणीतरी हे एक्झिट पोल थांबवण्याचा प्रयत्न केला पण आता लोक त्यांच्यावर विश्वास ठेवणे नक्कीच थांबवतील. वास्तविक परिणाम हेच अंतिम सत्य आहे यावर बहुतेक लोक विश्वास ठेवू लागतील. एक्झिट पोलचे अंदाज अचूक किंवा सत्याच्या जवळ नाहीत.

●●●●●●●●●

# आपल्या लोकप्रतिनिधींचे प्रगतीपुस्तक कुठे मिळेल?

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या काही दिवसांपूर्वी राज्यभरातील लोक आपली कामे मार्गी लागण्यासाठी मंत्रालयात आणि विविध शासकीय कार्यालयांमध्ये हजारोंच्या संख्येने गर्दी करू लागले होते. ऑक्टोबर हिटमुळे घामाच्या धारा वाहत असतानाही मंत्रालयाच्या दारावर लागणाऱ्या रांगेने उच्चांक केला केल्याचे दिसून आले. सत्ताधारी असो की विरोधक; सर्वसामान्यांना कुणीही उत्तरदायी राहिले नसल्याची भावना या रांगेतील काही जणांकडून व्यक्त होत होती. अशा स्थितीमुळे लोकप्रतिनिधींना मतदारांप्रति उत्तरदायी कसे बनवायचे, हा एक जटिल आणि संशोधनाचा विषय बनला आहे.

---

या मागील सर्वात मोठे कारण म्हणजे, जी जनता लोकप्रतिनिधींना निवडून देते, तिला त्यांचे उत्तरदायित्व कसे जोखायचे, हेच माहीत नसते. हॉटेल, रुग्णालय असो वा सनदी लेखापाल, वकिलांसारख्या सेवा; जिथे विशिष्ट शुल्क आकारले जाते, तिथे ती सेवा समाधानकारक, उपयुक्त होती की नाही, हे ठरवण्याची काही मापके तरी असतात.

पण, लोकप्रतिनिधीचे काम वा त्याने केलेल्या सेवेचे मूल्यांकन करण्याची बहुतांश मापके भावनिक असतात. मात्र, ती बाजूला सारून आपल्या लोकप्रतिनिधीच्या कामांचे वर्षातून एकदा आणि पाच वर्षानंतर त्याचा कार्यकाळ संपताना वस्तुनिष्ठ मूल्यांकन केले पाहिजे. प्रत्येक तालुक्याने गावात अशी एक अराजकीय समिती बनवायला हवी, जी कोणाचीही बाजू न घेता लोकप्रतिनिधींचे प्रगतीपुस्तक गावाला सादर करेल.

ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंत कुठल्या कक्षेत निवडून जाणाऱ्या लोकप्रतिनिधीची नेमकी जबाबदारी काय आहे, हे आधी त्या लोकप्रतिनिधींना आणि मग मतदारांनाही समजावून सांगितले गेले पाहिजे.

लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधान परिषद या मुख्य चार सभागृहांचे कामकाज व त्यात आपल्या लोकप्रतिनिधींचा असलेला सहभाग, तो कुठले प्रश्न मांडतो आहे, कुठले नाही, हे एक महत्त्वाचे मापक आहे.



डॉ. अमोल अन्नदाते

अमुक एक प्रश्न सभागृहात मांडला गेला पाहिजे, असा आग्रह आपण आपल्या आमदार, खासदार किंवा विरोधी पक्ष नेत्यांकडे कधी धरतो का? सभागृहांचे कामकाज या विषयावर संपर्क या संस्थेने अभ्यास करून सविस्तर माहिती उपलब्ध करून दिली आहे.

विधानसभेच्या पाच वर्षांत एकूण १२ अधिवेशने झाली. कोरोना काळामुळे तीन अधिवेशने होऊ शकली नाहीत. विधानसभेत या पाच वर्षांत केवळ १३१ दिवसांचे कामकाज झाले. साधारण असे संकेत आहेत की, एका वर्षात किमान १०० दिवस तरी सभागृहाचे कामकाज चालले पाहिजे. म्हणजे एका वर्षात जेवढे कामकाज व्हायला पाहिजे तेवढे आपल्याकडे पाच वर्षांत झाले आहे.

दुसरीकडे, विधिमंडळ समित्यांचे कामच या पाच वर्षात झाले नाही, हेही चिंताजनक आहे. या समित्यांच्या बैठका म्हणजे वर्षभर चालणाऱ्या सर्वपक्षीय आमदारांचे गट असतात, जे एकत्रित अभ्यास करून सरकारला राज्याचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी सल्ला देतात. पण, इतक्या महत्त्वाच्या कामाचे उत्तरदायित्व स्वीकारायला कुणी तयार नाही.

सभागृहात विचारलेल्या प्रश्नांचे स्वरूप बघितले, तर बालके, आरोग्य अशा कळीच्या मुद्द्यांवर विचारलेल्या प्रश्नांचे प्रमाण ५ ते ७ टक्के एवढे कमी आहे. बऱ्याच प्रश्नांची भाषा बघितली की, लक्षात येते ते विशिष्ट हेतू ठेवून, काही मिटवण्यासाठी विचारले गेले आहेत. विधिमंडळात विचारले जाणारे प्रश्न आणि त्यातील छुपे हितसंबंध हा तर आणखी वेगळा विषय आहे.

सामान्यपणे विरोधी पक्षांकडून जास्त प्रश्न विचारले जाणे अपेक्षित असताना त्यांच्याकडून तुलनेने कमी प्रश्न उपस्थित केले गेल्याचे दिसते आणि ही अधिक गंभीर बाब आहे. समाज मंदिरे उभारणे, विजेच्या दिव्यांचे खांब उभारणे आणि गावात पेव्हर ब्लॉक बसवणे एवढेच आमदारांचे काम नाही, हेच मतदार म्हणून आपल्याला माहीत नाही. म्हणून राज्यातील २८८ मतदारसंघांशी संबंधित प्रश्नांसाठी पाच वर्षांत विधिमंडळाचे केवळ १३१ दिवस दिले जातात आणि त्यातूनही असंख्य प्रश्न निकाली निघत नाहीत. या स्थितीची आपल्याला मतदार आणि सामान्य नागरिक म्हणून चिंता वाटायला हवी.

आमदार आणि खासदारांना दर वर्षी मतदारसंघाच्या विकासासाठी काही कोटींचा निधी दिला जातो. पण, हा निधी विकासकामांपेक्षा आपल्या कार्यकर्त्यांचे आर्थिक पुनर्वसन करण्यासाठीच वापरला जातो, हे ओपन सिक्रेट आहे. कित्येक राज्यसभा खासदारांचा निधी तर वापरलाही जात नाही. लोकशाहीचे बलस्थान म्हणून एकीकडे आपण माहिती अधिकाराच्या गप्पा आपण मारत असतो, पण आमदार-खासदारांचा निधी कसा खर्च झाला? कोणामार्फत खर्च झाला? खर्च झाला नसेल, तर का नाही झाला? याची कुठलीही माहिती उपलब्ध नसते.

हजारो कोटींचा निधी दिल्याच्या जाहिराती होतात, होर्डिंग लावले जातात, पण प्रत्यक्षात काम काहीच दिसत नाही आणि आपल्या करामधून गोळा झालेला हा निधी गेला कुठे, हे मतदारांनाही कळत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधीं जनतेप्रति किती उत्तरदायी राहिले? त्यांच्या कामांमुळे आपला तालुका, जिल्हा आणि राज्याने किती विकास केला? या गोष्टींचे मूल्यमापन त्यांचे प्रगतिपुस्तक पाहून नागरिकांनी केले पाहिजे.

●●●●●●●●●

# इस्रायल - इराण संघर्षाने रोखला जगाचा श्वास...

युद्धामुळे होणारे मृत्यू, अन्नधान्याची टंचाई, भडकलेली महागाई, विस्थापितांचे जीवन आणि धोक्यात आलेले शारीरिक-मानसिक आरोग्य अशा गंभीर समस्यांमध्ये मध्यपूर्वेतील देश अडकले आहेत. अशात इस्रायल-इराणमध्ये युद्ध सुरू झाले, तर ते जागतिक समुदायाचे मोठे अपयश असेल. या स्थितीत भारतासारख्या उगवत्या महासत्तेने जागतिक शांतता आणि मानव समुदायाच्या हितासाठी ठाम भूमिका घेतली पाहिजे.

---

या युद्धाची व्याप्ती इस्रायल विरुद्ध हमास एवढीच न राहता ती हिजबुल्लाह आणि इराणपर्यंत वाढत गेली. सध्या तर लेबेनॉन, येमेन आणि इराण या तीन आघाड्यांवर इस्रायल लढत आहे.

इराणने मध्यपूर्वेत पोसलेल्या सशस्त्र संघटना इस्रायलला वाकुल्या दाखवतात आणि इस्रायल अरबांवर आपली शस्त्रे उगारतो. इस्रायलच्या या अतिमहत्त्वाकांक्षी आणि युद्धखोर कारवायांमागे अमेरिका आहेच. कारण आपला महासत्तेचा आब कायम राखण्यासाठी अमेरिका सातत्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे युद्धात सक्रिय राहते.

जस्टिफियेबल इंटरव्हेन्शन अर्थात ह्यायाय्य हस्तक्षेप हे अमेरिकी नेतृत्वाचे आवडते धोरण बनले आहे. जगात दहशतवाद असेल, तर तो दहशतीनेच संपवायचा हे जनुकही अमेरिकी परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र बनले आहे. त्यामुळेच जग पुन्हा महायुद्ध आणि महाविनाशाच्या खाईत ढकलले जाण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर, भारताला मात्र दीर्घकालीन हिताचा विचार करुन, हे युद्ध थांबवण्यासाठी आपल्या राजनयिक कौशल्यांचा उपयोग करावा लागेल.

### वादाचा पूर्वेतिहास

संयुक्त राष्ट्रांनी १९४७ मध्ये पॅलेस्टाइनच्या जमिनीचे विभाजन करून स्वतंत्र ज्यू आणि अरब राष्ट्रे निर्माण करण्याच्या बाजूने मतदान करुन जेरुसलेम हे आंतरराष्ट्रीय शहर असेल, असा ठराव आणला. छळ छावण्यांतून जीव वाचवण्यासाठी धावपळ करणाऱ्या ज्यूंसाठी एक हक्काची मायभूमी तयार करण्याचा या ठरावामागचा उद्देश होता. तर, पॅलेस्टिनींच्या दृष्टीने हे विभाजन त्यांच्या हक्कावरचे अतिक्रमण होते.

या ठरावाला ज्यूंनी मान्यता दिली; पण अरबांनी मात्र नकार दिल्यामुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. १९४८ मध्ये ज्यू नेत्यांनी इस्रायल या देशाच्या निर्मितीची घोषणा केली. परिणामी त्याच्या दुसऱ्याच दिवशी पाच अरब देशांनी इस्रायलवर हल्ला केला. तेव्हापासून अरब-इस्रायल संघर्ष हा जगातील कायम धगधगणारा विषय बनला आहे.

### ऑपरेशन अल-अक्सा:

पॅलेस्टिनी कट्टरवादी आणि इराण पुरस्कृत संघटना ह्यहमासह्णने ७ ऑक्टोबर २०२३ ला इस्रायलवर हल्ला केला. हमासच्या दृष्टीने हा हल्ला म्हणजे एक मोहीम असून, तिला या संघटनेने ऑपरेशन अल-अक्सा असे नाव दिले होते. अल-अक्सा हे त्या पवित्र स्थानाचे नाव आहे, जे ज्यू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मांच्या अनुयायांसाठी वर्षानुवर्षे चाललेल्या संघर्षाच्या मुख्य कारणापैकी एक आहे.



डॉ. सुखदेव उंदरे

### पेजर्स, वॉकी-टॉकीद्वारे स्फोट :

इस्रायलने या वर्षीच्या १७ सप्टेंबरला लेबनॉनमध्ये अनेक पेजर्स आणि वॉकी-टॉकींमध्ये घडवून आणलेल्या स्फोटांमध्ये जवळपास ३९ लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते.

या हल्ल्यानंतर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात हिजबुल्लाहचा नेता हसन नसरल्लाचा मृत्यू झाला. अजूनही इस्रायलचे लेबनॉनवर हल्ले सुरू आहेत. आता तर हिजबुल्लाहच्या बालेकिल्ल्यावर हल्ला करण्यासाठी त्याने लेबनॉनच्या आत जमिनवरील कारवाईला सुरूवात केली आहे. इस्रायलच्या हल्ल्यांमुळे एक हजारहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर १० लाखांहून जास्त लोकांना आपली घरे सोडावी लागली आहेत.

### इराणचा थेट इस्रायलवर हल्ला :

हिजबुल्लाह विरोधातील आपले मैदानी आक्रमण लिमिटेड, लोकलाईज्ड् आणि टार्गेटेड असल्याचे इस्रायलने स्पष्ट केले होते. जुलैमध्ये हमासचा म्होरक्या इस्माइल हानिये आणि सप्टेंबरमध्ये हिजबुल्लाहचा नेता हसन नसरल्लाह या दोन प्रमुख नेत्यांचा इस्रायलच्या हल्ल्यात मृत्यू झाला.

या घटना हमास, इराण समर्थित हिजबुल्लाहसह इराणसाठी मोठा धक्का होत्या. त्यामुळे इराणने या हल्ल्यांचा बदला घेण्यासाठी इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला केला. त्यामुळे आता इस्रायल काय करणार, या विचारानेच जगाचा श्वास रोखला गेला आहे.

### विनाशाच्या उंबरठ्यावर?

इस्रायल-इराण संघर्ष आता अशा वळणावर येऊन ठेपला आहे की, हे युद्ध तत्काळ थांबवलं गेलं नाही, तर यामध्ये अण्वस्त्र वापराचा धोका टाळता येणे कठीण होईल. आणि असे झाले तर या युद्धाची किंमत मध्यपूर्व आशियाबरोबरच साऱ्या जगाला मोजावी लागेल.

इराण-इस्रायल युद्ध झालेच, तर कोणाची सरशी होऊ शकते, हे त्या देशांकडे असलेल्या शक्ती घटकांच्या तुलनेवरून समजू शकते. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर स्ट्रॅटजिक स्टडीज (आयआयएसएस) आणि स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट यांनी केलेल्या अभ्यासावरून विश्वासार्ह आकडेवारी समोर येते.

इस्रायलची लोकसंख्या ९८ लाख, तर इराणची लोकसंख्या जवळपास ९ कोटी आहे. पण, ह्यजीडीपीह्णच्या बाबतीत इराणपेक्षा इस्रायल मोठा आहे. इस्रायलचं संरक्षण बजेट इराणपेक्षा ७ पटीने अधिक आहे. इस्रायलकडे लांब पल्ल्यावर मारा करू शकणाऱ्या एफ-१५ सह ३४० लढाऊ विमाने आहेत. शिवाय, रडारला चुकवून मारा करणारी काही एफ-३५ फायटर जेट आणि वेगवान हेलिकॉप्टर्स आहेत.

इराणकडे एफ-४ एस, एफ-५ एस, एफ १४ यांसारख्या साठच्या दशकातील विमानांसह ३२० लढाऊ विमाने आहेत. त्यामुळे हवाई शक्तीच्या तुलनेत इराण इस्रायलपेक्षा थोडा कमजोर आहे. २०२२ मध्ये यूएस सेंट्रल कमांडचे जनरल केनेथ मॅकेन्झी यांनी इराणकडे ३ हजारहून जास्त बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे असल्याचे सांगितले होते.

इराणने क्षेपणास्त्र आणि ड्रोन प्रणाली विकसित केली आहे. पण, या शक्तीवर मात करू शकेल अशी आयर्न डोम, एरो सिस्टिम, डेव्हिड स्लिंग यांसारख्या अत्याधुनिक क्षमता इस्रायलकडे आहेत. सैन्य शक्तीच्या बाबतीत मात्र इराण इस्रायलपेक्षा वरचढ आहे. इराणकडे सुमारे ६ लाख, तर इस्रायलकडे १ लाख ७० हजार सैनिक आहेत.

### कोणाच्या पाठीशी कोण?

कोणत्याही देशाला आज स्वबळावर युद्ध करणे अशक्य आहे. याला इराण-इस्रायल युद्धही अपवाद नाही. इराणला त्याचे ॲक्सिस ऑफ रेझिस्टन्स म्हणजे शेजारच्या देशांतील संघटनांचा, म्हणजे हमास, लेबनॉनमध्ये हिजबुल्लाह, येमेनमध्ये हुती, बहारीनमध्ये अल-अस्तर ब्रिगेड या सशस्त्र गटांचा पाठिंबा आहे.

दुसरीकडे, इस्रायलच्या मागे अमेरिका, जॉर्डन, सौदी अरेबिया, कतार, युएई, ओमान हे देश आहेत. या पाठबळामुळे इस्रायलने मध्यपूर्वेलाच आव्हान दिले आहे.

### संयुक्त राष्ट्रांचे अपयश :

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी मध्यपूर्वेतील युद्धामागे टीट फॉर टॅट अशा स्वरुपाच्या हिंसाचाराचे घातक चक्र असल्याचे म्हटले आहे. तर, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी गुटेरस यांच्यावर भेदभावपूर्ण वर्तनाचा आरोप करून त्यांना इस्रायलमध्ये येण्यावर बंदी घातली आहे. या स्थितीत केवळ आवाहन करण्यापलीकडे संयुक्त राष्ट्रे स्वतःहून कोणताही ठोस पावले उचलू करू शकत नाहीत. जगातील सर्वांत मोठ्या संघटनेचे हे तितकेच मोठे अपयश आहे.

### अमेरिकेकडून आगीत तेल :

१९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर अमेरिकेच्या धोरणानुसार चालण्यास इराणने नकार दिला. तेव्हापासून अमेरिका इराण हा मध्यपूर्वेतील हितसंबंधांसाठी मोठा धोका असल्याचे मानते. आता इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला केल्यावर ही स्थिती अधिकच भीषण झाली आहे.

अरब-इस्रायल युद्धात कोणत्याही एका पक्षाने माघार घेणे तर दूरच, उलट इराणच्या हल्ल्यापासून इस्रायलचे संरक्षण करण्याचे आदेशच अमेरिकेचे अध्यक्ष बायडन यांनी आपल्या लष्कराला दिले आहेत. इराणमध्ये अशी एकही जागा नाही, जिथे आमची शस्त्रे पोहोचू शकत नाहीत, असा इशारा नेतन्याहूंनी नुकताच संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत दिला. त्यांच्या या वक्तव्याचा रोख मध्यपूर्वेतील अमेरिकी लष्करी तळांकडेही आहे, हे स्पष्ट आहे.

●●●●●●●●●

महासागर
# ग्लॅम वर्ल्ड
रविवार ■ दि. २० आक्टोबर २०२४

# बिग बॉस मराठी ५ फिनालेची राज्यभर चर्चा




कलर्स मराठी वाहिनीवरील ह्यबिग बॉस मराठी 5ह्ण हा सर्वांत लोकप्रिय आणि चर्चेत राहिलेल्या शोचा महाअंतिम सोहळा ६ ऑक्टोबर रोजी पार पडला. बिग बॉस मराठीचा ग्रँड फिनाले कसा असणार याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या.

अखेर अनेक रोमांचक ट्विस्ट, धमाकेदार टास्क आणि सदस्यांच्या एकापेक्षा एक परफॉर्मन्स सादर करत अत्यंत उत्साहात हा महाअंतिम सोहळा पार पडला. भाऊच्या धक्क्यावर काही दिवस सूत्रसंचालक रितेश देशमुख न दिसल्याने प्रेक्षकांनी त्याबद्दल प्रश्न उपस्थित केले होते. पण ग्रँड फिनालेला त्याने सर्व कसर सोडत आपला जलवा दाखवला.

या महाअंतिम सोहळ्याने आता टीआरपीच्या शर्यतीतदेखील चांगलीच बाजी मारली आहे. प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्यात हा कार्यक्रम यशस्वी ठरला आहे. महाराष्ट्राच्या घराघरांत ६ ऑक्टोबरला संध्याकाळी ६ च्या ठोक्याला प्रेक्षक टीव्हीसमोर बसून आपल्या कुटुंबीयांसोबत बिग बॉस मराठीचा ग्रँड फिनाले पाहत होते. या पर्वाचा महाविजेता कोण होणार हे जाणून घेण्याची संपूर्ण महाराष्ट्राला उत्सुकता होती.

बिग बॉसप्रेमी या पर्वाचा विजेता कोण होणार याबद्दल व्हिडीओ कॉल्स आणि व्हॉट्सअप ग्रुपद्वारे चर्चा करत होते. प्रेक्षकांच्या या अफाट प्रेमामुळे बिग बॉस मराठीचा ग्रँड फिनाले इतिहासातील सर्वात भव्य ठरला आहे. बिग बॉस मराठीच्या या सिझनच्या ग्रँड फिनालेला ५.० टीव्हीआर मिळालं आहे. तर शनिवारच्या विशेष भागाला ४.२ टीव्हीआर मिळालं आहे. ■ ■ ■

# देवदासनंतर शाहरुख खानने दारू पिण्यास सुरुवात केली



एका आंतरराष्ट्रीय कार्यक्रमादरम्यान शाहरुख खानने सांगितले होते की, देवदास चित्रपटात एका दारुड्याची भूमिका साकारल्यानंतर त्याने दारू पिण्यास सुरुवात केली होती. याच कारणामुळे त्याने त्याच्या चाहत्यांना या व्यक्तिरेखेपासून प्रेरणा घेण्यास नकार दिला.

या वर्षाच्या सुरुवातीला एका कार्यक्रमात शाहरुख खानने त्याच्या फिल्मी करिअरबद्दल आणि काही सदाबहार चित्रपटांबद्दल सांगितले होते. यावेळी त्याने देवदास चित्रपटाबाबतही चर्चा केली. त्याने सांगितले की, या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान तो खूप चिंतेत होता. याच कारणावरून त्याने दारू पिण्यास सुरुवात केली.

तो म्हणाला होता- मी चित्रपटानंतर दारू पिण्यास सुरुवात केली. ही त्याची नकारात्मक बाजू आहे.

त्याची आई लतीफ फातिमा यांना हा चित्रपट आवडेल असा विश्वास असल्यामुळे त्याने या चित्रपटासाठी होकार दिल्याचे शाहरुखने सांगितले होते. याबद्दल तो म्हणाला - मला फक्त असे वाटले की मी देवदास झालो तर तिला (आई) आवडेल आणि त्याचे कौतुक होईल.

शाहरुखला विश्वास आहे की, जर त्याने खूप मोठे चित्रपट केले तर त्याचे पालक त्याला स्वगार्तून पाहू शकतात.देवदास हा चित्रपट 2002 मध्ये प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात शाहरुख खान, ऐश्वर्या राय, माधुरी दीक्षित, जॅकी श्रॉफ, किरण खेर यांसारखे कलाकार दिसले.

या चित्रपटासाठी शाहरुखला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला होता.हा चित्रपट शरतचंद्र चट्टोपाध्याय यांच्या कादंबरीवर आधारित होता. हा चित्रपट 2002 मधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक होता. 50 कोटींमध्ये बनलेल्या या चित्रपटाने 168 कोटी रुपयांची कमाई केली. ■ ■

# बातमी मिळूनही ती सेटवर हसत राहिली



'द ग्रेट इंडियन कपिल शो'मध्ये जजच्या भूमिकेत दिसणारी अर्चना पूरण सिंहने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिच्या आयुष्यातील सर्वात कठीण परिस्थितीचा उल्लेख केला.

अर्चनाने सांगितले की, सासूच्या मृत्यूनंतरही तिने एक कॉमेडी शो शूट केला होता, जिथे तिला मोठ्याने हसावे लागले होते. इन्स्टंट बॉलिवूडला दिलेल्या मुलाखतीत अर्चना म्हणाली, 'मी एका कॉमेडी शोचे शूटिंग करत होते. टीमने बहुतेक एपिसोड शूट केले होते, पण काही सीन्स बाकी होते. या शूटिंगदरम्यानच मला माझ्या सासूबाईंचे निधन झाल्याची बातमी मिळाली.

मनात काहीतरी वेगळं, कॅमेरात वेगळं अर्चना पुढे म्हणाली, 'मला सेटवरून लगेच घरी जायचे होते पण निर्मात्यांनी मला थांबवले. निर्माते शोमध्ये खूप पैसा आणि वेळ घालवतात हा विचारही आला. कल्पना करा की काय परिस्थिती असेल. माझ्या मनात अजून काही चालू आहे पण मला ते कॅमेऱ्यात हसून दाखवावे लागले. अर्चना म्हणाली, 'इंडस्ट्रीमध्ये 20-30 वर्षे घालवल्यानंतर तुम्ही व्यावसायिक बांधिलकी समजून घेण्याइतके संवेदनशील बनता. ■ ■

# बालपणीच्या फोटोंवरून प्रियांका चोप्रा ट्रोल

प्रियांका चोप्राचा बालपणीचा फोटो सध्या चर्चेत आहे. अनेक जण तिला ट्रोल करत आहेत, तर अनेकजण तिच्या या परिवर्तनाचे कौतुक करत आहेत. दरम्यान, प्रियांकाने स्वतः हेच फोटो शेअर केले आहेत आणि सांगितले आहे की, तिच्या बालपणात तिला बॉय कट आणि बाउल कट हेअरस्टाइलमध्ये राहावे लागले. इथपर्यंत पोहोचण्यासाठी तिने खूप काही सहन केले आहे.

अभिनेत्रीने अधिकृत इंस्टाग्राम अकाऊंटवरून तिचा बालपणीचा फोटो पोस्ट केला आणि लिहिले, इशारा- 9 वर्षांच्या मला ट्रोल करू नका. तारुण्य आणि ग्रूमिंग मुलीला काय करू शकते हे वायफळ आहे. डाव्या





बाजूला मी आहे, ज्यात माज्या किशोरवयीन युगात बॉयकट केली होती, जेणेकरून शाळेत माज्या केसांची कोणतीही अडचण येऊ नये. (आई मधु चोप्राच्या कृपेने). मी बाउल कटमधून या केशरचनावर आले, जो एक विजय होता. आणि दुसरीकडे, 2000 मध्ये मिस इंडिया जिंकणारी 17 वर्षांची मी, जिने केस, मेकअप आणि वॉर्डरोबचा आनंद घेतला. दोन्ही चित्रे एका दशकाच्या अंतराने काढण्यात आली होती. प्रियंका पुढे लिहिते, जसे ब्रिटनी स्पीयर्सने स्पष्टपणे सांगितले होते की, मी मुलगी नाही आणि मी अद्याप एक स्त्री नाहीह्व मनोरंजनाच्या जगात प्रवेश करताना मला असेच वाटले होते. तथापि, जवळजवळ 25 वर्षांनंतर, मी अजूनही हे शोधण्याचा प्रयत्न करीत आहे, आपण सर्वजण हे करत नाही का? माझ्या तरूणपणाकडे बघून मी आज माझ्यावर दयाळू झाले आहे. तुम्हीही तुमचे बालपण बघा किती झाले ते. स्वतःवर प्रेम करा, तुम्ही जिथे आहात तिथे पोहोचण्यासाठी तुम्ही खूप काही केले आहे. तुमच्या बालपणी तुम्ही काय केले? तुमचे फोटो पण शेअर करा. ज्यांनी हे छायाचित्र पाठवले त्यांचे आभार.

अभिनेत्री लवकरच हेड्स ऑफ स्टेट आणि द ब्लफ या हॉलिवूड चित्रपटात दिसणार आहे. अभिनेत्रीने नुकतेच द ब्लफचे शूटिंग पूर्ण केले आहे, ज्यामध्ये तिचे अनेक ॲक्शन सीक्वेन्स असणार आहेत. ■ ■ ■ ■

# बाहुबली ३ बनवण्याच्या तयारीत राजामौली



सुप्रसिद्ध दिग्दर्शक एस.एस. राजामौली बाहुबली 3 हा चित्रपट बनवण्याच्या तयारीत आहेत. दोन्ही जुन्या चित्रपटांप्रमाणेच या चित्रपटात प्रभास मुख्य भूमिकेत दिसणार आहे.

कांगुवा चित्रपटाचे निर्माते ज्ञानवेल राजा यांनी हा खुलासा केला आहे. कांगुवा या चित्रपटाचा सिक्वेलही बनवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. ज्ञानवेल 2015च्या बाहुबली चित्रपटाचे तामिळ वितरकदेखील होते. ज्ञानवेल म्हणाले, 'बाहुबली 3 नियोजनाच्या टप्प्यात आहे. गेल्या आठवड्यात चित्रपट निर्मात्यांसोबत झालेल्या चर्चेदरम्यान मला कळले. त्याने बाहुबली 1 आणि 2 एकापाठोपाठ एक केले. पण आता ते बऱ्याच गॅपनंतर बाहुबली 3 बनवण्याचा विचार करत आहेत. ज्ञानवेल यांनी पुढे कल्की 2898 अऊचे उदाहरण दिले आणि सालारचा सिक्वेल जो एका अंतरानंतर बनवला जाईल. त्याचप्रमाणे कांगुवाचा सिक्वेलही बनवला जाणार आहे.

काही काळापूर्वी, एका कार्यक्रमादरम्यान राजामौली यांना विचारले गेले की 'बाहुबली' फ्रँचायझी दोन भाग प्रदर्शित झाल्यानंतर पुढे जाईल का, ते म्हणाले, 'बाहुबली' केवळ ॲनिमेटेड मालिकेतच पुढे जाईल असे नाही तर इतर भागांमध्येही पुढे जाईल माध्यमे वाढवली जातील. सध्या या व्यासपीठावर याबद्दल बोलण्याची योग्य वेळ नाही.

'बाहुबली'चे निर्माते शोबू यरलागड्डा यांनीही यावर सहमती दर्शवली आणि सांगितले की, 'बाहुबली' मालिकेतील आतापर्यंतचे चित्रपट केवळ एक छोटासा भाग आहेत. यावर अनेक फ्रँचायझी बनवता येतील. बाहुबली आणि बाहुबली 2 हे दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरले 2015 मध्ये रिलीज झालेला 'बाहुबली' हा तेलुगू आणि साऊथ सिनेमांमध्ये सर्वाधिक कमाई करणारा सिनेमा होता. हा भारतातील सर्वाधिक कमाई करणारा हिंदी डब केलेला चित्रपटदेखील होता. प्रभासचा 'बाहुबली' हा भारतातील पहिला चित्रपट आहे, ज्याने अवघ्या 10 दिवसांत हजार कोटींची कमाई केली आहे. तर, बाहुबली 2 हा चित्रपट 2017 मध्ये प्रदर्शित झाला होता. बाहुबली 2 2017 मध्ये रिलीज झाला होता. त्याच्या हिंदी आवृत्तीने 510.90 कोटी रुपयांची कमाई केली होती. ■ ■

# तमन्ना भाटियाची ईडीकडून चौकशी



एचपीझेड टोकन मोबाइल ॲपशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात तमन्ना भाटियाची गुरुवारी गुवाहाटीमध्ये ईडीने चौकशी केली. ल्ढे टोकन ॲपशी संबंधित कार्यक्रमात सेलिब्रिटी दिसण्यासाठी अभिनेत्रीला पैसे मिळाले होते. या ॲपद्वारे बिटकॉइन आणि क्रिप्टोकरन्सीच्या नावावर लोकांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. पीटीआयच्या म्हणण्यानुसार, तमन्ना भाटियाला ल्ढे टोकन ॲपशी संबंधित कार्यक्रमात 'सेलिब्रेटी दिसण्यासाठी' पैसे मिळाले होते. मात्र, तमन्नावर कोणतेही गंभीर आरोप नसल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. तिला आधीही बोलावले होते, पण कामामुळे ती जाऊ शकली नाही, त्यामुळे आता तमन्ना गुरुवारी आसाममधील गुवाहाटी येथील ईडी कार्यालयात पोहोचली.

HP टोकन हे विविध गेम्स असलेले मोबाइल ॲप आहे. या ॲपच्या माध्यमातून 57 हजार रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी दररोज 4 हजार रुपये देण्याचे आश्वासन देऊन कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. फसवणूक करण्यासाठी, शेल कंपन्यांच्या नावाने वेगवेगळ्या बँकांमध्ये बनावट खाती उघडण्यात आली, ज्यामध्ये गुंतवणूकदारांचे पैसे हस्तांतरित केले गेले. आरोपींनी ते पैसे क्रिप्टो आणि बिटकॉइनमध्ये आणि महादेवसारख्या अनेक बेटिंग ॲपवर गुंतवले.

उल्लेखनीय आहे की, महादेव बॅटिंग ॲप प्रकरणात तमन्ना भाटियाचेही नाव पुढे आले आहे. या प्रकरणात अभिनेत्रीशिवाय अभिनेता गेल्या वर्षी रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर यांसारख्या 17 स्टार्सची चौकशी करण्यात आली होती. या सर्वांनी ॲपचे प्रमोशन केले आणि त्याच्या जाहिरातींमध्ये दिसल्याचा आरोप होता. त्याचवेळी महादेव बेटिंग ॲपला HPZ ॲपही जोडण्यात आले आहे.

# गणपतराव देशमुख यांच्या आयुष्यावर आधारित सिनेमा

राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देणारे दमदार आमदार, राज्याचे कॅबिनेट मंत्री राहिलेल्या स्वर्गीय गणपतराव देशमुख म्हणजेच ऊर्फ आबासाहेब यांच्या जीवनकार्याचा वेध कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटातून घेतला जाणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. येत्या 25 ऑक्टोबर रोजी हा चित्रपट मराठीसह हिंदी भाषेतही जगभरात प्रदर्शित होणार आहे.

या चित्रपटात अनिकेत विश्वासराव, हार्दिक जोशी, देविका दफ्तरदार, पृथ्विक प्रताप, विजय पाटकर, प्रदीप वेलणकर, सुरेश विश्वकर्मा, अरबाज शेख, तानाजी गलगुंडे, घनश्याम दरोडे (छोटा पुढारी), अहमद देशमुख, वृंदा बाळ, निकिता सुखदेव, अली शेख, अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या भूमिका आहेत.

मायका माऊली फिल्म प्रॉडक्शन आणि मुंबई क्रिएशन एंटरटेन्मेंटच्या मारुती तुळशीराम बनकर, बाळासाहेब



महादेव एरंडे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. अल्ताफ दादासाहेब शेख यांनी चित्रपटाचं लेखन, गीतलेखन आणि दिग्दर्शन केलं आहे. अवधूत गुप्ते यांनी संगीत, कुमार डोंगरे यांनी छायांकन आणि संकलनाची जबाबदारी निभावली आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीचं वातावरण आता चांगलंच तापू लागलं आहे. निवडणुकीची आचारसंहिताही लागू झाली आहे. आता प्रचारात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडणार आहेत. मात्र, समाजाचा उद्धार, उन्नती करण्यासाठी गणपतराव देशमुख यांच्यासारखे नेते विरळचह्व त्यामुळेच ह्यकर्मयोगी आबासाहेबह्ण या चित्रपटातून गणपतराव देशमुख यांच्या हळव्या, कर्तव्यकठोर, कृतीशील, विचारी व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्यात आला आहे. अकरा वेळा आमदार म्हणून निवडून येताना त्यांनी केलेला संघर्ष, त्यातलं राजकारण उलगडतानाच त्यांनी केलेला विकास, सुधारणा, शेतकरी, वंचित घटकांसाठीचं काम दाखवण्यात आलं आहे. त्यामुळेच जनतेनं आबासाहेबांवर अलोट प्रेम केलं. या सर्वांचं दर्शन कर्मयोगी आबासाहेब मधून घडणार आहे.

आबासाहेब यांनी राज्याच्या राजकारण, समाजकारणात महत्त्वाचं योगदान दिलं. तब्बल अकरा वेळा ते आमदार झाले. त्यात दोनवेळा कॅबिनेट मंत्रीपद भुषवण्याची संधी त्यांना मिळाली. प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करत समाजासाठी योगदान देणाऱ्या, आपल्या भागाच्या विकासासाठी धडपडणाऱ्या, शेतकऱ्यांसाठी कार्य करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचा वेध चित्रपटातून घेण्यात आला आहे.

# अर्जुनशी ब्रेकअप मलायकाला पश्चाताप नाही!

काही काळापूर्वी मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांचे ब्रेकअप झाल्याच्या बातम्या आल्या होत्या. आता नुकत्याच या बातम्यांनंतर मलायका पहिल्यांदाच तिच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्याबद्दल बोलली आहे. ती म्हणाली आहे की, ती कोणतीही खंत न बाळगता आयुष्य जगत आहे.

मलायकाने असेही म्हटले आहे की, तिने आयुष्यात जी काही निवड केली आहे, तिच्या आयुष्याला आकार दिला आहे.

ग्लोबलस्पा मॅगझिनशी बोलताना मलायका अरोरा म्हणाली, 'माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात मी केलेल्या प्रत्येक निवडीने माज्या आयुष्याला आकार दिला आहे यावर माझा विश्वास आहे. मी कोणतीही खंत न ठेवता जगत आहे. मी भाग्यवान समजते की गोष्टी जशा होत्या तशा उलगडत आहेत.

मलायका अरोराचे सावत्र वडील अनिल मेहता यांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले होते. या दुःखाच्या वेळी अर्जुन कपूर मलायकाला साथ देण्यासाठी आला होता. अर्जुन कपूर अनिल मेहता यांच्या प्रार्थना सभेतही दिसला होता. जानेवारीमध्ये झूमच्या रिपोर्टनुसार, मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर यांचे नोव्हेंबर 2023 मध्येच ब्रेकअप झाले होते. दोघांपैकी एकाला लग्न करून सेटल व्हायचे होते, तर दुसऱ्याला त्यासाठी वेळ हवा होता, असा दावा या अहवालात करण्यात आला आहे. हेच कारण त्यांच्यात फूट पडण्याचे कारण ठरले.

मलायका अरोराने अर्जुन आणि त्याच्या नातेवाइकांना इंस्टाग्रामवरून अनफॉलो केल्यावर त्यांच्या ब्रेकअपची बातमी चर्चेत आली. दोघे 2016 पासून रिलेशनशिपमध्ये आहेत. या जोडप्याने वाढदिवसाच्या पोस्टद्वारे त्यांच्या नात्याची अधिकृत घोषणा केली होती. ■ ■ ■

